यह उत्सव देखिअ भरि लोचन। सोइ कछु करहु मदन मद मोचन॥
कामु जारि रति कहुँ बरु दीन्हा। कृपासिंधु यह अति भल कीन्हा॥

हे कामदेवाचा मदचूर करणारे! आपण असे काही करा जेणे करून सर्वलोक ह्या उत्सवाला डोळे भरून पाहतील. हे कृपासागर! कामदेवाला भस्म करून आपण रतीला जे वरदान दिले आहे ते फारच चांगले केले. ॥ १ ॥

सासति करि पुनि करहिं पसाऊ। नाथ प्रभुन्ह कर सहज सुभाऊ॥
पारबतीं तपु कीन्ह अपारा। करहु तासु अब अंगीकारा॥

हे नाथ! श्रेष्ठ स्वामींचा हा सहज स्वभाव असतो की, ते प्रथम दंड देऊन मग कृपा करतात. पार्वतीने अपार तप केले आहे. आता तुम्ही तिचा अंगिकार करावा. ॥ २ ॥

सुनि बिधि बिनय समुझि प्रभु बानी। ऐसेइ होउ कहा सुखु मानी॥
तब देवन्ह दुंदुभीं बजाईं। बरषि सुमन जय जय सुर साईं॥

ब्रह्मदेवाची प्रार्थना ऐकून आणि प्रभू श्रीरामचंद्रजींच्या वचनांचे स्मरण करून शिवजी प्रसन्नतापूर्वक म्हणाले—"असेच होईल." तेव्हा देवतांनी नगारे वाजविले आणि फुलांचा वर्षाव करून "जयहो! देवतांच्या स्वामींचा जयजयकार असो" असे म्हणू लागले. ॥ ३ ॥

अवसरु जानि सप्तरिषि आए। तुरतहिं बिधि गिरिभवन पठाए॥
प्रथम गए जहँ रहीं भवानी। बोले मधुर बचन छल सानी॥

योग्य समय पाहून सप्तर्षी आले आणि ब्रह्मदेवांनी तात्काळ त्यांना हिमाचलाकडे पाठविले. ते प्रथम पार्वतीकडे गेले आणि तिला कपटयुक्त मधुर वचन (विनोदयुक्त, आनंद देणारे) म्हणाले— ॥ ४ ॥

दो०— **कहा हमार न सुनेहु तब नारद कें उपदेस।**
अब भा झूठ तुम्हार पन जारेउ कामु महेस॥ ८९॥

मासपारायण, तीसरा विश्राम

नारदांच्या उपदेशामुळे त्यावेळी तू आमचे म्हणणे ऐकले नाहीस. आता तर तुझी प्रतिज्ञा खोटी झाली कारण महादेवजींनी कामालाच भस्म करून टाकले आहे. ॥ ८९ ॥

सुनि बोलीं मुसुकाइ भवानी। उचित कहेहु मुनिबर बिग्यानी॥
तुम्हरें जान कामु अब जारा। अब लगि संभु रहे सबिकारा॥

हे ऐकून पार्वतीजी मधुर हास्य करत म्हणाली—हे विज्ञानी मुनिश्वरांनो! आपण जे बोलला ते उचितच आहे. तुमच्या समजूतीनुसार शिवजींनी आता कामदेवाला जाळले, आतापर्यंत तर ते विकारीच (कामीच) होते. ॥ १ ॥

हमरें जान सदा सिव जोगी। अज अनवद्य अकाम अभोगी॥
जौं मैं सिव सेये अस जानी। प्रीति समेत कर्म मन बानी॥

परंतु माझ्या समजूतीप्रमाणे तर ते सदाचे योगी, अजन्मा, अनिंद्य, कामरहित आणि भोगहीन आहेत आणि मी जर शिवजींना असे समजूनच मन, वचन आणि कर्माने प्रेमाने त्यांची सेवा केली असेल- ॥ २ ॥

तौ हमार पन सुनहु मुनीसा। करिहहिं सत्य कृपानिधि ईसा॥
तुम्ह जो कहा हर जारेउ मारा। सोइ अति बड़ अबिबेकु तुम्हारा॥

तर हे मुनिवरांनो ऐका! ते कृपानिधान भगवान् माझी प्रतिज्ञा सत्य करतील. तुम्ही जे हे म्हणाला की, शिवजींनी कामदेवाला भस्म केले, हाच तुमचा फार मोठा अविवेक आहे. ॥ ३ ॥

तात अनल कर सहज सुभाऊ। हिम तेहि निकट जाइ नहिं काऊ॥
गएँ समीप सो अवसि नसाई। असि मन्मथ महेस की नाई॥

हे तात! अग्नीचा तर हा सहज स्वभाव आहे की, बर्फ त्याच्या पुढे जाऊच शकत नाही आणि तरीही गेलाच तर तो अवश्य नष्ट होतो. महादेवजी आणि कामदेवाच्या संबंधात सुद्धा हाच न्याय समजला पाहिजे. ॥ ४ ॥

दो०- **हियँ हरषे मुनि बचन सुनि देखि प्रीति बिस्वास।**
चले भवानिहि नाइ सिर गए हिमाचल पास॥ १०॥

पार्वतीजीचे वचन ऐकून आणि तिचे प्रेम तसेच विश्वास पाहून मुनी अंत:करणातून फार प्रसन्न झाले. ते भवानीला वंदन करून निघून गेले आणि हिमाचलाकडे पोहचले. ॥ १० ॥

सबु प्रसंगु गिरिपतिहि सुनावा। मदन दहन सुनि अति दुखु पावा॥
बहुरि कहेउ रति कर बरदाना। सुनि हिमवंत बहुत सुखु माना॥

त्यांनी पर्वतराज हिमाचलांना सर्व वृत्तांत सांगितला. कामदेव भस्म झाल्याचे ऐकून हिमाचल फार दु:खी झाले. नंतर मुनींनी रतीच्या वरदानाची गोष्ट सांगितली. ते ऐकून हिमाचलांना फार सुख झाले. ॥ १ ॥

हृदयँ बिचारि संभु प्रभुताई। सादर मुनिबर लिए बोलाई॥
सुदिनु सुनखतु सुघरी सोचाई। बेगि बेदबिधि लगन धराई॥

शिवजींचा प्रभाव जाणून हिमाचलाने श्रेष्ठ मुनींना आदरपूर्वक बोलावले आणि त्यांच्याकडून शुभ दिवस, शुभ नक्षत्र आणि शुभ घडीची माहीती घेऊन वेदविधीनुसार ताबडतोब लग्नाचा निश्चय करून लिहून घेतला. ॥ २ ॥

पत्री सप्तरिषिन्ह सोइ दीन्ही। गहि पद बिनय हिमाचल कीन्ही॥
जाइ बिधिहि तिन्ह दीन्हि सो पाती। बाचत प्रीति न हृदयँ समाती॥

यानंतर हिमाचलाने लग्नपत्रिका तयार करून सप्तर्षींना दिली आणि त्यांचे चरण पकडून विनंती केली. त्यांनी ती लग्न पत्रिका ब्रह्मदेवाला दिली. ती वाचतांना ब्रह्मदेवांच्या अंत:करणात प्रेम मावत नव्हते. ॥ ३ ॥

लगन बाचि अज सबहि सुनाई। हरषे मुनि सब सुर समुदाई॥
सुमन बृष्टि नभ बाजन बाजे। मंगल कलस दसहुँ दिसि साजे॥

ब्रह्मदेवांनी लग्न पत्रिका सर्वांना वाचून दाखविली. ती ऐकून सर्व मुनी आणि देवतांचा सर्व समाज आनंदित झाला. आकाशातून फुलांचा वर्षाव होऊ लागला, वाद्य वाजू लागले आणि दाही दिशेला मंगल कलश सजविले गेले. ॥ ४ ॥

दो०— लगे सँवारन सकल सुर बाहन बिबिध बिमान।
होहिं सगुन मंगल सुभद करहिं अपछरा गान॥ ९१॥

सर्व देवता स्वत:ची निरनिराळी वाहने आणि विमान सजवू लागले. कल्याणप्रद मंगल शकुन होऊ लागले आणि अप्सरा गाऊ लागल्या. ॥ ९१ ॥

सिवहि संभु गन करहिं सिंगारा। जटा मुकुट अहि मौरु सँवारा॥
कुंडल कंकन पहिरे ब्याला। तन बिभूति पट केहरि छाला॥

शिवजींचे गण शिवजींचा शृंगार करू लागले. जटांचा मुगुट बनवून त्यावर सापांच्या मुंडावळ्या बांधल्या गेल्या. शिवजींनी सापांचीच कुंडल आणि कंकण धारण केले. शरीरावर विभूती लावली आणि वस्त्राऐवजी व्याघ्रांबर लपेटले. ॥ १ ॥

ससि ललाट सुंदर सिर गंगा। नयन तीनि उपबीत भुजंगा॥
गरल कंठ उर नर सिर माला। असिव बेष सिवधाम कृपाला॥

शिवजींच्या सुंदर कपाळावर चंद्र आणि मस्तकावर गंगा, तीन नेत्र सर्पांचे जानवे, कंठात विष आणि गळ्यात नरमुंडांची माळा होती. अशाप्रकारे त्यांचा वेष अशुभ असताना सुद्धा ते कल्याणाचे धाम आणि कृपाळू आहेत. ॥ २ ॥

कर त्रिसूल अरु डमरु बिराजा। चले बसहँ चढ़ि बाजहिं बाजा॥
देखि सिवहि सुरत्रिय मुसुकाहीं। बर लायक दुलहिनि जग नाहीं॥

एका हातात त्रिशूल आणि दुसऱ्या हातात डमरू सुशोभत आहे. शिवजी नंदीवर बसून निघाले. वाद्ये वाजत आहेत. शिवजीला पाहून देवांगना मधुर हास्य करीत आहेत. (आणि म्हणत आहेत की,) या वराच्या योग्य वधू संसारात मिळणार नाही. ॥ ३ ॥

बिष्नु बिरंचि आदि सुरब्राता। चढ़ि चढ़ि बाहन चले बराता॥
सुर समाज सब भाँति अनूपा। नहिं बरात दूलह अनुरूपा॥

एहि बिधि गयउ कालु बहु बीती । नित नै होइ राम पद प्रीती ॥
नेमु प्रेमु संकर कर देखा । अबिचल हृदयँ भगति कै रेखा ॥

अशा रीतीने बराच काळ लोटला. श्रीरामचरणांवरील प्रेम दिवसेंदिवस वाढत होते. श्रीशंकरांचे कठोर नियम, अनन्य प्रेम व अंत:करणातील अढळ भक्ती जेव्हा श्रीरामांनी पाहिली, ॥ २ ॥

प्रगटे रामु कृतग्य कृपाला । रूप सील निधि तेज बिसाला ॥
बहु प्रकार संकरहि सराहा । तुम्ह बिनु अस ब्रतु को निरबाहा ॥

तेव्हा कृतज्ञ, कृपाळू, रूप-शीलाचे भांडार, अत्यंत तेज:पुंज भगवान श्रीराम प्रकट झाले. त्यांनी पुष्कळ प्रकारे श्रीशिवांची वाखाणणी केली आणि म्हटले, 'तुमच्याशिवाय असे (कठीण) व्रत कोण करू शकणार ?' ॥ ३ ॥

बहुबिधि राम सिवहि समुझावा । पारबती कर जन्मु सुनावा ॥
अति पुनीत गिरिजा कै करनी । बिस्तर सहित कृपानिधि बरनी ॥

श्रीरामांनी अनेक प्रकारे शिवांचे सांत्वन केले आणि पार्वतीच्या जन्माची वार्ता सांगितली. कृपानिधान श्रीरामांनी पार्वतीच्या अत्यंत पवित्र कृतीचे विस्ताराने वर्णन केले. ॥ ४ ॥

दो०—अब बिनती मम सुनहु सिव जौं मो पर निज नेहु ।
जाइ बिबाहहु सैलजहि यह मोहि मागें देहु ॥ ७६ ॥

नंतर ते शिवांना म्हणाले, 'हे शंकरा, जर तुमचे माझ्यावर (खरेच) प्रेम असेल तर आता माझी विनंती ऐका. माझी इच्छा आहे की, तुम्ही जाऊन पार्वतीचे पाणिग्रहण करावे !' ॥ ७६ ॥

कह सिव जदपि उचित अस नाहीं । नाथ बचन पुनि मेटि न जाहीं ॥
सिर धरि आयसु करिअ तुम्हारा । परम धरमु यह नाथ हमारा ॥

शिव म्हणाले, 'जरी हे योग्य नाही, तरी स्वामींचे म्हणणे मला टाळता येणार नाही. हे नाथ ! तुमची आज्ञा शिरसामान्य करणे, हाच माझा परम धर्म आहे. ॥ १ ॥

मातु पिता गुर प्रभु कै बानी । बिनहिं बिचार करिअ सुभ जानी ॥
तुम्ह सब भाँति परम हितकारी । अग्या सिर पर नाथ तुम्हारी ॥

माता, पिता, गुरू आणि स्वामी यांचे सांगणे काहीही विचार न करता कल्याणकारक समजून मान्य करायला हवे. शिवाय तुम्ही तर माझे परम हितकारी आहात. म्हणून हे नाथ ! तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. ॥ २ ॥

प्रभु तोषेउ सुनि संकर बचना । भक्ति बिबेक धर्म जुत रचना ॥
कह प्रभु हर तुम्हार पन रहेऊ । अब उर राखेहु जो हम कहेऊ ॥

शंकरांची भक्ती, ज्ञान व धर्म यांनी युक्त असे बोलणे ऐकून श्रीराम प्रसन्न झाले. प्रभू म्हणाले, 'हे हरा, तुमची प्रतिज्ञा पूर्ण झाली. आता मी जे सांगितले आहे, ते लक्षात ठेवा.' ॥ ३ ॥

अंतरधान भए अस भाषी । संकर सोइ मूरति उर राखी ॥
तबहिं सप्तरिषि सिव पहिं आए । बोले प्रभु अति बचन सुहाए ॥

असे म्हणून श्रीराम अंतर्धान पावले. शिवांनी त्यांची ती मूर्ती आपल्या हृदयात धारण करून ठेवली. त्याच वेळी सप्तर्षी शिवांच्याकडे आले. प्रभू महादेवांनी त्यांना गोड शब्दात सांगितले, ॥ ४ ॥

दो०—पारबती पहिं जाइ तुम्ह प्रेम परिच्छा लेहु ।
गिरिहि प्रेरि पठएहु भवन दूरि करेहु संदेहु ॥ ७७ ॥

तुम्ही पार्वतीकडे जाऊन तिच्या प्रेमाची पारख करून घ्या आणि हिमाचलाला सांगून (त्यांना पार्वतीस आणण्यास पाठवा व) पार्वतीला घरी पाठवून द्या आणि त्यांच्या मनातील संशय दूर करा. ॥ ७७ ॥

रिषिन्ह गौरि देखी तहँ कैसी । मूरतिमंत तपस्या जैसी ॥
बोले मुनि सुनु सैलकुमारी । करहु कवन कारन तपु भारी ॥

सप्तर्षींनी (तेथे जाऊन पाहिले) तर पार्वती जणू मूर्तिमंत तपस्याच होती. मुनी म्हणाले, हे शैलकुमारी, ऐक. तू कशासाठी इतके कठोर तप करीत आहेस ? ॥ १ ॥

केहि अवराधहु का तुम्ह चहहू । हम सन सत्य मरमु किन कहहू ॥
कहत बचन मनु अति सकुचाई । हँसिहहु सुनि हमारि जड़ताई ॥

तू कोणाची आराधना करीत आहेस आणि तुझी इच्छा काय आहे ? आम्हांला आपले गुपित खरे खरे का सांगत नाहीस ? (पार्वती म्हणाली,) 'सांगताना मनात मोठा संकोच वाटतो. तुम्ही माझा मूर्खपणा ऐकून हसाल. ॥ २ ॥

मनु हठ परा न सुनइ सिखावा । चहत बारि पर भीति उठावा ॥
नारद कहा सत्य सोइ जाना । बिनु पंखन्ह हम चहहिं उड़ाना ॥

माझ्या मनाने हट्ट धरला आहे, काही केल्या ते ऐकत नाही आणि पाण्यावर भिंत उभी करावी, असे त्याला वाटते. नारदांनी जे सांगितले होते, ते खरे मानून मी पंखाविना उडू इच्छिते. ॥ ३ ॥

देखहु मुनि अबिबेकु हमारा । चाहिअ सदा सिवहि भरतारा ॥

मुनींनो, तुम्ही माझा वेडेपणा पाहा की, शिवांना आपला पती बनविण्याची माझी कामना आहे.' ॥ ४ ॥

दो०—सुनत बचन बिहसे रिषय गिरिसंभव तव देह ।
नारद कर उपदेसु सुनि कहहु बसेउ किसु गेह ॥ ७८ ॥

नगराची शोभा पाहून ब्रह्मदेवाची निपुणता खरोखरच तुच्छ वाटत आहे. वने, बागा, विहिरी,तल नद्या सर्वच सुंदर आहेत. त्यांचे वर्णन कोण करू शकतो? घरोघरी खूप मंगलसूचक तोरणे आ ध्वजा-पताका सुशोभित होत आहेत. तेथील सुंदर आणि चतुर स्त्री-पुरुषांची छबी पाहून मुनींची सुद्धा मोहित होतात.

दो०— **जगदंबा जहँ अवतरी सो पुरु बरनि कि जाइ।**
रिद्धि सिद्धि संपत्ति सुख नित नूतन अधिकाइ॥ १४॥

ज्या नगरात स्वयं जगदंबेने अवतार घेतला त्याचे वर्णन कसे होऊ शकेल? तेथे ऋद्धी, सिद्ध संपत्ती आणि सुख नित्य नवे वाढत जात आहेत. ॥ १४॥

नगर निकट बरात सुनि आई। पुर खरभरु सोभा अधिकाई
करि बनाव सजि बाहन नाना। चले लेन सादर अगवाना

वरात नगराजवळ आलेली ऐकून नगरात गर्दी झाली त्यामुळे नगराची शोभा वाढली. सामे जाणारे लोक सजून-धजून तसेच नानाप्रकारची वाहने सजवून आदराने वरात आणण्यासा निघाले. ॥ १ ॥

हियँ हरषे सुर सेन निहारी। हरिहि देखि अति भए सुखारी
सिव समाज जब देखन लागे। बिडरि चले बाहन सब भागे

देवतांचा समाज पाहून सर्वजण मनात प्रसन्न झाले आणि भगवान् विष्णुंना पाहून तर फारच सुख झाले. परंतु जेव्हा शिवजीच्या समाजाला पाहू लागले तेव्हा तर त्यांची सर्व वाहने (हत्ती, घोडे, रथ बैल) बुजून उधळू लागली. ॥ २ ॥

धरि धीरजु तहँ रहे सयाने। बालक सब लै जीव पराने
गएँ भवन पूछहिं पितु माता। कहहिं बचन भय कंपित गाता।

काही प्रौढ समजदार लोक धैर्य धारण करून तेथेच थांबले. लहान मुले तर जीव मुठी घेऊन पळाली. घरी पोहोचल्यावर त्यांना (मुलांना) माता-पिता विचारतात, तेव्हा ते थरथ कापत म्हणतात की, ॥ ३ ॥

कहिअ काह कहि जाइ न बाता। जम कर धार किधौं बरिआता।
बरु बौराह बसहँ असवारा। ब्याल कपाल बिभूषन छारा।

काय सांगावे, काही सांगता येत नाही. ही वरात आहे की यमराजाची सेना आहे? नवरदेव पागल आहे आणि बैलावर बसलेला आहे. सर्प, नरमुंड आणि राख हेच त्याचे अलंकार आहेत. ॥ ४ ॥

छं०— **तन छार ब्याल कपाल भूषन नगन जटिल भयंकरा।**
सँग भूत प्रेत पिसाच जोगिनि बिकट मुख रजनीचरा॥

जो जिअत रहिहि बरात देखत पुन्य बड़ तेहि कर सही।
देखिहि सो उमा बिबाहु घर घर बात असि लरिकन्ह कही॥

नवरदेवाच्या शरीरावर राख फासलेली आहे. सर्प आणि नरमुंडाचे अलंकार आहेत. तो नग्न, जटाधारी आणि भयानक आहे. त्याच्याबरोबर भयानक मुखाचे भूत-प्रेत, पिशाच, योगिनी आणि राक्षस आहेत. जो वरात पाहिल्यानंतर जिवंत राहील, खरोखर तो फार पुण्यवान आहे आणि तोच पार्वतीचा विवाह पाहील. मुलांनी घरोघर हीच गोष्ट सांगितली.

दो०— **समुझि महेस समाज सब जननि जनक मुसुकाहिं।**
बाल बुझाए बिबिध बिधि निडर होहु डरु नाहिं॥ १५॥

महेश्वराचा (शिवजींचा) समाज समजून सर्व मुलांचे माता-पिता मधुर हास्य करतात. त्यांनी पुष्कळ प्रकारांनी मुलांना समजावून सांगितले की, निर्भय व्हा, भिण्याचे काही कारण नाही. ॥ १५ ॥

लै अगवान बरातहि आए। दिए सबहि जनवास सुहाए॥
मैनाँ सुभ आरती सँवारी। संग सुमंगल गावहिं नारी॥

सामोरे जाणाऱ्या लोकांनी वरातीला आणले. त्यांनी सर्वांना जानुसवाडे राहण्यासाठी दिले. मैना (पार्वतीची माता) हिने सुंदर आरती सजविली आणि तिच्या सखी उत्तम मंगल गीत गाऊ लागल्या. ॥ १ ॥

कंचन थार सोह बर पानी। परिछन चली हरहि हरषानी॥
बिकट बेष रुद्रहि जब देखा। अबलन्ह उर भय भयउ बिसेषा॥

सुंदर हातात सोन्याचे ताट शोभत आहे. अशाप्रकारे मैना आनंदाने शिवजींना ओवाळण्यासाठी निघाली. जेव्हा शिवजीला भयानक वेषात पाहिले तेव्हा तर स्त्रीयांच्या मनात फार मोठे भय उत्पन्न झाले. ॥ २ ॥

भागि भवन पैठीं अति त्रासा। गए महेसु जहाँ जनवासा॥
मैना हृदयँ भयउ दुखु भारी। लीन्ही बोलि गिरीसकुमारी॥

बऱ्याच स्त्रीया घाबरून घरामध्ये घुसल्या आणि शिवजी जानुसवाड्यात गेले. मैना फार दु:खी झाली. तिने पार्वतीला आपल्याजवळ बोलावले. ॥ ३ ॥

अधिक सनेहँ गोद बैठारी। स्याम सरोज नयन भरे बारी॥
जेहिं बिधि तुम्हहि रूपु अस दीन्हा। तेहिं जड़ बरु बाउर कस कीन्हा॥

आणि अत्यंत प्रेमाने मांडीवर घेऊन आपल्या निलकमळासारख्या नेत्रात आसवे आणून म्हणाली—ज्या विधात्याने तुला असे सुंदर रूप प्रदान केले, त्या मूर्खाने तुझ्या नवरदेवास असे बावळट कसे बनविले? ॥ ४ ॥

छं०— **कस कीन्ह बरु बौराह बिधि जेहिं तुम्हहि सुंदरता दई।**
जो फलु चहिअ सुरतरुहिं सो बरबस बबूरहिं लागई॥
तुम्ह सहित गिरि तें गिरौं पावक जरौं जलनिधि महुँ परौं।
घरु जाउ अपजसु होउ जग जीवत बिबाहु न हौं करौं॥

ज्या विधात्याने तुला सौंदर्य प्रदान केले त्याने तुझ्यासाठी बावळट वर कसा बनवला? जे फल कल्पवृक्षाला लागायला पाहिजे, ते जबरदस्ती बाभळीला लागत आहे. मी तुला घेऊन पर्वतावरून उडी मारीन, अग्नीत प्रवेश करीन अथवा समुद्रात उडी मारीन. मग माझे घर उजडो अथवा संपूर्ण संसारात अपकीर्ती पसरो, परंतु जिवंतपणी मी अशा बावळट वराशी तुझा विवाह होऊ देणार नाही.

दो०— **भई बिकल अबला सकल दुखित देखि गिरिनारि।**
करि बिलापु रोदति बदति सुता सनेहु सँभारि॥ १६॥

हिमाचलाची पत्नी मैना हिला दु:खी पाहून सर्व स्त्रीया व्याकूळ झाल्या. मैना आपल्या कन्येच्या स्नेहाची आठवण करून विलाप करू लागली. ती रडत रडत म्हणत होती— ॥ १६ ॥

नारद कर मैं काह बिगारा। भवनु मोर जिन्ह बसत उजारा॥
अस उपदेसु उमहि जिन्ह दीन्हा। बौरे बरहि लागि तपु कीन्हा॥

मी नारदाचे काय बिघडविले होते ज्यांनी माझे भरलेले घर उजाड केले आणि ज्यांनी पार्वतीला असा उपदेश केला की, त्यामुळे तिने बावळट नवऱ्यासाठी तप केले. ॥ १ ॥

साचेहुँ उन्ह कें मोह न माया। उदासीन धनु धामु न जाया॥
पर घर घालक लाज न भीरा। बाँझ कि जान प्रसव कै पीरा॥

खरोखर त्यांना कोणाविषयी मोह नाही, माया नाही, त्यांच्याजवळ धन नाही, घर नाही आणि पत्नीही नाही. ते सगळ्यापासून उदासीन आहेत. म्हणूनच ते दुसऱ्याचेही घर उजाड करणारे आहेत. त्यांना कोणाचीही लाज नाही आणि भीती नाही. पहा ना, वांझ स्त्री प्रसव वेदना कसे काय जाणणार? ॥ २ ॥

जननिहि बिकल बिलोकि भवानी। बोली जुत बिबेक मृदु बानी॥
अस बिचारि सोचहि मति माता। सो न टरइ जो रचइ बिधाता॥

मातेला व्याकूळ पाहून पार्वती विवेकयुक्त कोमल वाणीने म्हणाली— हे माता! जे विधात्याने रचलेले असते ते टळत नाही, असा विचार करून तू शोक करू नकोस. ॥ ३ ॥

करम लिखा जौं बाउर नाहू। तौ कत दोसु लगाइअ काहू॥
तुम्ह सन मिटहिं कि बिधि के अंका। मातु ब्यर्थ जनि लेहु कलंका॥

जर माझ्या भाग्यात बावळटच पती लिहिला असेल तर दुसऱ्या कोणाला का दोष लावायचा?

हे माते! विधात्याने लिहून ठेवलेली अक्षरे तू मिटवू शकतेस काय? व्यर्थच कलंकाचा डाग लावून घेऊ नको. ॥ ४ ॥

छं०— **जनि लेहु मातु कलंकु करुना परिहरहु अवसर नहीं।**
दुखु सुखु जो लिखा लिलार हमरें जाब जहँ पाउब तहीं॥
सुनि उमा बचन बिनीत कोमल सकल अबला सोचहीं।
बहु भाँति बिधिहि लगाइ दूषन नयन बारि बिमोचहीं॥

हे माते! कलंक लावू नको, शोकाचा त्याग कर. ही वेळ शोक करण्याची नाही. माझ्या नशीबात जे सुख दु:ख लिहिलेले आहे, ते कुठेही गेले तरी मला भोगावेच लागणार आहे. पार्वतीजींचे असे विनययुक्त कोमल वचन ऐकून सर्व स्त्रीया व्याकूळ झाल्या आणि विधात्यावर नाना प्रकारचे दोषारोपण करून डोळ्यातून अश्रू गाळू लागल्या.

दो०— **तेहि अवसर नारद सहित अरु रिषि सप्त समेत।**
समाचार सुनि तुहिनगिरि गवने तुरत निकेत॥९७॥

हा समाचार ऐकताच हिमाचल तात्काळ नारदजी आणि सप्तर्षींना बरोबर घेऊन आपल्या घरी आले. ॥ ९७ ॥

तब नारद सबही समुझावा। पूरुब कथाप्रसंगु सुनावा॥
मयना सत्य सुनहु मम बानी। जगदंबा तव सुता भवानी॥

त्यावेळी नारदजींनी पार्वतीच्या पूर्वजन्माची कथा ऐकवली आणि सगळ्यांना समजावले. (आणि म्हणाले—) हे मैना! तू माझी खरी गोष्ट ऐक. तुझी ही मुलगी साक्षात जगज्जननी भवानी आहे. ॥ १ ॥

अजा अनादि सक्ति अबिनासिनि। सदा संभु अरधंग निवासिनि॥
जग संभव पालन लय कारिनि। निज इच्छा लीला बपु धारिनि॥

ही अजन्मा, अनादी आणि अविनाशिनी शक्ती आहे. सदा शिवजींच्या अर्धांगात राहते. ही जगताची उत्पत्ती, पालन आणि संहार करणारी आहे. स्वत:च्या इच्छेनेच ही लीलाशरीर धारण करते. ॥ २ ॥

जनमीं प्रथम दच्छ गृह जाई। नामु सती सुंदर तनु पाई॥
तहँहुँ सती संकरहि बिबाहीं। कथा प्रसिद्ध सकल जग माहीं॥

पूर्वी ही जेव्हा दक्षाच्या घरी जन्मली होती तेव्हा हिचे नाव सती होते. फार सुंदर शरीर प्राप्त केले होते. त्यावेळीही सतीचा शंकरांबरोबरच विवाह झाला होता. ही कथा सर्व जगतात प्रसिद्ध आहे. ॥ ३ ॥

एक बार आवत सिव संगा। देखेउ रघुकुल कमल पतंगा॥
भयउ मोहु सिव कहा न कीन्हा। भ्रम बस बेषु सीय कर लीन्हा॥

एकदा शिवजीबरोबर जात असताना (वाटेत) रघुकुलरूपी सूर्य श्रीरामचंद्रजींना जेव्हा हिने पाहिले, तेव्हा हिला मोह झाला आणि शिवजींचे म्हणणे न मानता हिने भ्रमाने सीताजींचा वेष धारण केला. ॥ ४ ॥

छं०— **सिय बेषु सतीं जो कीन्ह तेहिं अपराध संकर परिहरीं।**
हर बिरहँ जाइ बहोरि पितु कें जग्य जोगानल जरीं॥
अब जनमि तुम्हरे भवन निज पति लागि दारुन तपु किया।
अस जानि संसय तजहु गिरिजा सर्बदा संकरप्रिया॥

सतीने जो सीताजींचा वेष धारण केला. त्याच अपराधामुळे शंकरांनी तिचा त्याग केला. नंतर शिवजींच्या वियोगात ही आपल्या पित्याच्या घरी गेली व तेथेच योगाग्नीने भस्म झाली. आता हिने तुझ्या घरी जन्म घेऊन आपल्या पतीसाठी कठीण तप केले आहे. हे जाणून संदेह सोडून दे. पार्वतीजी तर सदा शिवजींची प्रिया (अर्धांगिनी) आहे.

दो०— **सुनि नारद के बचन तब सब कर मिटा बिषाद।**
छन महुँ ब्यापेउ सकल पुर घर घर यह संबाद॥ ९८॥

तेव्हा नारदजींचे वचन ऐकून सर्वांचा विषाद समाप्त झाला आणि क्षणभरात हा समाचार संपूर्ण नगरात घरोघरी पसरला. ॥ ९८ ॥

तब मयना हिमवंतु अनंदे। पुनि पुनि पारबती पद बंदे॥
नारि पुरुष सिसु जुबा सयाने। नगर लोग सब अति हरषाने॥

त्यावेळी मैना आणि हिमाचल आनंदात मग्न झाले आणि त्यांनी वारंवार पार्वतीच्या चरणांची वंदना केली. स्त्री, पुरुष, बालक, तरुण आणि वृद्ध असे नगरातील सर्व लोक फारच प्रसन्न झाले. ॥ १ ॥

लगे होन पुर मंगल गाना। सजे सबहिं हाटक घट नाना॥
भाँति अनेक भई जेवनारा। सूपसास्त्र जस कछु ब्यवहारा॥

नगरात मंगल गीत गायले जाऊ लागले आणि सर्वांनी अनेक प्रकारचे सुवर्ण कलश सजविले. पाकशास्त्रानुसार अनेक प्रकारची पक्वान्ने बनविली गेली. ॥ २ ॥

सो जेवनार कि जाइ बखानी। बसहिं भवन जेहिं मातु भवानी॥
सादर बोले सकल बराती। बिष्नु बिरंचि देव सब जाती॥

ज्या घरी स्वत: भवानी निवास करते तेथील स्वयंपाकाचे वर्णन कसे केले जाऊ शकेल? हिमालयाने आदरपूर्वक सर्व वऱ्हाडी मंडळींना, विष्णु, ब्रह्मदेव आणि सर्व प्रकारच्या देवतांना बोलावले. ॥ ३ ॥

बिबिधि पाँति बैठी जेवनारा। लागे परुसन निपुन सुआरा॥
नारिबृंद सुर जेवँत जानी। लगीं देन गारीं मृदु बानी॥

भोजन करणाऱ्यांच्या पुष्कळ पंगती भोजनाला बसल्या. चतुर वाढपे पदार्थ वाढू लागले. देवतांचे भोजन चालू आहे हे पाहून तेथील स्त्रीया कोमल वाणीने विनोदाने व्यंग वचने बोलू लागल्या. ॥४॥

दो०— गारीं मधुर स्वर देहिं सुंदरि बिंग्य बचन सुनावहीं।
भोजनु करहिं सुर अति बिलंबु बिनोदु सुनि सचु पावहीं॥
जेवँत जो बढ़्यो अनंदु सो मुख कोटिहूँ न परै कह्यो।
अचवाँइ दीन्हें पान गवने बास जहँ जाको रह्यो॥

सर्व सुंदर स्त्रीया मधुर शब्दात चेष्टा मस्करी करू लागल्या आणि व्यंग वचने ऐकवू लागल्या. देवगण विनोद ऐकून खूप सुखाचा अनुभव करत आहेत. म्हणून भोजन करण्यास फार उशीर लावत आहेत. भोजनाचे वेळी जो आनंद वृद्धिगत झाला, तो कोट्यवधी मुखाने सुद्धा वर्णन केला जाऊ शकत नाही. (जेवण झाल्यावर) सर्वांचे हात-मुख धुवून झाल्यावर विडे दिले गेले. मग सर्व लोक जेथे थांबले होते तेथे गेले.

दो०— बहुरि मुनिन्ह हिमवंत कहुँ लगन सुनाई आइ।
समय बिलोकि बिबाह कर पठए देव बोलाइ॥ ९९॥

नंतर मुनींनी हिमवानाकडे येऊन लग्नपत्रिका वाचून दाखविली आणि विवाहाचा समय जवळ आलेला पाहून देवतांना आमंत्रण पाठवले. ॥ ९९ ॥

बोलि सकल सुर सादर लीन्हे। सबहि जथोचित आसन दीन्हे॥
बेदी बेद बिधान सँवारी। सुभग सुमंगल गावहिं नारी॥

सर्व देवतांना आदराने बोलावून घेतले आणि सर्वांना यथायोग्य आसने दिली. वेदविधीनुसार बोहले सजवले गेले आणि सुंदर स्त्रीया श्रेष्ठ मंगल गीत गाऊ लागल्या. ॥ १ ॥

सिंघासनु अति दिब्य सुहावा। जाइ न बरनि बिरंचि बनावा॥
बैठे सिव बिप्रन्ह सिरु नाई। हृदयँ सुमिरि निज प्रभु रघुराई॥

बोहल्यावर एक अत्यंत सुंदर दिव्य सिंहासन होते, ज्याच्या सुंदरतेचे वर्णन केले जाऊ शकत नाही, कारण ते स्वत: ब्रह्मदेवाने बनवले होते. ब्राह्मणांना वंदन करून आणि हृदयात आपल्या स्वामी श्रीरघुनाथजींचे स्मरण करून महादेवजी त्या सिंहासनावर आसनस्थ झाले. ॥ २ ॥

बहुरि मुनीसन्ह उमा बोलाईं। करि सिंगारु सखीं लै आईं॥
देखत रूपु सकल सुर मोहे। बरनै छबि अस जग कबि को है॥

नंतर मुनिश्वरांनी पार्वतीजीला बोलावले. सख्या तिचा शृंगार करून तिला घेऊन आल्या.

पार्वतीजींच्या रूपाला पाहून सर्व देवता मोहित झाल्या. संसारात असा कवी कोण आहे जो तिच्या सौंदर्याचे वर्णन करू शकेल!॥ ३ ॥

जगदंबिका जानि भव भामा। सुरन्ह मनहिं मन कीन्ह प्रनामा॥
सुंदरता मरजाद भवानी। जाइ न कोटिहुँ बदन बखानी॥

पार्वतीजीला जगदंबा आणि शिवजींची पत्नी समजून देवतांनी मनातल्या मनात प्रणाम केला. भवानीजी सौंदर्याची सीमा आहे. कोट्यवधी मुखाने सुद्धा तिची शोभा वर्णन होऊ शकत नाही. ॥ ४ ॥

छं— **कोटिहुँ बदन नहिं बनै बरनत जग जननि सोभा महा।**
सकुचहिं कहत श्रुति सेष सारद मंदमति तुलसी कहा॥
छबिखानि मातु भवानि गवनीं मध्य मंडप सिव जहाँ।
अवलोकि सकहिं न सकुच पति पद कमल मनु मधुकरु तहाँ॥

जगज्जननी पार्वतीजीच्या महान शोभेचे वर्णन कोट्यवधी मुखाने सुद्धा केले जाऊ शकत नाही. जर वेद, सरस्वती, शेष हे सुद्धा वर्णन करण्यात संकोचतात, तर मंदबुद्धी तुलसीची काय कथा? सौंदर्य आणि शोभेची खाण माता भवानी मंडपाच्या मध्यभागी जेथे शिवजी होते तेथे गेली. ती संकोचामुळे पतीच्या (शिवजींच्या) चरणकमलांना पाहू शकत नव्हती. परंतु तिचा मनरूपी भुंगा तर तेथेच (रसपान करत) होता.

दो०— **मुनि अनुसासन गनपतिहि पूजेउ संभु भवानि।**
कोउ सुनि संसय करै जनि सुर अनादि जियँ जानि॥ १००॥

मुनीश्वरांच्या आज्ञेने शिवजी आणि पार्वतीजीने गणेशजींचे पूजन केले. मनात देवतांना अनादी समजून कोणी ही गोष्ट ऐकून शंका करू नये (की गणेशजी तर शिव-पार्वतीची संतान आहे. आताच विवाहाचे पूर्वी ते कुठून आले?) ॥ १०० ॥

जसि बिबाह कै बिधि श्रुति गाई। महामुनिन्ह सो सब करवाई॥
गहि गिरीस कुस कन्या पानी। भवहि समरपीं जानि भवानी॥

वेदविधीनुसार सर्व विवाह विधी महामुनींनी करविला. पर्वतराज हिमाचलाने हातात कुश घेऊन तसेच कन्येचा हात धरून तिला भवानी (शिवपत्नी) समजून शिवजींना समर्पित केले. ॥ १ ॥

पानिग्रहन जब कीन्ह महेसा। हियँ हरषे तब सकल सुरेसा॥
बेदमंत्र मुनिबर उच्चरहीं। जय जय जय संकर सुर करहीं॥

जेव्हा महेश्वरांनी (शिवजी) पार्वतीचे पाणिग्रहण केले, तेव्हा (इंद्रादी) सर्व देवता अंत:करणपूर्वक आनंदित झाल्या. श्रेष्ठ मुनिगण वेदमंत्रांचा उच्चार करू लागले आणि देवगण शिवजींचा जयजयकार करू लागले. ॥ २ ॥

बाजहिं बाजन बिबिध बिधाना। सुमनबृष्टि नभ भै बिधि नाना॥
हर गिरिजा कर भयउ बिबाहू। सकल भुवन भरि रहा उछाहू॥

अनेक प्रकारची वाद्ये वाजू लागली. आकाशातून नाना प्रकारच्या फुलांचा वर्षान होऊ लागला. शिव-पार्वतीचा विवाह झाला आणि ब्रह्मांडात आनंदी आनंद झाला. ॥ ३ ॥

दासीं दास तुरग रथ नागा। धेनु बसन मनि बस्तु बिभागा॥
अन्न कनकभाजन भरि जाना। दाइज दीन्ह न जाइ बखाना॥

दासी, दास, रथ, घोडे, हत्ती, गायी, वस्त्र आणि रत्न इत्यादी अनेक प्रकारच्या वस्तू,अन्न तसेच सोन्याची भांडी गाड्यामध्ये भरून वरदक्षिणा म्हणून दिली, ज्याचे वर्णन होऊ शकत नाही. ॥ ४ ॥

छं०— **दाइज दियो बहु भाँति पुनि कर जोरि हिमभूधर कह्यो।**
का देउँ पूरनकाम संकर चरन पंकज गहि रह्यो॥
सिवँ कृपासागर ससुर कर संतोषु सब भाँतिहिं कियो।
पुनि गहे पद पाथोज मयनाँ प्रेम परिपूरन हियो॥

खूप मोठी वरदक्षिणा देऊन तसेच हात जोडून हिमाचल म्हणाले—हे शंकर! आपण पूर्ण-काम आहात, मी आपणाला काय देऊ शकतो? (एवढे म्हणून) त्यांनी शिवजींचे चरणकमल पकडले. तेव्हा कृपासागर शिवजींनी आपल्या सासऱ्याचे सर्व प्रकारे समाधान केले. नंतर प्रेमाने परिपूर्ण हृदय असलेल्या मैनाने शिवजींचे चरणकमल पकडले. (आणि महणाली—)

दो०— **नाथ उमा मम प्रान सम गृहकिंकरी करेहु।**
छमेहु सकल अपराध अब होइ प्रसन्न बरु देहु॥ १०१॥

हे नाथ! ही उमा मला माझ्या प्राणासारखी (प्रिय) आहे. आपण हिला आपल्या घरची दासी बनवा आणि हिच्या सर्व अपराधांना क्षमा करीत रहा. आता प्रसन्न होऊन मला हाच वर द्या. ॥ १०१ ॥

बहु बिधि संभु सासु समुझाई। गवनी भवन चरन सिरु नाई॥
जननीं उमा बोलि तब लीन्ही। लै उछंग सुंदर सिख दीन्ही॥

शिवजींनी अनेक प्रकाराने आपल्या सासूला समजावले. त्यानंतर ती शिवजीला नमस्कार करून घरी परतली. मग मातेने पार्वतीला जवळ बोलावून मांडीवर घेऊन सुंदर उपदेश दिला— ॥१ ॥

करेहु सदा संकर पद पूजा। नारिधरमु पति देउ न दूजा॥
बचन कहत भरे लोचन बारी। बहुरि लाइ उर लीन्हि कुमारी॥

हे पार्वती! तू सदा शिवचरणांची पूजा करत जा. नारीचा हाच धर्म आहे. स्त्रीयांसाठी पतीच देवता आहे, दुसरी देवता नाही. असे बोलता बोलता तिचे डोळे पाणावले आणि तिने कन्येला छातीशी धरले. ॥ २ ॥

कत बिधि सृजीं नारि जग माहीं। पराधीन सपनेहुँ सुखु नाहीं॥
भै अति प्रेम बिकल महतारी। धीरजु कीन्ह कुसमय बिचारी॥

(नंतर म्हणाली की,) विधात्याने स्त्री जातीला कशाला पैदा केले असेल? पराधीन माणसाला स्वप्नात सुद्धा सुख मिळत नाही. असे म्हणत ती प्रेमाने अत्यंत विव्हळ झाली. परंतु कुसमय (दु:ख करण्याची वेळ नाहीं हे) जाणून तिने धैर्य धारण केले. ॥ ३ ॥

पुनि पुनि मिलति परति गहि चरना। परम प्रेमु कछु जाइ न बरना॥
सब नारिन्ह मिलि भेटि भवानी। जाइ जननि उर पुनि लपटानी॥

मैना वारंवार अलिंगन देते आणि तिच्या चरणाला पकडते. फारच फार प्रेम आहे. त्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही. भवानीजी सर्व स्त्रीयांची भेट घेऊन मातेच्या गळ्यात पडली. ॥ ४ ॥

छं०— **जननिहि बहुरि मिलि चली उचित असीस सब काहूँ दई।**
फिर फिरि बिलोकति मातु तन तब सखीं लै सिव पहिं गई॥
जाचक सकल संतोषि संकरु उमा सहित भवन चले।
सब अमर हरषे सुमन बरषि निसान नभ बाजे भले॥

पार्वती पुन्हा मातेला भेटून निघाली. सर्वांनी तिला यथायोग्य आशीर्वाद दिले. पार्वती पुन्हा पुन्हा फिरून मातेकडे पाहते. तेव्हा सख्या तिला शिवजीजवळ नेतात. महादेवजी सर्व याचकांना संतुष्ट करून पार्वतीला बरोबर घेऊन आपल्या घरी (कैलास) निघाले. सर्व देवता प्रसन्न होऊन फुलांचा वर्षाव करू लागले आणि आकाशात सुंदर नगारे वाजू लागले.

दो०— **चले संग हिमवंतु तब पहुँचावन अति हेतु।**
बिबिध भाँति परितोषु करि बिदा कीन्ह बृषकेतु॥ १०२॥

तेव्हा हिमवान अत्यंत प्रेमाने शिवजींना पोहोचविण्यासाठी बरोबर निघाले. वृषेकेतुने (शिवजीने) अनेक प्रकाराने त्यांचा संतोष करून त्यांना विदा केले. ॥ १०२ ॥

तुरत भवन आए गिरिराई। सकल सैल सर लिए बोलाई॥
आदर दान बिनय बहुमाना। सब कर बिदा कीन्ह हिमवाना॥

पर्वतराज हिमाचल लगेच घरी आले आणि त्यांनी सर्व पर्वतांना आणि सरोवरांना बोलावले. त्यांनी आदर, दान, विनय आणि खूप सन्मानपूर्वक सर्वांची बोळवण केली. ॥ १ ॥

जबहिं संभु कैलासहिं आए। सुर सब निज निज लोक सिधाए॥
जगत मातु पितु संभु भवानी। तेहिं सिंगारु न कहउँ बखानी॥

जेव्हा शिवजी कैलास पर्वतावर पोहचले तेव्हा सर्व देवता आपापल्या लोकात निघून गेल्या. (तुलसीदासजी म्हणतात की,) पार्वती आणि शिवजी जगताचे माता-पिता आहेत. म्हणून मी त्यांच्या शृंगाराचे वर्णन करीत नाही. ॥ २ ॥

करहिं बिबिध बिधि भोग बिलासा। गनन्ह समेत बसहिं कैलासा॥
हर गिरिजा बिहार नित नयऊ। एहि बिधि बिपुल काल चलि गयऊ॥

शिव-पार्वती विविध प्रकाराचे भोग-विलास करीत आपल्या गणांसह कैलासावर राहू लागले. ते नित्य नवा विहार करत होते. अशाप्रकारे पुष्कळ काळ लोटला. ॥ ३ ॥

तब जनमेउ षटबदन कुमारा। तारकु असुरु समर जेहिं मारा॥
आगम निगम प्रसिद्ध पुराना। षन्मुख जन्मु सकल जग जाना॥

तेव्हा सहा मुखे असलेल्या पुत्राचा (कार्तिक स्वामीचा) जन्म झाला. ज्यांनी (मोठे झाल्यावर) युद्धात तारकासुराला ठार केले. वेद, शास्त्र आणि पुराणांमध्ये कार्तिकस्वामीच्या जन्माची कथा प्रसिद्ध आहे आणि सर्व जगत त्याला जाणते. ॥ ४ ॥

छं०— जगु जान षन्मुख जन्मु कर्मु प्रतापु पुरुषारथु महा।
तेहि हेतु मैं बृषकेतु सुत कर चरित संछेपहिं कहा॥
यह उमा संभु बिबाहु जे नर नारि कहहिं जे गावहीं।
कल्यान काज बिबाह मंगल सर्बदा सुखु पावहीं॥

षडाननाचा (कार्तिकस्वामीचा) जन्म, कर्म, प्रताप आणि त्याच्या महान पुरुषार्थाला सारे जगत जाणते. म्हणून मी वृषकेतूच्या (शिवजींच्या) पुत्राचे चरित्र संक्षेपाने सांगितले आहे. शिव-पार्वतीचा विवाह कथा जे स्त्री-पुरुष सांगतील आणि गातील ते कल्याण कार्यात आणि विवाहादी मंगल कार्यात सदा सुख पावतील.

दो०— चरित सिंधु गिरिजा रमन बेद न पावहिं पारु।
बरनै तुलसीदासु किमि अति मतिमंद गवाँरु॥ १०३॥

गिरिजापती महादेवाचे चरित्र समुद्रासारखे अपार आहे. त्याचा वेदाला सुद्धा पार लागत नाही मग अत्यंत मंदबुद्धी आणि ग्रामीण तुलसीदास त्याचे कसे वर्णन करू शकतो? ॥ १०३ ॥

संभु चरित सुनि सरस सुहावा। भरद्वाज मुनि अति सुखु पावा॥
बहु लालसा कथा पर बाढ़ी। नयनन्हि नीरु रोमावलि ठाढ़ी॥

शिवजींचे रसयुक्त आणि मधुर चरित्र श्रवण करून भरद्वाजऋषिंना फारच सुख झाले. कथा श्रवण करण्याची त्यांची लालसा फार वाढली. त्यांचे डोळे भरून आले आणि रोमांच उभे राहिले. ॥ १ ॥

प्रेम बिबस मुख आव न बानी। दसा देखि हरषे मुनि ग्यानी॥
अहो धन्य तव जन्मु मुनीसा। तुम्हहि प्रान सम प्रिय गौरीसा॥

ते प्रेममग्न झाले, तोंडावाटे शब्द निघेना. त्यांची ही अवस्था पाहून ज्ञानी याज्ञवल्क्यमुनी फार

प्रसन्न झाले. (आणि म्हणाले—) हे मुनीश! अहाहा! तुमचा जन्म धन्य आहे. तुम्हाला गौरी पती शिवजी प्राणासमान प्यारे आहेत. ॥ २ ॥

सिव पद कमल जिन्हहि रति नाहीं। रामहि ते सपनेहुँ न सोहाहीं॥
बिनु छल बिस्वनाथ पद नेहू। राम भगत कर लच्छन एहू॥

शिवजींच्या चरणकमली ज्यांना प्रीती नाही, ते श्रीरामचंद्रजींना स्वप्नात सुद्धा प्रिय होत नाहीत. विश्वनाथ शिवजींच्या चरणी निष्कपट (विशुद्ध) प्रेम होणे हेच रामभक्ताचे खरे लक्षण आहे. ॥ ३ ॥

सिव सम को रघुपति ब्रतधारी। बिनु अघ तजी सती असि नारी॥
पनु करि रघुपति भगति देखाई। को सिव सम रामहि प्रिय भाई॥

शिवजीसारखे श्रीरघुनाथजींच्या भक्तीचे व्रत धारण करणारे कोण आहे? ज्यांनी निष्पाप सती-सारख्या पत्नीचा त्याग केला आणि प्रतिज्ञा करून रामभक्तीचे रक्षण केले. विचार करा! श्रीरामजींना शिवजीसारखे दुसरे कोण प्रिय आहे? ॥ ४ ॥

दो०— **प्रथमहिं मैं कहि सिव चरित बूझा मरमु तुम्हार।**
सुचि सेवक तुम्ह राम के रहित समस्त बिकार॥ १०४॥

मी प्रथमच तुम्हाला शिवचरित्र सांगून तुमचा भाव समजून घेतला. तुम्ही श्रीरामचंद्रजींचे पवित्र सेवक आहात आणि समस्त दोषरहित आहात. ॥ १०४ ॥

मैं जाना तुम्हार गुन सीला। कहउँ सुनहु अब रघुपति लीला॥
सुनु मुनि आजु समागम तोरें। कहि न जाइ जस सुखु मन मोरें॥

मी तुमचे गुण आणि शील जाणून घेतले. आता मी श्रीरघुनाथजींची लीला सांगतो. हे मुनी! ऐका, आज तुमच्या भेटीने माझ्या मनाला जो आनंद झाला आहे तो सांगू शकत नाही. ॥ १ ॥

राम चरित अति अमित मुनीसा। कहि न सकहिं सत कोटि अहीसा॥
तदपि जथाश्रुत कहउँ बखानी। सुमिरि गिरापति प्रभु धनुपानी॥

हे मुनीश्वर! रामचरित अत्यंत अपार आहे. शंभर कोटी शेष सुद्धा ते सांगू शकत नाहीत. तरीही मी जसे ऐकले आहे, तसे वाणीचे स्वामी (प्रेरक) आणि हातात धनुष्य धारण करणारे प्रभू श्रीरामचंद्रजींचे स्मरण करून सांगतो. ॥ २ ॥

सारद दारुनारि सम स्वामी। रामु सूत्रधर अंतरजामी॥
जेहि पर कृपा करहिं जनु जानी। कबि उर अजिर नचावहिं बानी॥

सरस्वती कठपुतळीसारखी आहे आणि अंतर्यामी स्वामी श्रीरामचंद्रजी (दोरीने कठपुतळीला नाचविणारे) सूत्रधार आहेत. आपला भक्त जाणून ज्या कवीवर ते कृपा करतात त्याच्या हृदयरूपी अंगणात सरस्वतीला ते नाचवितात. ॥ ३ ॥

प्रनवउँ सोइ कृपाल रघुनाथा। बरनउँ बिसद तासु गुन गाथा॥
परम रम्य गिरिबरु कैलासू। सदा जहाँ सिव उमा निवासू॥

त्याच कृपाळू श्रीरघुनाथजींना मी प्रणाम करतो आणि त्यांच्याच निर्मळ गुणांची कथा सांगतो. कैलास सर्व पर्वतांमध्ये श्रेष्ठ आणि फारच रमणीय आहे, जेथे शिव-पार्वतीजी सदा निवास करतात. ॥ ४ ॥

दो०— **सिद्ध तपोधन जोगिजन सुर किंनर मुनिबृंद।**
बसहिं तहाँ सुकृती सकल सेवहिं सिव सुखकंद॥ १०५॥

सिद्ध, तपस्वी, योगीजन, देवता, किन्नर आणि मुनींचे समूह त्या पर्वतावर राहतात. ते सर्व महान पुण्यवान आहेत आणि आनंदकन्द महोदवजींची सेवा करतात. ॥ १०५ ॥

हरि हर बिमुख धर्म रति नाहीं। ते नर तहँ सपनेहुँ नहिं जाहीं॥
तेहि गिरि पर बट बिटप बिसाला। नित नूतन सुंदर सब काला॥

जे भगवान् विष्णु आणि महादेवजी पासून विन्मुख आहेत आणि ज्यांचे धर्मात प्रेम नाही, ते लोक स्वप्नात सुद्धा तेथे जाऊ शकत नाहीत. त्या पर्वतावर एक विशाल वडाचे झाड आहे जे नित्य नवीन आणि सर्व काळात (साही ऋतून) सुंदर राहते. ॥ १ ॥

त्रिबिध समीर सुसीतलि छाया। सिव बिश्राम बिटप श्रुति गाया॥
एक बार तेहि तर प्रभु गयऊ। तरु बिलोकि उर अति सुखु भयऊ॥

तेथे तिन्ही प्रकारचा (शीतल, मंद आणि सुगंध) वायू वाहत राहतो आणि त्या वृक्षाची सावली फार थंड असते. ज्या वृक्षाबद्दल वेदाने गायले आहे, एकदा प्रभू शिवजी त्या वृक्षाखाली गेले आणि त्याला पाहून त्यांच्या हृदयाला फार आनंद झाला. तो वृक्ष शिवजींचे विश्राम स्थान आहे. ॥ २ ॥

निज कर डासि नागरिपु छाला। बैठे सहजहिं संभु कृपाला॥
कुंद इंदु दर गौर सरीरा। भुज प्रलंब परिधन मुनिचीरा॥

स्वत:च्या हाताने व्याघ्रांवर अंथरून कृपाळू शिवजी सहजच (कोणत्याही विशेष प्रयोजनाशिवाय) तेथे बसले. कुंदाची फुले, चंद्रमा आणि शंखासमान त्यांचे गौरवर्णी शरीर होते. फारच लांब हात होते आणि त्यांनी मुनींसारखे (वल्कल) वस्त्र धारण केले होते. ॥ ३ ॥

तरुन अरुन अंबुज सम चरना। नख दुति भगत हृदय तम हरना॥
भुजग भूति भूषन त्रिपुरारी। आननु सरद चंद छबि हारी॥

त्यांचे चरण नवीन (पूर्णरूपाने उमललेले) लाल कमळासारखे होते. नखांची ज्योती भक्तांच्या हृदयातला अंधकार हरण करणारी होती. सर्प आणि भस्म हीच त्यांची भूषणे होती. त्या त्रिपुरासुराचे शत्रू असलेल्या शिवजींचे मुख शरद ऋतूतील (पौर्णिमेच्या) चंद्रमाच्या शोभेला सुद्धा हरण करणारे (फीके करणारे) होते. ॥ ४ ॥

दो०— **जटा मुकुट सुरसरित सिर लोचन नलिन बिसाल।**
नीलकंठ लावन्यनिधि सोह बालबिधु भाल॥ १०६॥

त्यांच्या मस्तकावर जटांचा मुकुट आणि गंगाजी (शोभायमान) होती. कमळासारखे मोठ-मोठे नेत्र होते. त्यांचा कंठ निळा होता आणि ते सौंदर्याचे भांडार होते. त्यांच्या भाळी द्वितीयेचा चंद्रमा शोभत होता. ॥ १०६ ॥

बैठे सोह कामरिपु कैसें। धरें सरीरु सांतरसु जैसें॥
पारबती भल अवसरु जानी। गईं संभु पहिं मातु भवानी॥

कामदेवाचे शत्रू शिवजी तेथे बसलेले असे शोभत होते, जणू शांत रसच शरीर धारण करून बसला आहे. चांगली संधी पाहून शिवपत्नी माता पार्वती त्यांच्याजवळ गेली. ॥ १ ॥

जानि प्रिया आदरु अति कीन्हा। बाम भाग आसनु हर दीन्हा॥
बैठीं सिव समीप हरषाई। पूरुब जन्म कथा चित आई॥

स्वत:ची प्रिय पत्नी पाहून शिवजीने तिचा फार आदर सत्कार केला आणि आपल्या डाव्या बाजूला बसण्यासाठी तिला आसन दिले. पार्वती प्रसन्न होऊन शिवजीजवळ बसली. तिला मागील जन्माच्या कथेचे स्मरण झाले. ॥ २ ॥

पति हियँ हेतु अधिक अनुमानी। बिहसि उमा बोलीं प्रिय बानी॥
कथा जो सकल लोक हितकारी। सोइ पूछन चह सैलकुमारी॥

स्वामींच्या हृदयात आपल्यावर (पूर्वीपेक्षा) अधिक प्रेम आहे असे जाणून पार्वतीने हास्य करीत प्रिय वचन उद्गारले. (याज्ञवल्क्य म्हणतात की,) जी कथा लोकांचे हित करणारी आहे तीच पार्वती विचारू इच्छिते. ॥ ३ ॥

बिस्वनाथ मम नाथ पुरारी। त्रिभुवन महिमा बिदित तुम्हारी॥
चर अरु अचर नाग नर देवा। सकल करहिं पद पंकज सेवा॥

(पार्वतीजी म्हणाली—) हे संसाराचे स्वामी! हे माझे नाथ! हे त्रिपुरासुराचा वध करणारे! तुमचे माहात्म्य तिन्ही लोकात विख्यात आहे. चर, अचर, नाग, मानव आणि देवता सर्वच आपल्या चरण-कमलांची सेवा करतात. ॥४॥

दो०— **प्रभु समरथ सर्बग्य सिव सकल कला गुन धाम।**
जोग ग्यान बैराग्य निधि प्रनत कलपतरु नाम॥ १०७॥

हे प्रभो! आपण समर्थ, सर्वज्ञ आणि कल्याणस्वरूपी आहात. सर्व कला आणि गुणांचे निधान आहात. योग, ज्ञान तसेच वैराग्याचे भांडार आहात. आपले नाम शरणागतांसाठी कल्पवृक्ष आहे. ॥ १०७ ॥

जौं मो पर प्रसन्न सुखरासी। जानिअ सत्य मोहि निज दासी॥
तौ प्रभु हरहु मोर अग्याना। कहि रघुनाथ कथा बिधि नाना॥

हे सुखराशी! जर आपण माझ्यावर प्रसन्न असाल आणि खरोखर मला आपली दासी (अथवा खरी दासी) मानत असाल, तर हे प्रभो! आपण मला श्रीरघुनाथजींच्या नाना प्रकारच्या कथा सांगून माझे अज्ञान नाहीसे करा. ॥ १ ॥

जासु भवनु सुरतरु तर होई। सहि कि दरिद्र जनित दुखु सोई॥
ससिभूषन अस हृदयँ बिचारी। हरहु नाथ मम मति भ्रम भारी॥

ज्याचे घर कल्पवृक्षाच्या खाली आहे, तो मग दारिद्र्याचे दु:ख का सहन करील? हे शशिभूषण! हे नाथ! हृदयामध्ये असा विचार करून माझ्या बुद्धीच्या मोठ्या भ्रमाला नाहीसे करा. ॥ २ ॥

प्रभु जे मुनि परमारथबादी। कहहिं राम कहुँ ब्रह्म अनादी॥
सेस सारदा बेद पुराना। सकल करहिं रघुपति गुन गाना॥

हे प्रभो! जे परमार्थ तत्त्वाचे ज्ञाता आणि वक्ता मुनी आहेत ते श्रीरामचंद्रजींना अनादी ब्रह्म म्हणतात आणि शेष, सरस्वती, वेद आणि पुराण सर्वच त्यांचे गुण गातात. ॥ ३ ॥

तुम्ह पुनि राम राम दिन राती। सादर जपहु अनँग आराती॥
रामु सो अवध नृपति सुत सोई। की अज अगुन अलखगति कोई॥

आणि हे कामदेवाचे शत्रू! आपण स्वत: रात्रंदिवस आदराने राम नाम जपता. हे राम तेच अयोध्येच्या राजाचे पुत्र आहेत? अथवा अजन्मा, निर्गुण आणि अगोचर कोणी दुसरे राम आहेत? ॥ ४ ॥

दो०— **जौं नृप तनय त ब्रह्म किमि नारि बिरहँ मति भोरि।**
देखि चरित महिमा सुनत भ्रमति बुद्धि अति मोरि॥ १०८॥

जर ते राजपुत्र तर ब्रह्म कसे? (आणि जर ब्रह्म आहे तर) पत्नीच्या विरहात त्यांची मती कशी भ्रमित झाली? इकडे त्यांचे असे चरित्र पाहून आणि तिकडे त्यांचे माहात्म्य ऐकून माझी बुद्धी अत्यंत भ्रमित होत आहे. ॥ १०८ ॥

जौं अनीह ब्यापक बिभु कोऊ। कहहु बुझाइ नाथ मोहि सोऊ॥
अग्य जानि रिस उर जनि धरहू। जेहि बिधि मोह मिटै सोइ करहू॥

जर इच्छारहित, व्यापक, समर्थ ब्रह्म कोणी दुसरे आहे तर हे नाथ! मला ते समजावून सांगा. मला अज्ञानी समजून मनात क्रोध आणू नका. जेणेकरून माझा मोह दूर होईल असे करा. ॥ १ ॥

मैं बन दीखि राम प्रभुताई। अति भय बिकल न तुम्हहि सुनाई॥
तदपि मलिन मन बोधु न आवा। सो फलु भली भाँति हम पावा॥

मी (मागच्या जन्मात) वनात श्रीरामचंद्रप्रभूंची प्रभुता पाहिली होती, परंतु अत्यंत भयभीत झाल्यामुळे मी ती गोष्ट आपणाला सांगितली नाही. तरीही माझ्या मलिन मनाला बोध झाला नाही. त्याचे फल सुद्धा मला भरपूर मिळाले. ॥ २ ॥

अजहूँ कछु संसउ मन मोरें। करहु कृपा बिनवउँ कर जोरें॥
प्रभु तब मोहि बहु भाँति प्रबोधा। नाथ सो समुझि करहु जनि क्रोधा॥

अजूनही माझ्या मनात काही संदेह आहे. आपण कृपा करा, मी हात जोडून विनंती करते. हे प्रभो! तुम्ही त्यावेळी मला पुष्कळ प्रकाराने समजाविले होते (तरीही माझा संदेह गेला नाही.) हे नाथ! हे आठवून माझ्यावर क्रोध करू नका. ॥ ३ ॥

तब कर अस बिमोह अब नाहीं। रामकथा पर रुचि मन माहीं॥
कहहु पुनीत राम गुन गाथा। भुजगराज भूषन सुरनाथा॥

मला आता पूर्वीसारखा मोह नाही. आता तर माझ्या मनामध्ये रामकथा ऐकण्याची रुची आहे. हे शेष नागाला अलंकाररूपाने धारण करणारे देवतांचे नाथ! आपण श्रीरामचंद्रजींच्या गुणांची पवित्र कथा मला सांगा. ॥ ४ ॥

दो०— **बंदउँ पद धरि धरनि सिरु बिनय करउँ कर जोरि।**
बरनहु रघुबर बिसद जसु श्रुति सिद्धांत निचोरि॥ १०९॥

मी पृथ्वीवर मस्तक टेकवून आपल्या चरणांची वंदना करते. आपण वेदांताच्या सिद्धांताचा सार काढून श्रीरघुनाथजींचे निर्मळ यश वर्णन करा. ॥ १०९ ॥

जदपि जोषिता नहिं अधिकारी। दासी मन क्रम बचन तुम्हारी॥
गूढ़उ तत्त्व न साधु दुरावहिं। आरत अधिकारी जहँ पावहिं॥

जरी मी स्त्री असल्यामुळे ते ऐकण्याची अधिकारिणी नाही, तरी पण मी मन, वचन आणि कर्माने आपली दासी आहे. संतांना जेव्हा आर्त अधिकारी मिळतात तेव्हा ते गूढतत्त्व सुद्धा त्यांच्यापासून लपवित नाहीत. ॥ १ ॥

अति आरति पूछउँ सुरराया। रघुपति कथा कहहु करि दाया॥
प्रथम सो कारन कहहु बिचारी। निर्गुन ब्रह्म सगुन बपु धारी॥

हे देवतांचे स्वामी! मी खूप आर्तभावाने (दीनतेने) विचारीत आहे आपण माझ्यावर कृपा करून श्रीरघुनाथजींची कथा सांगा. प्रथम तर ते कारण विचार करून सांगा की, ज्यामुळे निर्गुण ब्रह्म सगुणरूप धारण करते. ॥ २ ॥

पुनि प्रभु कहहु राम अवतारा। बालचरित पुनि कहहु उदारा॥
कहहु जथा जानकी बिबाहीं। राज तजा सो दूषन काहीं॥

नंतर हे प्रभू! श्रीरामचंद्रजींच्या अवताराची (जन्म) कथा सांगा तसेच त्यांचे उदार बालचरित्र सांगा. त्यानंतर त्यांनी जानकीशी विवाह कसा केला ती कथा सांगा. तसेच त्यांनी राज्याचा त्याग कोणत्या दोषामुळे केला ते सविस्तर सांगा. ॥ ३ ॥

बन बसि कीन्हे चरित अपारा। कहहु नाथ जिमि रावन मारा॥
राज बैठि कीन्हीं बहु लीला। सकल कहहु संकर सुखसीला॥

हे नाथ! त्यांनी वनात राहून जे अपार चरित्र केले तसेच रावणाला कशा प्रकारे ठार केले ते सांगा. हे सुखस्वरूप शंकर! आपण त्या लीला सांगा ज्या त्यांनी राज्यावर (सिंहासनावर) बसल्यावर केल्या होत्या. ॥ ४ ॥

दो०— **बहुरि कहहु करुनायतन कीन्ह जो अचरज राम।**
प्रजा सहित रघुबंसमनि किमि गवने निज धाम॥ ११०॥

हे कृपाधाम! ते रघुकुल शिरोमणी प्रजेसह आपल्या धामाला कशाप्रकारे गेले. ते श्रीरामचंद्रजींचे अद्भुत चरित्र वर्णन करा. ॥ ११० ॥

पुनि प्रभु कहहु सो तत्त्व बखानी। जेहिं बिग्यान मगन मुनि ग्यानी॥
भगति ग्यान बिग्यान बिरागा। पुनि सब बरनहु सहित बिभागा॥

हे प्रभू! त्यानंतर आपण त्या तत्त्वाला समजावून सांगा, ज्याच्या अनुभूतीत ज्ञानी मुनिजन सदा मग्न राहतात. भक्ती, ज्ञान, विज्ञान आणि वैराग्य यांचे विभागासह वर्णन करा. ॥ १ ॥

औरउ राम रहस्य अनेका। कहहु नाथ अति बिमल बिबेका॥
जो प्रभु मैं पूछा नहिं होई। सोउ दयाल राखहु जनि गोई॥

(त्याशिवाय) श्रीरामचंद्रजींची अजूनही जी अनेक रहस्ये (लपलेले भाव अथवा चरित्र) आहेत ती सांगा. हे नाथ! आपले ज्ञान अत्यंत निर्मळ आहे. हे प्रभो! जी गोष्ट मी विचारली नसेल, हे दयाळू! तीही आपण लपवून ठेवू नये. ॥ २ ॥

तुम्ह त्रिभुवन गुर बेद बखाना। आन जीव पाँवर का जाना॥
प्रस्न उमा कै सहज सुहाई। छल बिहीन सुनि सिव मन भाई॥

वेदांनी आपणाला तिन्ही लोकांचा गुरू म्हटले आहे. दूसरे पामर जीव हे रहस्य कसे जाणतील! पार्वतीचे सहज सुंदर आणि कपटरहित (सरळ) प्रश्न ऐकून शिवजी फार प्रसन्न झाले. ॥ ३ ॥

हर हियँ रामचरित सब आए। प्रेम पुलक लोचन जल छाए॥
श्रीरघुनाथ रूप उर आवा। परमानंद अमित सुख पावा॥

महादेवजींच्या अंत:करणात सर्व रामचरित्र प्रगट झाले. प्रेमामुळे त्यांचे शरीर पुलकित झाले आणि नेत्र पाणावले. श्री रघुनाथजींचे रूप त्यांच्या हृदयात प्रगट झाले. त्यामुळे स्वयं परमानंदस्वरूपी असलेल्या शिवजींना सुद्धा अपार सुख प्राप्त झाले. ॥ ४ ॥

दो०— **मगन ध्यान रस दंड जुग पुनि मन बाहेर कीन्ह।**
रघुपति चरित महेस तब हरषित बरनै लीन्ह॥ १११॥

शिवजी दोन घडीपर्यंत ध्यानाच्या रसात (आनंदात) बुडून राहिले. नंतर त्यांनी मनाला बाहेर खेचले आणि ते प्रसन्न होऊन श्रीरघुनाथजींचे चरित्र वर्णन करू लागले. ॥ १११ ॥

झूठेउ सत्य जाहि बिनु जानें। जिमि भुजंग बिनु रजु पहिचानें॥
जेहि जानें जग जाइ हेराई। जागें जथा सपन भ्रम जाई॥

जसे अज्ञानाने दोरीवर सर्पाचा भ्रम होतो, तसे अज्ञानाने खोटेदेखील सत्य वाटू लागते आणि जसे जागे झाल्यावर स्वप्नाचा भ्रम नाहीसा होतो तसे (श्रीरामाचे) ज्ञान झाल्यावर जगताचा लोप होतो. ॥ १ ॥

बंदउँ बालरूप सोइ रामू। सब सिधि सुलभ जपत जिसु नामू॥
मंगल भवन अमंगल हारी। द्रवउ सो दसरथ अजिर बिहारी॥

मी त्याच श्रीरामचंद्रजींच्या बालरूपाची वंदना करतो ज्यांचे नाम जपल्याने सर्व सिद्धी सहजच प्राप्त होतात. मंगल धाम अमंगलहारी असे दशरथाचे अंगणात खेळणारे त्या (बालरूप) श्रीरामचंद्रजींनी माझ्यावर कृपा करावी. ॥ २ ॥

करि प्रनाम रामहि त्रिपुरारी। हरषि सुधा सम गिरा उचारी॥
धन्य धन्य गिरिराजकुमारी। तुम्ह समान नहिं कोउ उपकारी॥

त्रिपुरासुराचा वध करणारे शिवजी श्रीरामचंद्रजींना प्रणाम करून आनंदमग्न होऊन अमृतासारखी वचने बोलू लागले—हे गिरिराजकुमारी पार्वती! तू धन्य आहेस! धन्य आहेस! तुझ्यासारखा दुसरा कोणी परोपकारी नाही. ॥ ३ ॥

पूँछेहु रघुपति कथा प्रसंगा। सकल लोक जग पावनि गंगा॥
तुम्ह रघुबीर चरन अनुरागी। कीन्हिहु प्रस्न जगत हित लागी॥

तू श्रीरघुनाथजींच्या ज्या कथेचा प्रसंग विचारला आहेस ती कथा समस्त लोकांसाठी पवित्र करणाऱ्या गंगेसारखी आहे. जगताच्या कल्याणासाठीच तू हे प्रश्न विचारले आहेस. तू श्रीरघुनाथजींच्या चरणांवर प्रेम करणारी आहेस. ॥ ४ ॥

दो०— **राम कृपा तें पारबति सपनेहुँ तव मन माहिं।**
सोक मोह संदेह भ्रम मम बिचार कछु नाहिं॥ ११२॥

हे पार्वती! माझ्या मताप्रमाणे तर श्रीरामांच्या कृपेने स्वप्नातसुद्धा तुझ्या मनात शोक, मोह, संदेह आणि भ्रम काहीही नाही. ॥ ११२ ॥

तदपि असंका कीन्हिहु सोई। कहत सुनत सब कर हित होई॥
जिन्ह हरिकथा सुनी नहिं काना। श्रवन रंध्र अहिभवन समाना॥

तरीही तू तीच (जुनी) शंका केली आहेस की, ज्यामुळे या प्रसंगाच्या सांगण्या-ऐकण्याने सर्वांचे कल्याण होईल. ज्यांनी आपल्या कानांनी भगवत्कथा ऐकली नाही त्यांच्या कानांची छिद्रे सर्पाच्या बिळासारखी आहेत. ॥ १ ॥

नयनन्हि संत दरस नहिं देखा। लोचन मोरपंख कर लेखा॥
ते सिर कटु तुंबरि समतूला। जे न नमत हरि गुर पद मूला॥

ज्यांनी आपल्या डोळ्यांनी संतांचे दर्शन केले नाही, त्यांचे ते नेत्र मोरांच्या पंखावर दिसणाऱ्या नकली डोळ्याप्रमाणे आहेत. ज्यांची मस्तके श्रीहरि आणि श्रीगुरू चरणांवर झुकत नाहीत ती मस्तके कडू भोपळ्यासारखी आहेत. ॥ २ ॥

जिन्ह हरिभगति हृदयँ नहिं आनी। जीवत सव समान तेइ प्रानी॥
जो नहिं करइ राम गुन गाना। जीह सो दादुर जीह समाना॥

ज्यांनी भगवंताच्या भक्तीला आपल्या हृदयात स्थान दिले नाही, ते प्राणी जिवंत असूनही प्रेतासारखे आहेत. जी जीभ श्रीरामचंद्रांच्या गुणांचे गायन करीत नाही, ती बेडकाच्या जीभेसारखी आहे. ॥ ३ ॥

कुलिस कठोर निठुर सोइ छाती। सुनि हरिचरित न जो हरषाती॥
गिरिजा सुनहु राम कै लीला। सुर हित दनुज बिमोहनसीला॥

ते हृदय वज्रासारखे कठोर आणि निष्ठुर आहे, जे भगवंताचे चरित्र ऐकून हर्षित होत नाही. हे पार्वती! श्रीरामचंद्रांची लीला ऐक. ही देवतांचे कल्याण करणारी आणि दैत्यांना विशेषरूपाने मोहित करणारी आहे. ॥ ४ ॥

दो०— **रामकथा सुरधेनु सम सेवत सब सुख दानि।**
सतसमाज सुरलोक सब को न सुनै अस जानि॥ ११३॥

श्रीरामचंद्रांची कथा कामधेनूसारखी सेवा करण्याने सर्व सुखांना देणारी आहे आणि सत्पुरुषांचे समाज हेच सर्व देवतांचे लोक आहेत, असे म्हणून याचे कोण श्रवण करणार नाही? ॥ ११३ ॥

रामकथा सुंदर कर तारी। संसय बिहग उड़ावनिहारी॥
रामकथा कलि बिटप कुठारी। सादर सुनु गिरिराजकुमारी॥

श्रीरामचंद्रांची कथा हाताची सुंदर टाळी आहे जी संदेहरूपी पक्ष्यांना उडवून देते. तसेच ही रामकथा कलियुगरूपी वृक्षाला तोडण्यासाठी कुऱ्हाड आहे. हे गिरिराजकुमारी! तू ही कथा आदराने ऐक. ॥ १ ॥

राम नाम गुन चरित सुहाए। जनम करम अगनित श्रुति गाए॥
जथा अनंत राम भगवाना। तथा कथा कीरति गुन नाना॥

वेदांनी श्रीरामचंद्रजींचे सुंदर नाम, गुण, चरित्र, जन्म आणि कर्म अगणित सांगितले आहेत. ज्याप्रमाणे भगवान् श्रीरामजी अनंत आहेत त्याचप्रमाणे त्यांची कथा, कीर्ती आणि गुणसुद्धा अनंत आहेत. ॥ २ ॥

तदपि जथा श्रुत जसि मति मोरी। कहिहउँ देखि प्रीति अति तोरी॥
उमा प्रस्न तव सहज सुहाई। सुखद संतसंमत मोहि भाई॥

तरीही तुझी अत्यंत प्रीती पाहून जसे काही मी ऐकले आहे आणि जशी माझी बुद्धी आहे त्यानुसार मी सांगतो. हे पार्वती! तुझा प्रश्न स्वाभाविकच सुंदर, सुखदायक आणि संत सम्मत आहे आणि मला तर फारच आवडला आहे. ॥ ३ ॥

एक बात नहिं मोहि सोहानी। जदपि मोह बस कहेहु भवानी॥
तुम्ह जो कहा राम कोउ आना। जेहि श्रुति गाव धरहिं मुनि ध्याना॥

परंतु हे पार्वती! एक गोष्ट मला आवडली नाही, जरी ती तू मोहाला वश होऊनच म्हटली आहेस. तू जे म्हणाली की, ते राम कोणी दुसरे आहेत ज्यांना वेद गातात आणि मुनिगण ज्यांचे ध्यान करतात. ॥ ४ ॥

दो०— **कहहिं सुनहिं अस अधम नर ग्रसे जे मोह पिसाच।**
पाषंडी हरि पद बिमुख जानहिं झूठ न साच॥ ११४॥

जे मोहरूपी पिशाचाने ग्रस्त आहेत, पाखंडी आहेत, भगवत् चरणापासून विमुख आहेत आणि जे सत्य-असत्य काहीही जाणत नाहीत, अशी अधम माणसेच याप्रमाणे बोलतात, ऐकतात. ॥ ११४ ॥

अग्य अकोबिद अंध अभागी। काई बिषय मुकुर मन लागी॥
लंपट कपटी कुटिल बिसेषी। सपनेहुँ संतसभा नहिं देखी॥

जे अज्ञानी, मूर्ख, आंधळे आणि भाग्यहीन आहेत आणि ज्यांच्या मनरूपी दर्पणावर विषयरूपी धूळ जमलेली आहे, जे व्यभिचारी, कपटी आणि कुटिल आहेत तसेच ज्यांना स्वप्नातसुद्धा कधी संत समाजाचे दर्शनही झालेले नाही. ॥ १ ॥

कहहिं ते बेद असंमत बानी। जिन्ह कें सूझ लाभु नहिं हानी॥
मुकुर मलिन अरु नयन बिहीना। राम रूप देखहिं किमि दीना॥

आणि ज्यांना आपला लाभ-हानी कळत नाही, तेच अशा वेदविरुद्ध गोष्टी बोलतात. ज्यांचे हृदयरूपी दर्पण मलिन आहे आणि जे नेत्रहीन आहेत, ते बिचारे श्रीरामचंद्रजींचे रूप कसे पाहतील! ॥ २ ॥

जिन्ह कें अगुन न सगुन बिबेका। जल्पहिं कल्पित बचन अनेका॥
हरिमाया बस जगत भ्रमाहीं। तिन्हहि कहत कछु अघटित नाहीं॥

ज्यांना निर्गुण-सगुणाचा काहीही विवेक नाही, जे अनेक मनमाने गोष्टी बरळतात, जे हरिच्या मायेला वश होऊन जगतात (जन्म-मृत्यूच्या चक्रात) भटकत राहतात, त्यांच्यासाठी काहीही बोलणे असंभव नाही. ॥ ३ ॥

बातुल भूत बिबस मतवारे। ते नहिं बोलहिं बचन बिचारे॥
जिन्ह कृत महामोह मद पाना। तिन्ह कर कहा करिअ नहिं काना॥

ज्यांना वायूरोग (सन्निपात, उन्माद इत्यादी) झाला आहे, जे भूताला वश झाले आहेत आणि जे

नशेत चूर आहेत,असेच लोक विचार करून बोलत नाहीत. जे महामोहरूपी मदिरा प्याले आहेत त्यांच्या बोलण्याकडे लक्षच देऊ नये. ॥ ४ ॥

सो०— **अस निज हृदयँ बिचारि तजु संसय भजु राम पद।**
सुनु गिरिराज कुमारि भ्रम तम रबि कर बचन मम ॥ ११५ ॥

आपल्या मनात असा विचार करून संदेह सोडून दे आणि श्रीरामजींच्या चरणांचे स्मरण कर. हे पार्वती! भ्रमरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी सूर्य किरणांसारखी माझी वचने ऐक. ॥ ११५ ॥

सगुनहि अगुनहि नहिं कछु भेदा। गावहिं मुनि पुरान बुध बेदा॥
अगुन अरूप अलख अज जोई। भगत प्रेम बस सगुन सो होई॥

सगुण आणि निगुर्णात काहीच भेद नाही. मुनी, पुराण, पंडित आणि वेद सर्वच असे म्हणतात. जे निर्गुण, अरूप (निराकार) अलख (अव्यक्त) आणि अजन्मा आहे. तेच भक्तांच्या प्रेमवश सगुण होते. ॥ १ ॥

जो गुन रहित सगुन सोइ कैसें। जलु हिम उपल बिलग नहिं जैसें॥
जासु नाम भ्रम तिमिर पतंगा। तेहि किमि कहिअ बिमोह प्रसंगा॥

जे निर्गुण आहे तेच सगुण कसे आहे? जसे पाणी आणि बर्फ यात भेद नाही. (दोन्ही जलच आहे, तसेच निर्गुण आणि सगुण एकच आहे.) ज्याचे नाम भ्रमरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी सूर्य आहे, त्याच्यासाठी मोह प्रसंग तरी कसा म्हणावा? ॥ २ ॥

राम सच्चिदानंद दिनेसा। नहिं तहँ मोह निसा लवलेसा॥
सहज प्रकासरूप भगवाना। नहिं तहँ पुनि बिग्यान बिहाना॥

श्रीरामजी सच्चिदानन्दस्वरूपी सूर्य आहेत. तेथे मोहरूपी रात्रीचा लवलेश सुद्धा नाही. ते स्वाभाविकच प्रकाशरूप आणि (षडैश्वर्य) भगवान् आहेत, तेथे तर विज्ञानरूपी प्रात:कालसुद्धा होत नाही. (अज्ञानरूपी रात्र असेल तर मग विज्ञानरूपी प्रात:काल होईल, भगवान तर नित्य ज्ञानस्वरूप आहेत.) ॥ ३ ॥

हरष बिषाद ग्यान अग्याना। जीव धर्म अहमिति अभिमाना॥
राम ब्रह्म ब्यापक जग जाना। परमानंद परेस पुराना॥

हर्ष, शोक, ज्ञान, अज्ञान, अहंता आणि अभिमान—हे सर्व जीवाचे धर्म आहेत. श्रीरामचंद्रजी तर व्यापक ब्रह्म, परमानन्दस्वरूप, परात्पर प्रभू आणि पुराण पुरुष आहेत. ही गोष्ट सर्व जगत जाणते. ॥ ४ ॥

दो०— **पुरुष प्रसिद्ध प्रकास निधि प्रगट परावर नाथ।**
रघुकुलमनि मम स्वामि सोइ कहि सिवँ नायउ माथ॥ ११६ ॥

जे (पुराण) पुरुष प्रसिद्ध आहेत, प्रकाशाचे भांडार आहेत, सर्व रूपात प्रगट आहेत; जीव, माया

आणि जगत् सर्वांचे स्वामी आहेत, तेच रघुकुलमणी श्रीराम माझे स्वामी आहेत—असे म्हणून शिवजींनी त्यांना वंदन केले. ॥ ११६ ॥

निज भ्रम नहिं समुझहिं अग्यानी। प्रभु पर मोह धरहिं जड़ प्रानी॥
जथा गगन घन पटल निहारी। झाँपेउ भानु कहहिं कुबिचारी॥

अज्ञानी माणसे स्वत:चा भ्रम तर जाणत नाहीत आणि ते मूर्ख प्रभू रामांवर अज्ञानाचा आरोप करतात, जसे आकाशात ढगांचा पडदा पाहून कुविचारी (अज्ञानी) लोक ढगांनी सूर्याला झाकले असे म्हणतात. ॥ १ ॥

चितव जो लोचन अंगुलि लाएँ। प्रगट जुगल ससि तेहि के भाएँ॥
उमा राम बिषइक अस मोहा। नभ तम धूम धूरि जिमि सोहा॥

जो मनुष्य डोळ्याला बोट लावून पाहतो त्याच्यासाठी दोन चंद्रमा प्रगट (प्रत्यक्ष) असतात. हे पार्वती! श्रीरामचंद्रजींच्या विषयात अशाप्रकारे मोहाची कल्पना करणे म्हणजे आकाशात अंधकार, धूर आणि धूळ दिसणे आहे. [आकाश जसे निर्मळ आणि निर्लेप आहे, त्याला कोणी मलिन करू शकत नाही आणि स्पर्शही करू शकत नाही, तसेच भगवान् श्रीराम नित्य निर्मळ आणि निर्लेप आहेत.] ॥ २ ॥

बिषय करन सुर जीव समेता। सकल एक तें एक सचेता॥
सब कर परम प्रकासक जोई। राम अनादि अवधपति सोई॥

विषय, इन्द्रिये, इन्द्रियांच्या देवता आणि जीवात्मा—हे सर्व एकामुळे एक चेतन होते. (अर्थात् विषयांचा प्रकाश इन्द्रियांपासून, इन्द्रियांचा इन्द्रियांच्या देवतांपासून आणि इन्द्रिय-देवतांचा चेतन जीवात्म्यापासून प्रकाश होतो.) या सर्वांचे जे परम प्रकाशक आहेत, (अर्थात् ज्यांच्यापासून हे सर्व जाणले जातात.) तेच अनादी ब्रह्म अयोध्यानरेश श्रीरामचंद्रजी आहेत. ॥ ३ ॥

जगत प्रकास्य प्रकासक रामू। मायाधीस ग्यान गुन धामू॥
जासु सत्यता तें जड़ माया। भास सत्य इव मोह सहाया॥

हे जगत प्रकाश्य आहे आणि श्रीरामचंद्रजी याचे प्रकाशक आहेत. ते मायेचे स्वामी आणि ज्ञान तसेच गुणांचे धाम आहेत. ज्यांच्या सत्तेने मोहाची साहाय्यता मिळवून जड माया सुद्धा सत्यासारखी भासते. ॥ ४ ॥

दो०— **रजत सीप महुँ भास जिमि जथा भानु कर बारि।**
जदपि मृषा तिहुँ काल सोइ भ्रम न सकइ कोउ टारि॥ ११७॥

जसे शिंपल्यात चांदीची आणि सूर्याच्या किरणांमध्ये पाण्याची (नसतानाही) प्रतीती होते. जरी ही प्रतीती त्रिकाल असत्य आहे, तरी पण हा भ्रम कोणीही हटवू शकत नाही. ॥ ११७ ॥

एहि बिधि जग हरि आश्रित रहई। जदपि असत्य देत दुख अहई॥
जौं सपनें सिर काटै कोई। बिनु जागें न दूरि दुख होई॥

तसेच हा संसार भगवंताच्या आश्रित राहतो. जरी हा असत्य आहे, तरीही दु:ख तर देतोच. जसे स्वप्नात एखाद्याचे मस्तक कापले तर जागे झाल्याशिवाय ते दु:ख दूर होत नाही. ॥ १ ॥

जासु कृपाँ अस भ्रम मिटि जाई। गिरिजा सोइ कृपाल रघुराई॥
आदि अंत कोउ जासु न पावा। मति अनुमानि निगम अस गावा॥

हे पार्वती! ज्यांच्या कृपेने अशा प्रकारचा भ्रम नाहीसा होतो, तेच कृपाळू श्रीरघुनाथजी आहेत. ज्यांचा आदि आणि अंत कोणालाही सापडला (जाणला) नाही. वेदांनी आपल्या बुद्धीने अनुमान करून अशा प्रकारे (खाली दिल्याप्रमाणे) गायले आहे. ॥ २ ॥

बिनु पद चलइ सुनइ बिनु काना। कर बिनु करम करइ बिधि नाना॥
आनन रहित सकल रस भोगी। बिनु बानी बकता बड़ जोगी॥

ते (ब्रह्म) पायाविना चालते, कानाविना ऐकते, हाताविना नाना प्रकारचे काम करते, मुखाविना (जीभ) च सर्व (सहा) रसांचा आनंद घेते आणि ते वाणीविना फार योग्य वक्ता आहे. ॥ ३ ॥

तन बिनु परस नयन बिनु देखा। ग्रहइ घ्रान बिनु बास असेषा॥
असि सब भाँति अलौकिक करनी। महिमा जासु जाइ नहिं बरनी॥

ते शरीरा (त्वचा) विना स्पर्श करते, डोळ्याविना पाहते आणि नाकाविना सर्व गंधांना ग्रहण करते (वास घेते). त्या ब्रह्माची करणी सर्वच प्रकाराने अशी अलौकिक आहे की, ज्याचे माहात्म्य अवर्णनीय आहे. ॥ ४ ॥

दो०— **जेहि इमि गावहिं बेद बुध जाहि धरहिं मुनि ध्यान।**
सोइ दसरथ सुत भगत हित कोसलपति भगवान॥ ११८॥

ज्याचे वेद अशा प्रकारे वर्णन करतात आणि मुनी ज्याचे ध्यान करतात, तेच दशरथनन्दन भक्तांचे हितकर्ते, अयोध्येचे स्वामी भगवान् श्रीराम आहेत. ॥ ११८ ॥

कासीं मरत जंतु अवलोकी। जासु नाम बल करउँ बिसोकी॥
सोइ प्रभु मोर चराचर स्वामी। रघुबर सब उर अंतरजामी॥

हे पार्वती! ज्यांच्या नामाच्या प्रतापाने काशीत देहत्याग करणाऱ्या जीवाला पाहून मी त्याला (राममंत्र देऊन) शोकरहित करतो (मुक्त करतो), तेच माझे प्रभू रघुकुलश्रेष्ठ श्रीरामचंद्रजी जड-चेतनाचे स्वामी आणि सर्वांच्या हृदयातील भाव जाणणारे आहेत. ॥ १ ॥

बिबसहुँ जासु नाम नर कहहीं। जनम अनेक रचित अघ दहहीं॥
सादर सुमिरन जे नर करहीं। भव बारिधि गोपद इव तरहीं॥

विवश होऊन (इच्छे बिना) सुद्धा ज्यांचे नाम घेतल्याने माणसाची अनेक जन्मात केलेली पापे जळून जातात. मग जी माणसे आदराने त्यांचे नामस्मरण करतात, ते तर संसाररूपी (दुस्तर) समुद्राला गायीच्या खुराने बनलेल्या खड्ड्यासारखे (अर्थात् परिश्रमाविना) पार करतात. ॥ २ ॥

राम सो परमातमा भवानी। तहँ भ्रम अति अबिहित तव बानी॥
अस संसय आनत उर माहीं। ग्यान बिराग सकल गुन जाहीं॥

हे पार्वती! तेच परमात्मा श्रीरामचंद्रजी आहेत. त्यांच्यात भ्रम (दिसतो) आहे असे तुझे म्हणणे अत्यंत अनुचित आहे. अशा प्रकारचा संदेह मनात आणताच मनुष्याचे ज्ञान, वैराग्य इत्यादी सर्व सद्गुण नष्ट होतात. ॥ ३ ॥

सुनि सिव के भ्रम भंजन बचना। मिटि गै सब कुतरक कै रचना॥
भइ रघुपति पद प्रीति प्रतीती। दारुन असंभावना बीती॥

शिवजींचे भ्रमनाशक बोलणे ऐकून पार्वतीच्या सर्व कुतर्कांची रचना मिटली. श्रीरामजींच्या चरणांवर तिचे प्रेम आणि विश्वास झाला आणि कठीण असंभावना (ज्याचे होणे संभव नाही अशी तिची खोटी कल्पना) जाऊ लागली. ॥ ४ ॥

दो०— **पुनि पुनि प्रभु पद कमल गहि जोरि पंकरुह पानि।**
बोलीं गिरिजा बचन बर मनहुँ प्रेम रस सानि॥ ११९॥

वारंवार स्वामींच्या (शिवजींच्या) चरणकमलांना आणि स्वत:चे कमळासारखे असलेले हात जोडून पार्वतीने प्रेमभरित सुंदर वचन उद्गारले. ॥ ११९ ॥

ससि कर सम सुनि गिरा तुम्हारी। मिटा मोह सरदातप भारी॥
तुम्ह कृपाल सबु संसउ हरेऊ। राम स्वरूप जानि मोहि परेऊ॥

तुमची चंद्रकिरणांसारखी शीतल वाणी ऐकून माझा अज्ञानरूपी शरद्-ऋतूच्या ऊन्हाचा फार मोठा ताप समाप्त झाला. हे कृपाळू! तुम्ही माझा सर्व संदेह हरण केला. आता श्रीरामचंद्रजींचे यथार्थ स्वरूप माझ्या लक्षात आले. ॥ १ ॥

नाथ कृपाँ अब गयउ बिषादा। सुखी भयउँ प्रभु चरन प्रसादा॥
अब मोहि आपनि किंकरि जानी। जदपि सहज जड़ नारि अयानी॥

हे नाथ! आपल्या कृपेने आता माझा विषाद नाहीसा झाला आणि आपल्या चरणांच्या अनुग्रहाने मी सुखी झाले. जरी मी स्त्री असल्यामुळे स्वभावानेच मूर्ख आणि ज्ञानहीन आहे, तरीही आता आपण मला आपली दासी समजून— ॥ २ ॥

प्रथम जो मैं पूछा सोइ कहहू। जौं मो पर प्रसन्न प्रभु अहहू॥
राम ब्रह्म चिनमय अबिनासी। सर्ब रहित सब उर पुर बासी॥

हे प्रभो! जर आपली माझ्यावर प्रसन्नता असेल तर जी गोष्ट मी आपणाला पूर्वी विचारली होती, तीच सांगावी. (हे खरे आहे की,) श्रीरामचंद्रजी ब्रह्म आहेत, चिन्मय (ज्ञानस्वरूप) आहेत, अविनाशी आहेत, सर्वांहून रहित आणि सर्वांच्या हृदयरूपी नगरीत निवास करणारे आहेत. ॥ ३ ॥

नाथ धरेउ नरतनु केहि हेतू। मोहि समुझाइ कहहु बृषकेतू॥
उमा बचन सुनि परम बिनीता। रामकथा पर प्रीति पुनीता॥

बरे! हे नाथ! त्यांनी मानवदेह कोणत्या कारणाने धारण केला? हे धर्माची ध्वजा धारण करणाऱ्या प्रभो! हे मला समजून सांगा. पार्वतीचे अत्यंत नम्र वचन ऐकून आणि श्रीरामजींच्या कथेविषयी तिचे विशुद्ध प्रेम पाहून— ॥४॥

दो०— **हियँ हरषे कामारि तब संकर सहज सुजान।**
बहु बिधि उमहि प्रसंसि पुनि बोले कृपानिधान॥ १२० (क)॥

तेव्हा कामदेवाचे शत्रू आणि स्वभावत:च ज्ञानी व कृपानिधान असणारे शिवजी मनात फार हर्षित झाले आणि अनेक प्रकाराने पार्वतीचा सन्मान करून म्हणाले— ॥ १२० ॥ क

नवान्ह पारायण, पहिला विश्राम
मासपारायण, चौथा विश्राम

सो०— **सुनु सुभ कथा भवानि रामचरितमानस बिमल।**
कहा भुसुंडि बखानि सुना बिहग नायक गरुड़॥ १२० (ख)॥

हे पार्वती! निर्मळ रामचरितमानसची मंगलमयी कथा ऐक. जी काकभुशुंडीजींनी विस्ताराने सांगितली आणि पक्षांचा राजा गरुड ह्याने ती कथा ऐकली. ॥ १२० ॥ ख

सो संबाद उदार जेहि बिधि भा आगें कहब।
सुनहु राम अवतार चरित परम सुंदर अनघ॥ १२० (ग)॥

तो श्रेष्ठ संवाद कसा झाला, ते मी पुढे सांगेन. आता तू श्रीरामचंद्रजींच्या अवताराचे परम सुंदर आणि पवित्र (पाप नाशक) चरित्र ऐक. ॥ १२० ॥ ग

हरि गुन नाम अपार कथा रूप अगनित अमित।
मैं निज मति अनुसार कहउँ उमा सादर सुनहु॥ १२० (घ)॥

श्रीहरिचे गुण, नाम, कथा आणि रूप सर्वच अपार, अगणित आणि असीम आहे. तरीही हे पार्वती! मी आपल्या बुद्धीनुसार सांगतो ते तू आदराने ऐक. ॥ १२० ॥ घ

सुनु गिरिजा हरिचरित सुहाए। बिपुल बिसद निगमागम गाए॥
हरि अवतार हेतु जेहि होई। इदमित्थं कहि जाइ न सोई॥

हे पार्वती! ऐक, वेदशास्त्रांनी श्रीहरिच्या सुंदर, विस्तृत आणि निर्मळ चरित्रांचे गायन केले आहे. हरिचा अवतार ज्या कारणाने होतो ते कारण "फक्त हेच आहे" असे सांगितले जाऊ शकत नाही. (अनेक कारणे होऊ शकतात आणि असेही होऊ शकतात ज्यांना कोणीही जाणू शकत नाही.) ॥ १ ॥

राम अतर्क्य बुद्धि मन बानी। मत हमार अस सुनहि सयानी॥
तदपि संत मुनि बेद पुराना। जस कछु कहहिं स्वमति अनुमाना॥

हे सूज्ञ! ऐक, माझे मत तर असे आहे की, मन, बुद्धी आणि वाणीला श्रीरामचंद्रजी अतर्क्य आहेत. तरीही संत, मुनी, वेद आणि पुराण—आपापल्या बुद्धीनुसार जे काही वर्णन करतात॥ २॥

तस मैं सुमुखि सुनावउँ तोही। समुझि परइ जस कारन मोही॥
जब जब होइ धरम कै हानी। बाढ़हिं असुर अधम अभिमानी॥

आणि जे काही माझ्या लक्षात येते, हे सुमुखी! तेच कारण मी तुला सांगतो. जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो आणि नीच अभिमानी राक्षसांची संख्या वाढते॥ ३॥

करहिं अनीति जाइ नहिं बरनी। सीदहिं बिप्र धेनु सुर धरनी॥
तब तब प्रभु धरि बिबिध सरीरा। हरहिं कृपानिधि सज्जन पीरा॥

आणि ते असा अन्याय करतात की, ज्याचे वर्णन होऊ शकत नाही. तसेच ब्राह्मण, गाय, देवता आणि पृथ्वी यांना अधिक कष्ट होतात, तेव्हा तेव्हा ते कृपानिधान प्रभू वेग वेगळी दिव्य शरीरे धारण करून सज्जनांची पीडा हरण करतात. ॥ ४॥

दो०— **असुर मारि थापहिं सुरन्ह राखहिं निज श्रुति सेतु।**
जग बिस्तारहिं बिसद जस राम जन्म कर हेतु॥ १२१॥

ते असुरांना मारून देवतांना स्थापन करतात, आपल्या (श्वासरूपी) वेदांच्या मर्यादेचे रक्षण करतात आणि जगतात आपले निर्मळ यश पसरवितात. श्रीरामचंद्रजींच्या अवताराचे हे कारण आहे. ॥ १२१॥

सोइ जस गाइ भगत भव तरहीं। कृपासिंधु जन हित तनु धरहीं॥
राम जनम के हेतु अनेका। परम बिचित्र एक तें एका॥

त्याच यशाचे गायन करून भक्तजन भवसागरातून तरून जातात. कृपासागर भगवान् भक्तांच्या हितासाठी शरीर धारण करतात. श्रीरामचंद्रजींच्या जन्माची अनेक कारणे आहेत, जे एकापेक्षा एक श्रेष्ठ आहेत आणि विलक्षण आहेत. ॥ १॥

जनम एक दुइ कहउँ बखानी। सावधान सुनु सुमति भवानी॥
द्वारपाल हरि के प्रिय दोऊ। जय अरु बिजय जान सब कोऊ॥

हे सुबुद्धिमान पार्वती! मी त्यांच्या एक दोन जन्मांचे विस्ताराने वर्णन करतो. तू सावधान होऊन श्रवण कर. श्रीहरिचे जय आणि विजय दोन आवडते द्वारपाळ आहेत, ज्यांना सर्व लोक जाणतात. ॥ २॥

बिप्र श्राप तें दूनउ भाई। तामस असुर देह तिन्ह पाई॥
कनककसिपु अरु हाटकलोचन। जगत बिदित सुरपति मद मोचन॥

त्या दोन्ही बंधूंना ब्राह्मणाच्या (सनकादी) शापाने असुरांचे तामसी शरीर मिळाले. एकाचे नाव होते हिरण्यकशिपु आणि दुसऱ्याचे हिरण्याक्ष. हे देवराज इन्द्राच्या गर्वाला हरण करणारे सर्व जगात प्रसिद्ध झाले. ॥ ३॥

बिजई समर बीर बिख्याता। धरि बराह बपु एक निपाता॥
होइ नरहरि दूसर पुनि मारा। जन प्रहलाद सुजस बिस्तारा॥

ते युद्धात विजय मिळविणारे विख्यात वीर होते. यापैकी एकाला (हिरण्याक्ष) भगवतांनी वराहाचे (सुकर) शरीर धारण करून ठार केले. पुढे दुसऱ्याचा (हिरण्यकशिपु) नरसिंहरूप धारण करून वध केला आणि आपल्या भक्त प्रल्हादाचे सुंदर यश प्रगट केले. ॥ ४ ॥

दो०— **भए निसाचर जाइ तेइ महाबीर बलवान।**
कुंभकरन रावन सुभट सुर बिजई जग जान॥ १२२॥

तेच (दोन्ही) पुढे देवतांना जिंकणारे तसेच फार मोठे योद्धा रावण आणि कुंभकर्ण नावाचे फार बलवान आणि महावीर राक्षस झाले, ज्यांना सर्व जगच ओळखते. ॥ १२२ ॥

मुकुत न भए हते भगवाना। तीनि जनम द्विज बचन प्रवाना॥
एक बार तिन्ह के हित लागी। धरेउ सरीर भगत अनुरागी॥

भगवंतद्वारा मारले गेले तरी ते (हिरण्याक्ष आणि हिरण्यकशिपु) मुक्त झाले नाहीत. कारण ब्राह्मणाचे वचन (शाप) तीन जन्मासाठी होते. म्हणून पुन्हा एकदा त्यांच्या कल्याणासाठी भक्त प्रेमी भगवंतांनी अवतार घेतला. ॥ १ ॥

कस्यप अदिति तहाँ पितु माता। दसरथ कौसल्या बिख्याता॥
एक कलप एहि बिधि अवतारा। चरित पवित्र किए संसारा॥

त्यावेळी (त्या अवतारात) कश्यप आणि अदिती त्यांचे माता-पिता झाले, जे दशरथ आणि कौसल्या ह्या नावाने प्रसिद्ध होते. एक कल्पात अशाप्रकारे अवतार घेऊन त्यांनी संसारात पवित्र लीला केल्या. ॥ २ ॥

एक कलप सुर देखि दुखारे। समर जलंधर सन सब हारे॥
संभु कीन्ह संग्राम अपारा। दनुज महाबल मरइ न मारा॥

एका कल्पात (जालंधर दैत्याकडून पराभव झाल्यामुळे) सर्व देवतांना दु:खी पाहून शिवजीने त्याच्याबरोबर घनघोर युद्ध केले, परंतु तो महाबलवान दैत्य मारले तरी मरत नव्हता. ॥ ३ ॥

परम सती असुराधिप नारी। तेहिं बल ताहि न जितहिं पुरारी॥

त्या दैत्यराजाची पत्नी परम सती (फार पतिव्रता) होती. तिच्याच पुण्याईने त्रिपुरासुराचा (त्रिपुरासुरासारख्या अजेय शत्रूचा) विनाश करणारे शिवजीसुद्धा त्या दैत्याला जिंकू शकले नाहीत. ॥ ४ ॥

दो०— **छल करि टारेउ तासु ब्रत प्रभु सुर कारज कीन्ह।**
जब तेहिं जानेउ मरम तब श्राप कोप करि दीन्ह॥ १२३॥

प्रभूने कपटाने त्या स्त्रीचा व्रतभंग करून देवतांचे काम केले. जेव्हा त्या स्त्रीने हा भेद जाणला त्यावेळी तिने क्रोधाविष्ट होऊन भगवंताला शाप दिला. ॥ १२३ ॥

तासु श्राप हरि दीन्ह प्रमाना। कौतुकनिधि कृपाल भगवाना॥
तहाँ जलंधर रावन भयऊ। रन हति राम परम पद दयऊ॥

लीलांचे भांडार असलेल्या कृपाळू प्रभूने त्या स्त्रीच्या शापास स्वीकार केले. तोच जालंधर त्या कल्पात रावण झाला, ज्याला श्रीरामचंद्रांनी युद्धात ठार करून परमपद प्रदान केले. ॥ १ ॥

एक जनम कर कारन एहा। जेहि लगि राम धरी नरदेहा॥
प्रति अवतार कथा प्रभु केरी। सुनु मुनि बरनी कबिन्ह घनेरी॥

एक जन्माचे कारण हे होते, ज्यासाठी श्रीरामचंद्रजींनी मनुष्य देह धारण केला. हे भरद्वाज मुनी! ऐका, प्रभूच्या प्रत्येक अवताराच्या कथेचे नाना प्रकाराने कवींनी वर्णन केले आहे. ॥ २ ॥

नारद श्राप दीन्ह एक बारा। कलप एक तेहि लगि अवतारा॥
गिरिजा चकित भईं सुनि बानी। नारद बिष्नुभगत पुनि ग्यानी॥

एकदा नारदांनी शाप दिला म्हणून एका कल्पात त्यासाठी अवतार झाला. ही गोष्ट ऐकताच पार्वतीला फार आश्चर्य वाटले. (आणि ती म्हणाली की,) नारद तर विष्णुभक्त आणि ज्ञानी आहेत. ॥ ३ ॥

कारन कवन श्राप मुनि दीन्हा। का अपराध रमापति कीन्हा॥
यह प्रसंग मोहि कहहु पुरारी। मुनि मन मोह आचरज भारी॥

मुनींनी भगवंताला कोणत्या कारणाने शाप दिला? लक्ष्मीपती भगवंतांनी त्यांचा कोणता अपराध केला? हे पुरारी (शंकरजी)! ही कथा मला सांगा. नारदमुनींच्या मनामध्ये मोह होणे ही फार आश्चर्याची गोष्ट आहे. ॥ ४ ॥

दो०— **बोले बिहसि महेस तब ग्यानी मूढ़ न कोइ।**
जेहि जस रघुपति करहिं जब सो तस तेहि छन होइ॥ १२४ (क)॥

तेव्हा महादेवजी हसून म्हणाले-कोणी ज्ञानी नाही आणि कोणी मूर्ख नाही! श्रीरामचंद्रजी ज्याला जसे करतात, तो त्याच क्षणी तसाच होतो. ॥ १२४ ॥ क

सो०— **कहउँ राम गुन गाथ भरद्वाज सादर सुनहु।**
भव भंजन रघुनाथ भजु तुलसी तजि मान मद॥ १२४ (ख)॥

(याज्ञवल्क्य म्हणतात) हे भरद्वाज! मी श्रीरामचंद्रजींच्या गुणांची कथा सांगतो. ती तुम्ही आदराने ऐका. तुलसीदासजी महाराज म्हणतात—मान आणि मदाचा त्याग करून जन्म मरणाचा फेरा नाहीसा करणाऱ्या श्रीरघुनाथजींचे स्मरण करा. ॥ १२४ ॥ ख

हिमगिरि गुहा एक अति पावनि। बह समीप सुरसरी सुहावनि॥
आश्रम परम पुनीत सुहावा। देखि देवरिषि मन अति भावा॥

हिमालय पर्वतामध्ये एक फार मोठी गुफा होती. तिच्या जवळूनच गंगा वाहत होती. तो परम पवित्र सुंदर आश्रम पाहिल्यावर तो नारदांच्या मनाला फारच आवडला. ॥ १ ॥

निरखि सैल सरि बिपिन बिभागा। भयउ रमापति पद अनुरागा॥
सुमिरत हरिहि श्राप गति बाधी। सहज बिमल मन लागि समाधी॥

पर्वत,नदी आणि वनाच्या (सुंदर) विभागांना पाहून लक्ष्मीकांत भगवंताच्या चरणी नारदांना प्रेम निर्माण झाले. भगवंताचे स्मरण करताच स्वत:ला मिळालेल्या (नारदमुनींना) शापाची (जो शाप त्यांना दक्ष प्रजापतीने दिला होता आणि त्यामुळे ते एका स्थानावर थांबू शकत नव्हते) गती थांबली आणि स्वाभाविकच मन निर्मळ असल्याने त्यांची समाधी लागली. ॥ २ ॥

मुनि गति देखि सुरेस डेराना। कामहि बोलि कीन्ह सनमाना॥
सहित सहाय जाहु मम हेतू। चलेउ हरषि हियँ जलचरकेतू॥

नारदमुनींची (ही तपोमयी) स्थिती पाहून देवराज इन्द्र घाबरला. त्याने कामदेवाला बोलावून त्याचा आदर-सत्कार केला. (आणि म्हटले की,) माझ्या (हिता) साठी तू आपल्या सहायकासह (नारदांची समाधी भंग करण्यासाठी) जा. (हे ऐकून) मीनध्वज कामदेव मनात प्रसन्न होऊन निघाला. ॥ ३ ॥

सुनासीर मन महुँ असि त्रासा। चहत देवरिषि मम पुर बासा॥
जे कामी लोलुप जग माहीं। कुटिल काक इव सबहि डेराहीं॥

इन्द्राच्या मनात ही भीती निर्माण झाली की, देवर्षी नारद माझी पुरी (अमरावती) हिचे राज्य इच्छितात. जगतात जे कामी आणि लोभी असतात ते कुटिल कावळ्यासारखे सर्वांना भितात. ॥ ४ ॥

दो०— **सूख हाड़ लै भाग सठ स्वान निरखि मृगराज।**
छीनि लेइ जनि जान जड़ तिमि सुरपतिहि न लाज॥ १२५॥

जसा मूर्ख कुत्रा सिंहाला पाहून रुक्ष हाड घेऊन पळतो, तो मूर्ख असे समजतो की, कदाचित तो सिंह त्या हाडाला हिसकावून घेईल, तसेच इन्द्राला नारद माझे राज्य हिसकावतील असा विचार करताना लाज वाटली नाही. ॥ १२५ ॥

तेहि आश्रमहिं मदन जब गयऊ। निज मायाँ बसंत निरमयऊ॥
कुसुमित बिबिध बिटप बहुरंगा। कूजहिं कोकिल गुंजहिं भृंगा॥

जेव्हा कामदेव त्या (नारदजींच्या) आश्रमात गेला, त्याने आपल्या मायेने वसंतऋतू उत्पन्न केला. निरनिराळ्या वृक्षांवर अनेक रंगाची फुले उमलली. त्यावर कोकीळा सुंदर स्वरात कुहू कुहू करू लागल्या आणि भुंगे गुंजार करू लागले. ॥ १ ॥

चली सुहावनि त्रिबिध बयारी। काम कृसानु बढ़ावनिहारी॥
रंभादिक सुर नारि नबीना। सकल असमसर कला प्रबीना॥

कामाग्नीला भडकविणारी तीन प्रकारची (शीतल, मंद आणि सुंगध) आल्हाददायक हवा वाहू लागली. रंभा वगैरे नवयुवती देवांगना ज्या सर्वच्या सर्व कामकलेत निपुण होत्या. ॥ २ ॥

करहिं गान बहु तान तरंगा। बहुबिधि क्रीड़हिं पानि पतंगा॥
देखि सहाय मदन हरषाना। कीन्हेसि पुनि प्रपंच बिधि नाना॥

त्या अनेक प्रकारच्या ताना व आलापासहित गाऊ लागल्या आणि हातात चेंडू घेऊन नाना प्रकारचे खेळ खेळू लागल्या. कामदेव स्वत:च्या या सहायकांना पाहून प्रसन्न झाला आणि मग त्याने नाना प्रकारचे मायाजाळ पसरविले. ॥ ३ ॥

काम कला कछु मुनिहि न ब्यापी। निज भयँ डरेउ मनोभव पापी॥
सीम कि चाँपि सकइ कोउ तासू। बड़ रखवार रमापति जासू॥

परंतु कामदेवाची कोणतीही कला मुनींवर परिणाम करू शकली नाही. मग मात्र तो पापी कामदेव स्वत:च्या (नाशाच्या) भयाने घाबरला. लक्ष्मीपती भगवान् ज्याचे संरक्षक आहेत त्याच्यावर कोण दबाव आणू शकतो? ॥ ४ ॥

दो०— **सहित सहाय सभीत अति मानि हारि मन मैन।**
गहेसि जाइ मुनि चरन तब कहि सुठि आरत बैन॥ १२६॥

तेव्हा आपल्या सहायकासह अत्यंत घाबरून आपल्या मनामध्ये हार मानून फारच आर्त (दीन) स्वरात नारदमुनींना शरण आला. ॥ १२६ ॥

भयउ न नारद मन कछु रोषा। कहि प्रिय बचन काम परितोषा॥
नाइ चरन सिरु आयसु पाई। गयउ मदन तब सहित सहाई॥

नारदांना थोडाही क्रोध आला नाही. त्यांनी प्रिय वचनाने कामदेवाचे समाधान केले. तेव्हा मुनींना वंदन करून आणि त्यांची आज्ञा घेऊन कामदेव आपल्या सहायकांसह परतला. ॥ १ ॥

मुनि सुसीलता आपनि करनी। सुरपति सभाँ जाइ सब बरनी॥
सुनि सब कें मन अचरजु आवा। मुनिहि प्रसंसि हरिहि सिरु नावा॥

देवराज इन्द्राच्या सभेमध्ये जाऊन त्याने मुनींची सुशीलता आणि आपली स्वत:ची कर्तबगारी सर्व सांगितली, जे ऐकून सर्वांच्या मनात आश्चर्य वाटले आणि त्यांनी मुनींची महानता वर्णन करून श्रीहरिला वंदन केले. ॥ २ ॥

तब नारद गवने सिव पाहीं। जिता काम अहमिति मन माहीं॥
मार चरित संकरहि सुनाए। अतिप्रिय जानि महेस सिखाए॥

तेव्हा नारद शिवजीकडे गेले. नारदांच्या मनात या गोष्टीचा अहंकार निर्माण झाला की, मी

कामदेवाला जिंकले. त्यांनी कामदेवाचे चरित्र शिवजींना सांगितले. महादेवजींनी त्यांना (नारदांना) अत्यंत प्रिय जाणून (अशा प्रकारे) उपदेश केला. ॥ ३ ॥

बार बार बिनवउँ मुनि तोही। जिमि यह कथा सुनायहु मोही॥
तिमि जनि हरिहि सुनावहु कबहूँ। चलेहुँ प्रसंग दुराएहु तबहूँ॥

हे मुनी! मी तुम्हाला वारंवार विनंती करतो की, ज्या रीतीने ही घटना तुम्ही मला सांगितली, त्या रीतीने भगवान् श्रीहरिला सांगू नका. जरी चर्चा निघाली तरी ही गोष्ट लपवा. ॥ ४ ॥

दो०— **संभु दीन्ह उपदेस हित नहिं नारदहि सोहान।**
भरद्वाज कौतुक सुनहु हरि इच्छा बलवान॥ १२७॥

जरी शिवजींनी हा हिताचा उपदेश केला होता तरी परंतु नारदांना तो रुचला नाही. हे भरद्वाज! आता पुढील कौतुक ऐका. हरिची इच्छा फारच बलवान आहे. ॥ १२७ ॥

राम कीन्ह चाहहिं सोइ होई। करै अन्यथा अस नहिं कोई॥
संभु बचन मुनि मन नहिं भाए। तब बिरंचि के लोक सिधाए॥

श्रीरामचंद्रजी जे करू इच्छितात तेच होते. जगात असा कोणी नाही जो त्या विरुद्ध करू शकेल. शिवजींचे वचन नारदांच्या मनाला आवडले नाही. तेव्हा ते (नारद) तेथून ब्रह्मलोकाला निघून गेले. ॥ १ ॥

एक बार करतल बर बीना। गावत हरि गुन गान प्रबीना॥
छीरसिंधु गवने मुनिनाथा। जहँ बस श्रीनिवास श्रुतिमाथा॥

एकदा गायन विद्येत निपुण असलेले मुनीनाथ नारदजी हातात सुंदर वीणा घेऊन हरिगुण गात क्षीरसागराला गेले, जेथे वेदांचे मस्तकस्वरूपी (मूर्तिमान वेदांततत्त्व) लक्ष्मीनिवास भगवान् नारायण निवास करतात. ॥ २ ॥

हरषि मिले उठि रमानिकेता। बैठे आसन रिषिहि समेता॥
बोले बिहसि चराचर राया। बहुते दिनन कीन्हि मुनि दाया॥

रमानिवास भगवान् उठून फार प्रेमाने नारदांना भेटले आणि नारदासह आसनस्थ झाले. चराचराचे स्वामी भगवान् हसून म्हणाले—हे मुनी! आज आपण फार दिवसानंतर कृपा केली. ॥ ३ ॥

काम चरित नारद सब भाषे। जद्यपि प्रथम बरजि सिवँ राखे॥
अति प्रचंड रघुपति कै माया। जेहि न मोह अस को जग जाया॥

जरी शिवजींनी त्याना पूर्वीच मनाई केली होती तरीही नारदांनी कामदेवाचे सर्व चरित्र भगवंताला सांगितले. श्रीरघुनाथांची माया फारच बलवान आहे. जगतात असा कोण जन्मला आहे ज्याला ती मोहित करत नाही! ॥ ४ ॥

दो०— **रूख बदन करि बचन मृदु बोले श्रीभगवान।**
तुम्हरे सुमिरन तें मिटहिं मोह मार मद मान॥ १२८॥

भगवंत रुक्ष चेहरा करून कोमल वाणीने म्हणाले—हे मुनिराज! आपले स्मरण केल्याने दुसऱ्यांचा मोह, काम, मद आणि अभिमान समाप्त होतो. (मग आपल्याबद्दल तर काय सांगावे?॥ १२८॥

सुनु मुनि मोह होइ मन ताकें। ग्यान बिराग हृदय नहिं जाकें॥
ब्रह्मचरज ब्रत रत मतिधीरा। तुम्हहि कि करइ मनोभव पीरा॥

हे मुनी! ऐका, मोह तर त्याच्या मनात निर्माण होतो ज्याच्या हृदयात ज्ञान-वैराग्य नाही. तुम्ही तर ब्रह्मचर्य व्रतात तत्पर आणि फार धीरबुद्धी आहात. मग काय आपल्यालाही कामदेव सतावू शकतो?॥ १॥

नारद कहेउ सहित अभिमाना। कृपा तुम्हारि सकल भगवाना॥
करुनानिधि मन दीख बिचारी। उर अंकुरेउ गरब तरु भारी॥

नारदांनी अभिमानासह म्हटले—"भगवन्! ही सर्व आपली कृपा आहे." करुणानिधान भगवंतांनी मनामध्ये विचार केला की, यांच्या मनात गर्वरूपी मोठ्या वृक्षाचा अंकुर पैदा झाला आहे.॥ २॥

बेगि सो मैं डारिहउँ उखारी। पन हमार सेवक हितकारी॥
मुनि कर हित मम कौतुक होई। अवसि उपाय करबि मैं सोई॥

मी त्याला तात्काळ उखडून फेकून देईन. कारण सेवकांचे हित करणे हा माझा पण आहे. मी आता निश्चितच असा उपाय करतो, ज्यामुळे मुनींचे कल्याण आणि माझा खेळ होईल.॥ ३॥

तब नारद हरि पद सिर नाई। चले हृदयँ अहमिति अधिकाई॥
श्रीपति निज माया तब प्रेरी। सुनहु कठिन करनी तेहि केरी॥

तेव्हा नारद भगवंताला वंदन करून निघाले. त्यांच्या हृदयातील अभिमान अधिकच वाढला. त्यावेळी लक्ष्मीपती भगवंतांनी आपल्या मायेला प्रेरित केले. आता तिची कठीण करणी ऐका.॥ ४॥

दो०— **बिरचेउ मग महुँ नगर तेहिं सत जोजन बिस्तार।**
श्रीनिवासपुर तें अधिक रचना बिबिध प्रकार॥ १२९॥

त्या हरिमायेने रस्त्यातच शंभर योजनाचे (चारशे कोस) एक नगर रचले. त्या नगरातील अनेक प्रकारच्या रचना लक्ष्मीनिवास भगवान् विष्णुच्या नगरापेक्षाही (वैकुंठापेक्षाही) अधिक सुंदर होत्या.॥ १२९॥

बसहिं नगर सुंदर नर नारी। जनु बहु मनसिज रति तनुधारी॥
तेहिं पुर बसइ सीलनिधि राजा। अगनित हय गय सेन समाजा॥

नयनन्हि संत दरस नहिं देखा । लोचन मोरपंख कर लेखा ॥
ते सिर कटु तुंबरि समतूला । जे न नमत हरि गुर पद मूला ॥

ज्यांनी आपल्या डोळ्यांनी संतांचे दर्शन घेतले नाही, त्यांचे डोळे मोराच्या पंखांवर दिसणाऱ्या नकली डोळ्यांच्या श्रेणीत येतात. जे मस्तक श्रीहरींच्या आणि श्रीगुरूंच्या चरणी झुकत नाही, ते कडू भोपळ्यासमान होय. ॥ २ ॥

जिन्ह हरिभगति हृदयँ नहिं आनी । जीवत सव समान तेइ प्रानी ॥
जो नहिं करइ राम गुन गाना । जीह सो दादुर जीह समाना ॥

ज्यांच्या हृदयात भगवंतांच्या भक्तीला स्थान नाही, ते प्राणी जिवंत मुडद्याप्रमाणे होत. जी जीभ श्रीरामांच्या गुणांचे गायन करीत नाही, ती बेडकाच्या जिभेप्रमाणे होय. ॥ ३ ॥

कुलिस कठोर निठुर सोइ छाती । सुनि हरिचरित न जो हरषाती ॥
गिरिजा सुनहु राम कै लीला । सुर हित दनुज बिमोहनसीला ॥

भगवंतांचे चरित्र ऐकून आनंदित होत नाही, ते हृदय वज्रासारखे कठोर व निष्ठुर होय, हे पार्वती, श्रीरामचंद्रांची लीला ऐक. ती देवांचे कल्याण करणारी आणि विशेषत: दैत्यांना मोहित करणारी आहे. ॥ ४ ॥

दो०—रामकथा सुरधेनु सम सेवत सब सुख दानि।
सतसमाज सुरलोक सब को न सुनै अस जानि ॥ ११३ ॥

कामधेनू ही सेवा केल्यावर सर्व सुखे प्राप्त करून देते, तशी ही रामकथा आहे आणि सत्पुरुषांचा समुदाय हाच सर्व देवांचा लोक होय. असे पाहिल्यावर कोण बरे ही कथा ऐकणार नाही ? ॥ ११३ ॥

रामकथा सुंदर कर तारी । संसय बिहग उड़ावनिहारी ॥
रामकथा कलि बिटप कुठारी । सादर सुनु गिरिराजकुमारी ॥

संदेहरूपी पक्ष्यांना हुसकून लावणाऱ्या टाळीप्रमाणे श्रीरामांची कथा हातांची सुंदर टाळी आहे. रामकथा ही कलियुगरूपी वृक्षाला तोडणारी कुऱ्हाड आहे. हे गिरिराजकुमारी! तू ही कथा आदराने ऐक. ॥ १ ॥

राम नाम गुन चरित सुहाए । जनम करम अगनित श्रुति गाए ॥
जथा अनंत राम भगवाना । तथा कथा कीरति गुन नाना ॥

श्रीरामचंद्रांची सुंदर नामे, गुण, चरित्र, जन्म आणि कर्म हे सर्व अगणित असल्याचे वेदांनी प्रतिपादित केले आहे. ज्याप्रमाणे भगवान श्रीराम हे अनंत आहेत, त्याप्रमाणे त्यांच्या कथा, कीर्ती आणि गुण हे सुद्धा अनंत आहेत. ॥ २ ॥

तदपि जथा श्रुत जसि मति मोरी । कहिहउँ देखि प्रीति अति तोरी ॥
उमा प्रस्न तव सहज सुहाई । सुखद संतसंमत मोहि भाई ॥

तरीही तुझे (त्याविषयी) अत्यंत प्रेम पाहून जे काही मी ऐकले आहे आणि जशी माझी बुद्धी आहे, त्यानुसार मी तुला सांगतो. हे पार्वती, तुझा प्रश्न स्वभावत: सुंदर, सुखदायक आणि संतसंमत आहे व मलाही तो फार आवडला. ॥ ३ ॥

एक बात नहिं मोहि सोहानी । जदपि मोह बस कहेहु भवानी ॥
तुम्ह जो कहा राम कोउ आना । जेहि श्रुति गाव धरहिं मुनि ध्याना ॥

परंतु हे पार्वती, एक गोष्ट मात्र मला आवडली नाही. जरी ती तू मोहामुळे म्हणालीस. तू असे म्हणालीस की, वेद ज्यांचे गुणगान करतात आणि मुनिजन ज्यांचे ध्यान करतात, ते राम कुणी दुसरे आहेत काय ? ॥ ४ ॥

दो०—कहहिं सुनहिं अस अधम नर ग्रसे जे मोह पिसाच।
पाषंडी हरि पद बिमुख जानहिं झूठ न साच ॥ ११४ ॥

जे मोहरूपी पिशाचाने झपाटले आहेत, नास्तिक आहेत, भगवंतांच्या चरणांशी विन्मुख आहेत आणि खरे-खोटे ज्यांना मुळीच माहीत नाही, असे अधम मनुष्यच अशाप्रकारे सांगत-ऐकत असतात. ॥ ११४ ॥

अग्य अकोबिद अंध अभागी । काई बिषय मुकुर मन लागी ॥
लंपट कपटी कुटिल बिसेषी । सपनेहुँ संतसभा नहिं देखी ॥

जे अज्ञानी, मूर्ख, आंधळे आणि भाग्यहीन आहेत, ज्यांच्या मनोरूपी आरशावर विषयरूपी मळ साचला आहे, जे व्यभिचारी, कपटी व मोठे दुष्ट आहेत आणि ज्यांनी कधी स्वप्नातही संतांचे दर्शन घेतले नाही; ॥ १ ॥

कहहिं ते बेद असंमत बानी । जिन्ह कें सूझ लाभु नहिं हानी ॥
मुकुर मलिन अरु नयन बिहीना । राम रूप देखहिं किमि दीना ॥

ज्यांना आपली लाभ-हानी कळत नाही, तेच लोक असे वेदविरोधी बोलत असतात. ज्यांचा हृदयरूपी आरसा मलिन आहे आणि जे नेत्रहीन आहेत, ते बिचारे श्रीरामांचे रूप कसे पाहणार ? ॥ २ ॥

जिन्ह कें अगुन न सगुन बिबेका । जल्पहिं कल्पित बचन अनेका ॥
हरिमाया बस जगत भ्रमाहीं । तिन्हहि कहत कछु अघटित नाहीं ॥

ज्यांना निर्गुण-सगुण याचा काहीही विवेक नाही. जे अनेक कपोलकल्पित गोष्टी बडबडत असतात, जे श्रीहरींच्या मायेला वश होऊन जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात भटकत असतात, त्यांना काहीही बरळणे अशक्य नाही. ॥ ३ ॥

बातुल भूत बिबस मतवारे । ते नहिं बोलहिं बचन बिचारे ॥
जिन्ह कृत महामोह मद पाना । तिन्ह कर कहा करिअ नहिं काना ॥

ज्यांना (सन्निपात, उन्माद इत्यादी) वायुरोगाने झपाटले आहे, ज्यांना भुताने पछाडले आहे

आणि ज्यांनी नशापाणी केले आहे, असे लोक काही विचार करून बोलत नाहीत. ज्यांनी महामोहरूपी मदिरा ढोसली आहे, त्यांचे काहीही ऐकू नये. ॥ ४ ॥

सो०—अस निज हृदयँ बिचारि तजु संसय भजु राम पद।
सुनु गिरिराज कुमारि भ्रम तम रबि कर बचन मम॥ ११५ ॥

मनात असा विचार करून संशय सोडून दे आणि श्रीरामचंद्रांच्या चरणांची सेवा कर. हे पार्वती, भ्रमरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी सूर्याच्या किरणांप्रमाणे असणारे माझे हे बोल ऐक. ॥ ११५ ॥

सगुनहि अगुनहि नहिं कछु भेदा । गावहिं मुनि पुरान बुध बेदा॥
अगुन अरूप अलख अज जोई । भगत प्रेम बस सगुन सो होई॥

मुनी, पुराणे, पंडित आणि वेद हे सर्व सांगतात की, सगुण आणि निर्गुण यांच्यामध्ये कोणताही भेद नाही. जो निर्गुण, निराकार, अव्यक्त आणि अजन्मा आहे, तोच भक्तांच्या प्रेमाला वश होऊन सगुण बनतो. ॥ १ ॥

जो गुन रहित सगुन सोइ कैसें । जलु हिम उपल बिलग नहिं जैसें॥
जासु नाम भ्रम तिमिर पतंगा । तेहि किमि कहिअ बिमोह प्रसंगा॥

जो निर्गुण तोच सगुण कसा, हे समजून घे. ज्याप्रमाणे पाणी व पाण्याची गार यांत भेद नाही. भ्रमरूपी अंधकार नष्ट करण्यासाठी ज्यांचे नाव सूर्य आहे, त्यांच्याबाबतीत मोह कसा उद्‌भवू शकेल ? ॥ २ ॥

राम सच्चिदानंद दिनेसा । नहिं तहँ मोह निसा लवलेसा॥
सहज प्रकासरूप भगवाना । नहिं तहँ पुनि बिग्यान बिहाना॥

श्रीरामचंद्र हे सच्चिदानंदस्वरूप सूर्य आहेत. तेथे मोहरूपी रात्रीचा लवलेशही नाही. ते स्वभावत:च प्रकाशरूप आणि षड्‌गुणैश्वर्ययुक्त भगवान आहेत, तेथे तर विज्ञानरूपी प्रात:कालही होत नाही. (अज्ञानरूपी रात्र असेल तरच विज्ञानरूपी प्रात:काल होणार. भगवान तर नित्य ज्ञानस्वरूप आहेत.) ॥ ३ ॥

हरष बिषाद ग्यान अग्याना । जीव धर्म अहमिति अभिमाना॥
राम ब्रह्म ब्यापक जग जाना । परमानंद परेस पुराना॥

हर्ष, शोक, ज्ञान, अज्ञान, अहंता आणि अभिमान या सर्व बाबी जीवाचे स्वभाव आहेत. श्रीरामचंद्र हे तर व्यापक ब्रह्म, परमानंदस्वरूप, परात्पर प्रभू आणि पुराणपुरुष आहेत, ही गोष्ट साऱ्या जगाला ठाऊक आहे. ॥ ४ ॥

दो०—पुरुष प्रसिद्ध प्रकास निधि प्रगट परावर नाथ।
रघुकुलमनि मम स्वामि सोइ कहि सिवँ नायउ माथ॥ ११६ ॥

जे प्रसिद्ध पुराणपुरुष आहेत, जे प्रकाशाचे भांडार आहेत, सर्व रूपांमध्ये जे व्यक्त आहेत,

जीव, माया आणि जगत यांचे स्वामी आहेत, तेच रघुकुलमणी श्रीरामचंद्र हे माझे स्वामी आहेत' असे म्हणून शिवांनी त्यांना नमन केले. ॥ ११६ ॥

निज भ्रम नहिं समुझहिं अग्यानी । प्रभु पर मोह धरहिं जड़ प्रानी ॥
जथा गगन घन पटल निहारी । झाँपेउ भानु कहहिं कुबिचारी ॥

'अज्ञानी माणसांना स्वत:चा भ्रम कळत नाही आणि मग ते मूर्ख, प्रभू श्रीरामचंद्रांच्यावर आपल्या भ्रमाचा आरोप करतात. ज्याप्रमाणे आकाशातील ढगांचे आच्छादन पाहून अज्ञानी लोक म्हणतात की, ढगांनी सूर्याला झाकून टाकले. ॥ १ ॥

चितव जो लोचन अंगुलि लाएँ । प्रगट जुगल ससि तेहि के भाएँ ॥
उमा राम बिषइक अस मोहा । नभ तम धूम धूरि जिमि सोहा ॥

जो माणूस डोळ्यांत बोट घालून पाहतो, त्याला दोन चंद्र दिसतात. हे पार्वती, श्रीरामचंद्रांच्या बाबतीत अशा प्रकारच्या मोहाची कल्पना करणे म्हणजे आकाशात अंधकार, धूर आणि धूळ पाहणे होय. (आकाश हे निर्मळ व निर्लेप आहे, त्याला कोणी मलिन किंवा स्पर्श करू शकत नाही. त्याप्रमाणे भगवान श्रीरामचंद्र हे नित्य निर्मळ व निर्लेप आहेत.) ॥ २ ॥

बिषय करन सुर जीव समेता । सकल एक तें एक सचेता ॥
सब कर परम प्रकासक जोई । राम अनादि अवधपति सोई ॥

विषय, इंद्रिये, इंद्रियांचे देव आणि जीवात्मा—हे सर्व एकमेकांच्या साहाय्यामुळे चेतन असतात. (अर्थात विषयांचे अस्तित्व इंद्रियांमुळे, इंद्रियांचे सामर्थ्य देवांमुळे आणि देवांचा प्रकाश चेतन जीवात्म्यामुळे असतो.) या सर्वांचा जो प्रकाशक आहे तोच अनादी परमात्मा म्हणजे अयोध्यानरेश श्रीरामचंद्र होत. ॥ ३ ॥

जगत प्रकास्य प्रकासक रामू । मायाधीस ग्यान गुन धामू ॥
जासु सत्यता तें जड़ माया । भास सत्य इव मोह सहाया ॥

हे जग प्रकाश्य आहे आणि श्रीराम हे प्रकाशक आहेत. ते मायेचे स्वामी आणि ज्ञान आणि गुणांचे निधान आहेत. त्यांच्या सत्तेमुळे जड माया ही मोहाच्या मदतीने सत्य असल्यासारखी भासते. ॥ ४ ॥

दो०—रजत सीप महुँ भास जिमि जथा भानु कर बारि ।
जदपि मृषा तिहुँ काल सोइ भ्रम न सकइ कोउ टारि ॥ ११७ ॥

ज्याप्रमाणे शिंपल्यावर चांदीची आणि सूर्याच्या किरणांवर पाण्याची प्रचीती येते. जरी ही प्रचीती तिन्ही काळांत खोटी असली, तरीही कुणीही हा भ्रम हटवू शकत नाही. ॥ ११७ ॥

एहि बिधि जग हरि आश्रित रहई । जदपि असत्य देत दुख अहई ॥
जौं सपनें सिर काटै कोई । बिनु जागें न दूरि दुख होई ॥

याचप्रमाणे हा संसार भगवंतांच्या आश्रयावर अवलंबून असतो. तो जरी असत्य आहे, तरीही तो दु:ख देतोच. ज्याप्रमाणे स्वप्नात कुणी मुंडके कापून टाकले, तर त्याचे दु:ख जागे झाल्याशिवाय काही दूर होत नाही. ॥ १ ॥

जासु कृपाँ अस भ्रम मिटि जाई । गिरिजा सोइ कृपाल रघुराई ॥
आदि अंत कोउ जासु न पावा । मति अनुमानि निगम अस गावा ॥

हे पार्वती, ज्यांच्या कृपेमुळे अशा प्रकारचा भ्रम नाहीसा होतो, ते कृपाळू श्रीरघुनाथ होत. त्यांचा आदी आणि अंत कुणालाही कळला नाही. वेदांनी आपल्या बुद्धीनुसार अनुमान करून असे वर्णन केले आहे. ॥ २ ॥

बिनु पद चलइ सुनइ बिनु काना । कर बिनु करम करइ बिधि नाना ॥
आनन रहित सकल रस भोगी । बिनु बानी बकता बड़ जोगी ॥

ते (ब्रह्म) पायाविना चालते, कानाविना ऐकते, हाताविनाच अनेक प्रकारची कामे करते, मुखाविनाच सर्व रसांचा आस्वाद घेते आणि वाणीविनाच ते उत्कृष्ट वक्ता आहे. ॥ ३ ॥

तन बिनु परस नयन बिनु देखा । ग्रहइ घ्रान बिनु बास असेषा ॥
असि सब भाँति अलौकिक करनी । महिमा जासु जाइ नहिं बरनी ॥

ते शरीराविनाच स्पर्शानुभव करते, डोळ्यांविना पाहते आणि नाकाविनाच सर्व प्रकारचा गंध घेते. त्या ब्रह्माची सर्व करणी सर्व प्रकारे अशी अलौकिक आहे. त्याचा महिमा सांगता येत नाही. ॥ ४ ॥

दो०—जेहि इमि गावहिं बेद बुध जाहि धरहिं मुनि ध्यान।
सोइ दसरथ सुत भगत हित कोसलपति भगवान ॥ ११८ ॥

वेद आणि पंडित ज्यांचे अशाप्रकारे वर्णन करतात आणि मुनी ज्यांचे ध्यान करतात, तेच दशरथनंदन, भक्त-हितकारी, अयोध्यापती, भगवान श्रीरामचंद्र होत. ॥ ११८ ॥

कासीं मरत जंतु अवलोकी । जासु नाम बल करउँ बिसोकी ॥
सोइ प्रभु मोर चराचर स्वामी । रघुबर सब उर अंतरजामी ॥

(हे पार्वती,) ज्यांच्या नामाच्या प्रतापामुळे मी काशीत मृत्यू पावणाऱ्या प्राण्यास पाहून त्याला राममंत्र देऊन मुक्ती देतो. तेच माझे प्रभू रघुश्रेष्ठ श्रीरामचंद्र हे जड-चेतनाचे स्वामी आणि सर्वांतर्यामी आहेत. ॥ १ ॥

बिबसहुँ जासु नाम नर कहहीं । जनम अनेक रचित अघ दहहीं ॥
सादर सुमिरन जे नर करहीं । भव बारिधि गोपद इव तरहीं ॥

इच्छा नसतानाही ज्यांचे नाम घेतल्यामुळे अनेक जन्मांमध्ये केलेली पापे जळून जातात, त्यांचे जी माणसे आदराने स्मरण करतात, ते संसाररूपी (दुस्तर) समुद्रास गाईच्या खुरामुळे बनलेल्या खड्ड्याप्रमाणे (सहजपणे) ओलांडून जातात. ॥ २ ॥

राम सो परमातमा भवानी । तहँ भ्रम अति अबिहित तव बानी ॥
अस संसय आनत उर माहीं । ग्यान बिराग सकल गुन जाहीं ॥

हे पार्वती, ते परमात्मा म्हणजे श्रीरामचंद्रच होत. त्यांच्या ठिकाणी भ्रमाचा आरोप करणारे बोलणे हे अत्यंत अयोग्य आहे. अशाप्रकारचा संदेह मनात आणल्यामुळे मनुष्याचे ज्ञान, वैराग्य इत्यादी सर्व सद्गुण नाहीसे होतात.' ॥ ३ ॥

सुनि सिव के भ्रम भंजन बचना । मिटि गै सब कुतरक कै रचना ॥
भइ रघुपति पद प्रीति प्रतीती । दारुन असंभावना बीती ॥

भगवान शिवांचे हे भ्रम दूर करणारे बोल ऐकून पार्वतीचे सर्व कुतर्क नाहीसे झाले. श्रीरघुनाथांच्या चरणी तिला प्रेम व विश्वास वाटू लागला आणि त्यांच्याविषयीचा तिचा फार मोठा गैरसमज दूर झाला. ॥ ४ ॥

दो०—पुनि पुनि प्रभु पद कमल गहि जोरि पंकरुह पानि।
बोलीं गिरिजा बचन बर मनहुँ प्रेम रस सानि ॥ ११९ ॥

पार्वती वारंवार शिवांच्या चरणकमलांना कवळून व कमलांसारखे कर जोडून जणू प्रेमरसामध्ये ओथंबलेल्या सुंदर वाणीने बोलली. ॥ ११९ ॥

ससि कर सम सुनि गिरा तुम्हारी । मिटा मोह सरदातप भारी ॥
तुम्ह कृपाल सबु संसउ हरेऊ । राम स्वरूप जानि मोहि परेऊ ॥

'तुमची चंद्र-किरणांसमान शीतल वाणी ऐकून माझ्या अज्ञानरूपी शरदऋतूतील कडक उन्हाचा ताप नाहीसा झाला. हे कृपाळू, तुम्ही माझा संपूर्ण संदेह हरण केला. आता श्रीरामांचे वास्तविक स्वरूप मला समजून आले. ॥ १ ॥

नाथ कृपाँ अब गयउ बिषादा । सुखी भयउँ प्रभु चरन प्रसादा ॥
अब मोहि आपनि किंकरि जानी । जदपि सहज जड़ नारि अयानी ॥

हे नाथ, तुमच्या कृपेने आता माझा विषाद निघून गेला आणि तुमच्या चरणांच्या कृपेने मी सुखी झाले. मी स्त्री असल्यामुळे स्वभावत: मूर्ख आणि अज्ञानी आहे. तरीही आता तुम्ही मला आपली दासी मानून, ॥ २ ॥

प्रथम जो मैं पूछा सोइ कहहू । जौं मो पर प्रसन्न प्रभु अहहू ॥
राम ब्रह्म चिनमय अबिनासी । सर्ब रहित सब उर पुर बासी ॥

हे प्रभो, जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल, तर जी गोष्ट मी तुम्हांला प्रथम विचारली होती, ती सांगा. (हे सत्य आहे की,) श्रीरामचंद्र ब्रह्म आहेत, चिन्मय (ज्ञानस्वरूप) आहेत, अविनाशी आहेत, सर्वांहून रहित आणि सर्वांच्या हृदयरूपी नगरीमध्ये निवास करणारे आहेत. ॥ ३ ॥

नाथ धरेउ नरतनु केहि हेतू। मोहि समुझाइ कहहु बृषकेतू॥
उमा बचन सुनि परम बिनीता। रामकथा पर प्रीति पुनीता॥

मग हे नाथ, त्यांनी मनुष्य-शरीर कशासाठी धारण केले? हे धर्म-ध्वज धारण करणाऱ्या प्रभो, हे मला समजावून द्या. पार्वतीचे नम्र बोल ऐकून आणि श्रीरामांच्या कथेविषयी तिचे विशुद्ध प्रेम पाहून॥ ४॥

दो०—हियँ हरषे कामारि तब संकर सहज सुजान।
बहु बिधि उमहि प्रसंसि पुनि बोले कृपानिधान॥ १२० (क)॥

कामदेवाचे शत्रू, स्वभावत: ज्ञानी व कृपानिधान भगवान शिव मनात फार प्रसन्न झाले आणि अनेक प्रकारे पार्वतीची प्रशंसा करीत म्हणाले.॥ १२० (क)॥

नवाह्न पारायण, पहिला विश्राम
मासपारायण, चौथा विश्राम

सो०—सुनु सुभ कथा भवानि रामचरितमानस बिमल।
कहा भुसुंडि बखानि सुना बिहग नायक गरुड़॥ १२० (ख)॥

'हे पार्वती, निर्मल 'रामचरितमानस'ची मंगलमय कथा ऐक. ही काकभुशुंडींनी विस्तारपूर्वक पक्षिराज गरुडाला सांगितली होती.॥ १२० (ख)॥

सो संबाद उदार जेहि बिधि भा आगें कहब।
सुनहु राम अवतार चरित परम सुंदर अनघ॥ १२० (ग)॥

तो श्रेष्ठ संवाद कशाप्रकारे झाला, ते मी पुढे सांगतो. आता तू श्रीरामचंद्रांच्या अवताराचे परम सुंदर व पापनाशक चरित्र ऐक.॥ १२० (ग)॥

हरि गुन नाम अपार कथा रूप अगनित अमित।
मैं निज मति अनुसार कहउँ उमा सादर सुनहु॥ १२० (घ)॥

श्रीहरींचे गुण, नाम, कथा व रूप-हे सर्व अपार, अगणित आणि अनंत आहेत. तरीही हे पार्वती, मी आपल्या बुद्धीनुसार सांगतो, ते आदराने ऐक.॥ १२० (घ)॥

सुनु गिरिजा हरिचरित सुहाए। बिपुल बिसद निगमागम गाए॥
हरि अवतार हेतु जेहि होई। इदमित्थं कहि जाइ न सोई॥

हे पार्वती, ऐक. वेद-शास्त्रांनी श्रीहरींच्या सुंदर, विस्तृत आणि निर्मल चरित्रांचे वर्णन केलेले आहे. ज्या कारणामुळे श्रीहरींचा अवतार होतो, तो 'फक्त यासाठीच' असे खात्रीने म्हणता येत नाही.॥ १॥

राम अतर्क्य बुद्धि मन बानी। मत हमार अस सुनहि सयानी॥
तदपि संत मुनि बेद पुराना। जस कछु कहहिं स्वमति अनुमाना॥

हे बुद्धिमती! ऐक. माझ्या मते बुद्धी, मन व वाणीने श्रीरामचंद्रांविषयी तर्क करता येत नाही. तथापि संत, मुनी, वेद आणि पुराणे-हे आपापल्या बुद्धीनुसार जसे काही सांगतात, ॥ २ ॥

तस मैं सुमुखि सुनावउँ तोही । समुझि परइ जस कारन मोही ॥
जब जब होइ धरम कै हानी । बाढ़हिं असुर अधम अभिमानी ॥

आणि जसे मला समजले आहे, हे सुमुखी, तेच अवताराचे कारण मी सांगतो. जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो आणि नीच अभिमानी राक्षस वाढतात, ॥ ३ ॥

करहिं अनीति जाइ नहिं बरनी । सीदहिं बिप्र धेनु सुर धरनी ॥
तब तब प्रभु धरि बिबिध सरीरा । हरहिं कृपानिधि सज्जन पीरा ॥

आणि ते, वर्णन करता येत नाही, असा अन्याय करतात. तसेच ब्राह्मण, गाई, देव आणि पृथ्वी यांना असह्य यातना होतात, तेव्हा तेव्हा ते कृपानिधान प्रभू दिव्य देह धारण करून सज्जनांचे दुःख दूर करतात. ॥ ४ ॥

दो०—असुर मारि थापहिं सुरन्ह राखहिं निज श्रुति सेतु।
जग बिस्तारहिं बिसद जस राम जन्म कर हेतु ॥ १२१ ॥

ते असुरांना ठार मारून देवांची स्थापना करतात, आपल्या (श्वासरूप असलेल्या) वेदांच्या मर्यादेचे रक्षण करतात आणि जगामध्ये आपली उज्ज्वल कीर्ती पसरवितात. श्रीरामचंद्रांच्या अवताराचे हे कारण आहे. ॥ १२१ ॥

सोइ जस गाइ भगत भव तरहीं । कृपासिंधु जन हित तनु धरहीं ॥
राम जनम के हेतु अनेका । परम बिचित्र एक तें एका ॥

ते यशोगान कर-करून भक्तजन भवसागर तरून जातात. कृपासागर भगवान भक्तांच्या हितासाठी देह धारण करतात. श्रीरामचंद्रांनी जन्म घेण्याची अनेक कारणे आहेत. ती एकाहून एक विलक्षण आहेत. ॥ १ ॥

जनम एक दुइ कहउँ बखानी । सावधान सुनु सुमति भवानी ॥
द्वारपाल हरि के प्रिय दोऊ । जय अरु बिजय जान सब कोऊ ॥

हे बुद्धिमती भवानी, त्यांपैकी एक-दोन जन्मांचे वर्णन मी विस्ताराने करतो. तू लक्षपूर्वक ऐक. श्रीहरींचे जय व विजय नावाचे दोन प्रिय द्वारपाल आहेत. त्यांना सर्वजण जाणतात. ॥ २ ॥

बिप्र श्राप तें दूनउ भाई । तामस असुर देह तिन्ह पाई ॥
कनककसिपु अरु हाटकलोचन । जगत बिदित सुरपति मद मोचन ॥

त्या दोन भावांना सनकादिकांच्या शापाने असुरांचे तामसी देह मिळाले. एकाचे नाव होते हिरण्यकशिपू आणि दुसऱ्याचे हिरण्याक्ष. त्यांनी इंद्राची गुर्मी उतरविली होती, हे सर्व जगाला ठाऊक आहे. ॥ ३ ॥

बिजई समर बीर बिख्याता । धरि बराह बपु एक निपाता ॥
होइ नरहरि दूसर पुनि मारा । जन प्रहलाद सुजस बिस्तारा ॥

युद्धामध्ये विजय मिळविणारे ते विख्यात वीर होते. यांपैकी हिरण्याक्षाला भगवंतांनी वराहाचे शरीर धारण करून मारले. नंतर हिरण्यकशिपूचा नरसिंह रूप धारण करून वध केला आणि आपला भक्त प्रल्हाद याची उत्तम कीर्ती पसरविली. ॥ ४ ॥

दो०—भए निसाचर जाइ तेइ महाबीर बलवान।
कुंभकरन रावन सुभट सुर बिजई जग जान॥ १२२॥

पुढे ते (दोघे) देवांना जिंकणारे आणि बडे योद्धे असलेले रावण व कुंभकर्ण नावाचे मोठे बलवान व महावीर राक्षस झाले. त्यांना संपूर्ण जग जाणते. ॥ १२२ ॥

मुकुत न भए हते भगवाना । तीनि जनम द्विज बचन प्रवाना ॥
एक बार तिन्ह के हित लागी । धरेउ सरीर भगत अनुरागी ॥

भगवंतांकडून मारले गेल्यावरही ते दोघे (हिरण्याक्ष व हिरण्यकशिपू) मुक्त झाले नाहीत. कारण ब्राह्मणांच्या शापाचा परिणाम तीन जन्मांचा होता, म्हणून ते मुक्त झाले नाहीत. त्यांना तीन जन्म घ्यावे लागले. तेव्हा भक्तप्रेमी भगवंतांनी त्यांच्या कल्याणासाठी पुन्हा एकदा अवतार घेतला. ॥ १ ॥

कस्यप अदिति तहाँ पितु माता । दसरथ कौसल्या बिख्याता ॥
एक कलप एहि बिधि अवतारा । चरित पवित्र किए संसारा ॥

त्या अवतारामध्ये कश्यप आणि अदिती हे त्यांचे माता-पिता होते. तेच पुढे दशरथ व कौसल्या या नावाने प्रसिद्ध झाले. एका कल्पात अशाप्रकारे त्यांनी अवतार घेऊन जगामध्ये पवित्र लीला केल्या. ॥ २ ॥

एक कलप सुर देखि दुखारे । समर जलंधर सन सब हारे ॥
संभु कीन्ह संग्राम अपारा । दनुज महाबल मरइ न मारा ॥

एका कल्पात जलंधर दैत्याकडून पराजित झाल्यामुळे सर्व देव दुःखी झालेले पाहून शिवांनी त्याच्याशी घनघोर युद्ध केले, परंतु तो महाबली दैत्य मारूनही मरत नव्हता. ॥ ३ ॥

परम सती असुराधिप नारी । तेहिं बल ताहि न जितहिं पुरारी ॥

त्या दैत्यराजाची पत्नी मोठी पतिव्रता होती. तिच्या प्रतापामुळे त्रिपुरासुरासारख्या अजेय शत्रूचा नाश करणारे शिवसुद्धा त्याला जिंकू शकले नाहीत. ॥ ४ ॥

दो०—छल करि टारेउ तासु ब्रत प्रभु सुर कारज कीन्ह।
जब तेहिं जानेउ मरम तब श्राप कोप करि दीन्ह॥ १२३॥

तेव्हा प्रभूने कपटाने तिच्या पातिव्रत्याचा भंग करून देवांचे काम फत्ते केले. जेव्हा तिला हे रहस्य समजले, तेव्हा तिने रागाने भगवंतांना शाप दिला. ॥ १२३ ॥

तासु श्राप हरि दीन्ह प्रमाना । कौतुकनिधि कृपाल भगवाना ॥
तहाँ जलंधर रावन भयऊ । रन हति राम परम पद दयऊ ॥

लीलाधर कृपाळू हरींनी त्या स्त्रीचा शाप प्रमाण मानून स्वीकारला. तोच जलंधर त्या कल्पामध्ये रावण झाला. त्याला श्रीरामचंद्रांनी युद्धात मारून परमपद दिले. ॥ १ ॥

एक जनम कर कारन एहा । जेहि लगि राम धरी नरदेहा ॥
प्रति अवतार कथा प्रभु केरी । सुनु मुनि बरनी कबिन्ह घनेरी ॥

एका जन्माचे हे कारण होते. त्यासाठी श्रीरामांनी मनुष्यदेह धारण केला. हे भरद्वाज मुनी, ऐका. प्रभूंच्या प्रत्येक अवताराची कथा कवींनी नानाप्रकारे वर्णन केलेली आहे. ॥ २ ॥

नारद श्राप दीन्ह एक बारा । कलप एक तेहि लगि अवतारा ॥
गिरिजा चकित भईं सुनि बानी । नारद बिष्नुभगत पुनि ग्यानी ॥

एकदा नारदांनी शाप दिला, म्हणून त्यासाठी एका कल्पात भगवंतांचा अवतार झाला.' ही गोष्ट ऐकून पार्वती मोठी चकित झाली. (आणि ती म्हणाली) 'नारद तर विष्णुभक्त आणि ज्ञानी आहेत. ॥ ३ ॥

कारन कवन श्राप मुनि दीन्हा । का अपराध रमापति कीन्हा ॥
यह प्रसंग मोहि कहहु पुरारी । मुनि मन मोह आचरज भारी ॥

मग नारद मुनींनी भगवंतांना का शाप दिला? लक्ष्मीपती भगवंतांनी त्यांचा काय अपराध केला होता? हे नाथ! ती कथा मला सांगा. नारदमुनींच्या मनातही मोह उत्पन्न झाला, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे!' ॥ ४ ॥

दो०—बोले बिहसि महेस तब ग्यानी मूढ़ न कोइ।
जेहि जस रघुपति करहिं जब सो तस तेहि छन होइ ॥ १२४ (क) ॥

तेव्हा महादेव हसत-हसत म्हणाले, 'कोणी ज्ञानी नाही, आणि मूर्खही नाही. श्रीरघुनाथ ज्याला जसे बनवितात, त्याक्षणी तो तसा बनतो.' ॥ १२४ (क) ॥

सो०—कहउँ राम गुन गाथ भरद्वाज सादर सुनहु।
भव भंजन रघुनाथ भजु तुलसी तजि मान मद ॥ १२४ (ख) ॥

(याज्ञवल्क्य म्हणतात-) 'हे भरद्वाज, मी श्रीरामचंद्रांच्या गुणांची कथा सांगतो, ती तुम्ही आदराने ऐका.' तुलसीदास म्हणतात, 'मान व मद सोडून जन्म-मृत्यूचा नाश करणाऱ्या श्रीरामांना भजा.' ॥ १२४ (ख) ॥

हिमगिरि गुहा एक अति पावनि । बह समीप सुरसरी सुहावनि ॥
आश्रम परम पुनीत सुहावा । देखि देवरिषि मन अति भावा ॥

हिमालय पर्वतामध्ये एक मोठी पवित्र गुहा होती. तिच्या जवळूनच सुंदर गंगा वाहात होती. तो परम पवित्र आश्रम पाहून नारदांच्या मनाला अतिशय आनंद झाला. ॥ १ ॥

निरखि सैल सरि बिपिन बिभागा । भयउ रमापति पद अनुरागा ॥
सुमिरत हरिहि श्राप गति बाधी । सहज बिमल मन लागि समाधी ॥

पर्वत, नदी आणि वनाचे (सुंदर) विभाग पाहून नारदांना लक्ष्मीकांत भगवंतांविषयी प्रेम वाटू लागले. भगवंतांचे स्मरण करताच त्यांच्या (नारदांच्या) शापाची गती (दक्ष प्रजापतीने नारदांना शाप दिला होता, म्हणून ते एका जागी थांबू शकत नव्हते.) थांबली आणि त्यांचे मन स्वभावत:च निर्मळ असल्यामुळे त्यांची समाधी लागली. ॥ २ ॥

मुनि गति देखि सुरेस डेराना । कामहि बोलि कीन्ह सनमाना ॥
सहित सहाय जाहु मम हेतू । चलेउ हरषि हियँ जलचरकेतू ॥

नारदांची स्थिती पाहून देवराज इंद्र घाबरला. त्याने कामदेवाला बोलावून त्याचा आदर-सत्कार केला, (आणि म्हटले) 'माझ्या कल्याणासाठी तू आपल्या साहाय्यकांच्यासह (नारदांची समाधी भंग करण्यास) जा.' (हे ऐकून) कामदेव मनात प्रसन्न होऊन निघाला. ॥ ३ ॥

सुनासीर मन महुँ असि त्रासा । चहत देवरिषि मम पुर बासा ॥
जे कामी लोलुप जग माहीं । कुटिल काक इव सबहि डेराहीं ॥

इंद्राच्या मनात भीती वाटत होती की, देवर्षी नारदांना माझ्या पुरी (अमरावती) चे राज्य हवे आहे. जगामध्ये जे कामी व लोभी असतात, ते दुष्ट कावळ्याप्रमाणे सर्वांना घाबरतात. ॥ ४ ॥

दो०—सूख हाड़ लै भाग सठ स्वान निरखि मृगराज।
छीनि लेइ जनि जान जड़ तिमि सुरपतिहि न लाज ॥ १२५ ॥

ज्याप्रमाणे मूर्ख कुत्रा सिंहाला पाहून वाळलेले हाड तोंडात धरून पळत सुटते. त्या मूर्खाला वाटते की, आपले हाडूक सिंह पळवून नेईल, त्याप्रमाणे इंद्राला (नारद आपले राज्य हिरावून घेतील, असा विचार करताना) लाज वाटली नाही. ॥ १२५ ॥

तेहि आश्रमहिं मदन जब गयऊ । निज मायाँ बसंत निरमयऊ ॥
कुसुमित बिबिध बिटप बहुरंगा । कूजहिं कोकिल गुंजहिं भृंगा ॥

जेव्हा कामदेव त्या आश्रमात गेला, तेव्हा त्याने आपल्या मायेने तेथे वसंतऋतू उत्पन्न केला. त्यामुळे नानातऱ्हेच्या वृक्षांवर रंगीबेरंगी फुले उमलली. त्यांच्यावर बसून कोकिळा कुहूकुहू करू लागल्या आणि भ्रमर गुंजारव करू लागले. ॥ १ ॥

चली सुहावनि त्रिबिध बयारी । काम कृसानु बढ़ावनिहारी ॥
रंभादिक सुरनारि नबीना । सकल असमसर कला प्रबीना ॥

कामाग्नी भडकविणाऱ्या तीन प्रकारच्या (शीतल, मंद व सुगंधी) हवेच्या लहरी वाहू लागल्या. रंभा इत्यादी कामकलेमध्ये निपुण असलेल्या सर्व नवयौवना देवांगना- ॥ २ ॥

करहिं गान बहु तान तरंगा । बहुबिधि क्रीड़हिं पानि पतंगा ॥
देखि सहाय मदन हरषाना । कीन्हेसि पुनि प्रपंच बिधि नाना ॥

अनेक प्रकारच्या ताना घेत गाऊ लागल्या आणि हातात चेंडू घेऊन नाना प्रकारचे खेळ खेळू लागल्या. कामदेव आपल्या या साहाय्यकांना पाहून प्रसन्न झाला आणि त्याने नाना प्रकारचे माया-जाल पसरले. ॥ ३ ॥

काम कला कछु मुनिहि न ब्यापी । निज भयँ डरेउ मनोभव पापी ॥
सीम कि चाँपि सकइ कोउ तासू । बड़ रखवार रमापति जासू ॥

परंतु कामदेवाची कोणतीही कला मुनींवर प्रभाव टाकू शकली नाही. तेव्हा तो पापी कामदेव स्वत:च्या नाशाच्या भीतीने घाबरून गेला. लक्ष्मीपती भगवंत ज्याचे रक्षक असतील त्याची धर्ममर्यादा कोण भंग करू शकेल बरे ? ॥ ४ ॥

दो०—सहित सहाय सभीत अति मानि हारि मन मैन।
गहेसि जाइ मुनि चरन तब कहि सुठि आरत बैन ॥ १२६ ॥

तेव्हा कामदेवाने फार घाबरून व मनात पराजय मान्य करून आपल्या सहकाऱ्यांसह मोठ्या दीनतेने मुनींचे पाय धरले. ॥ १२६ ॥

भयउ न नारद मन कछु रोषा । कहि प्रिय बचन काम परितोषा ॥
नाइ चरन सिरु आयसु पाई । गयउ मदन तब सहित सहाई ॥

नारदांना मुळीच राग आला नाही. त्यांनी गोड शब्दांत कामदेवाचे समाधान केले. तेव्हा मुनींच्या चरणी मस्तक ठेवून व त्यांची आज्ञा घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह तो परत गेला. ॥ १ ॥

मुनि सुसीलता आपनि करनी । सुरपति सभाँ जाइ सब बरनी ॥
सुनि सब कें मन अचरजु आवा । मुनिहि प्रसंसि हरिहि सिरु नावा ॥

देवराज इंद्राच्या सभेत जाऊन त्याने मुनींचे शील आणि आपले कर्तृत्व सांगितले. ते ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले आणि त्यांनी मुनींची प्रशंसा करीत श्रीहरींना नमन केले. ॥ २ ॥

तब नारद गवने सिव पाहीं । जिता काम अहमिति मन माहीं ॥
मार चरित संकरहि सुनाए । अतिप्रिय जानि महेस सिखाए ॥

मग नारद श्रीशिवांच्याकडे गेले. त्यांच्या मनात अहंकार उत्पन्न झाला की, मी कामदेवाला

जिंकले. त्यांनी शिवांना कामदेवाची करणी सांगितली. शिवांनी त्यांना आपला आवडता समजून असा उपदेश दिला, ॥ ३ ॥

बार बार बिनवउँ मुनि तोही । जिमि यह कथा सुनायहु मोही ॥
तिमि जनि हरिहि सुनावहु कबहूँ । चलेहुँ प्रसंग दुराएहु तबहूँ ॥

'हे मुनी, मी तुम्हांला वारंवार विनंती करतो की, ही कथा तुम्ही मला जशी सांगितली, तशी भगवान श्रीहरींना कधी सांगू नका. बोलण्याच्या ओघात विषय आला तरीही लपवून ठेवा.' ॥ ४ ॥

दो०—संभु दीन्ह उपदेस हित नहिं नारदहि सोहान ।
भरद्वाज कौतुक सुनहु हरि इच्छा बलवान ॥ १२७ ॥

श्रीशिवांनी हा त्यांच्या भल्याचा उपदेश केला, परंतु नारदांना तो पटला नाही. हे भरद्वाज, आता गंमत ऐका. श्रीहरींची इच्छा मोठी बलवान आहे. ॥ १२७ ॥

राम कीन्ह चाहहिं सोइ होई । करै अन्यथा अस नहिं कोई ॥
संभु बचन मुनि मन नहिं भाए । तब बिरंचि के लोक सिधाए ॥

श्रीरामचंद्रांना जे करायचे असते, तेच होते. त्याविरुद्ध करू शकेल, असा कोणीही नाही. शिवांचे बोलणे नारदांना रुचले नाही, तेव्हा ते तेथून ब्रह्मलोकी गेले. ॥ १ ॥

एक बार करतल बर बीना । गावत हरि गुन गान प्रबीना ॥
छीरसिंधु गवने मुनिनाथा । जहँ बस श्रीनिवास श्रुतिमाथा ॥

एकदा गानविद्येत कुशल असलेले मुनिनाथ नारद हाती सुंदर वीणा घेऊन हरिगुण गात-गात क्षीरसागरात गेले. तेथे मूर्तिमंत वेदान्ततत्त्व असलेले लक्ष्मीनिवास भगवान नारायण राहातात. ॥ २ ॥

हरषि मिले उठि रमानिकेता । बैठे आसन रिषिहि समेता ॥
बोले बिहसि चराचर राया । बहुते दिनन कीन्हि मुनि दाया ॥

भगवान लक्ष्मीकांत उभे राहून नारदांना आनंदाने भेटले आणि ते ऋषी नारदांसोबत आसनावर बसले. चराचराचे स्वामी भगवान हसून म्हणाले-'हे मुनी, आज बऱ्याच दिवसांनी (येण्याची) दया केली.' ॥ ३ ॥

काम चरित नारद सब भाषे । जद्यपि प्रथम बरजि सिवँ राखे ॥
अति प्रचंड रघुपति कै माया । जेहि न मोह अस को जग जाया ॥

जरी श्रीशिवांनी नारदांना पूर्वीच 'हे सांगू नका,' अशी सूचना केली होती, तरीही त्यांनी कामदेवाची सर्व करणी भगवंतांना सांगितली. श्रीरघुनाथांची माया मोठी प्रबळ असते. ती मोहित करू शकणार नाही, असा या जगात कोण जन्मला आहे? ॥ ४ ॥

दो०—रूख बदन करि बचन मृदु बोले श्रीभगवान।
तुम्हरे सुमिरन तें मिटहिं मोह मार मद मान॥ १२८॥

भगवान तटस्थपणे वरवर कोमल स्वरात म्हणाले की, 'हे मुनिराज, तुमचे स्मरण केल्यानेही इतरांचे मोह, काम, मद व अभिमान हे नाहीसे होतात. (मग तुमच्याबद्दल काय बोलायचे?)॥

सुनु मुनि मोह होइ मन ताकें। ग्यान बिराग हृदय नहिं जाकें॥
ब्रह्मचरज ब्रत रत मतिधीरा। तुम्हहि कि करइ मनोभव पीरा॥

हे मुनी, ज्याच्या हृदयात ज्ञान-वैराग्य नसते, त्याच्या मनात मोह येतो. तुम्ही तर ब्रह्मचर्यव्रता-मध्ये तत्पर आणि मोठ्या धीरबुद्धीचे आहात. तुम्हांला कामदेव कधी त्रास देऊ शकेल काय?'॥ १॥

नारद कहेउ सहित अभिमाना। कृपा तुम्हारि सकल भगवाना॥
करुनानिधि मन दीख बिचारी। उर अंकुरेउ गरब तरु भारी॥

नारदांनी मोठ्या अभिमानाने म्हटले की, 'भगवन! ही सर्व तुमची कृपा आहे.' करुणानिधान भगवंतांनी मनात विचार करून पाहिले की, यांच्या मनात प्रचंड गर्वाच्या वृक्षाचा अंकुर उत्पन्न झाला आहे.॥ २॥

बेगि सो मैं डारिहउँ उखारी। पन हमार सेवक हितकारी॥
मुनि कर हित मम कौतुक होई। अवसि उपाय करबि मैं सोई॥

सेवकांचे हित करणे हे माझे ब्रीद आहे. तेव्हा मी तो अंकुर तावडतोब उपटून टाकतो. मुनींचे कल्याण आणि माझा गंमतीचा खेळ होईल, असा उपाय आपण अवश्य करावा.॥ ३॥

तब नारद हरि पद सिर नाई। चले हृदयँ अहमिति अधिकाई॥
श्रीपति निज माया तब प्रेरी। सुनहु कठिन करनी तेहि केरी॥

तेव्हा नारद भगवंतांच्या चरणी मस्तक ठेवून निघाले. त्यांच्या मनात अभिमान अधिकच वाढला होता. तेव्हा लक्ष्मीपती भगवंतांनी आपल्या मायेला प्रेरित केले. तिची करणी किती दुस्तर असते ते पाहा.॥ ४॥

दो०—बिरचेउ मग महुँ नगर तेहिं सत जोजन बिस्तार।
श्रीनिवासपुर तें अधिक रचना बिबिध प्रकार॥ १२९॥

तिने (हरिमायेने) वाटेत शंभर योजनांचे (चारशे कोसाचे) नगर रचले. त्या नगरातील विविध रचना विष्णूंच्या वैकुंठापेक्षाही अधिक सुंदर होत्या.॥ १२९॥

बसहिं नगर सुंदर नर नारी। जनु बहु मनसिज रति तनुधारी॥
तेहिं पुर बसइ सीलनिधि राजा। अगनित हय गय सेन समाजा॥

त्या नगरीत इतके सुंदर स्त्री-पुरुष राहात होते की, जणू कामदेव व रती हेच मानवदेह धारण केलेले असावेत. त्या नगरीत शीलनिधी नावाचा राजा राहात होता. त्याच्याकडे असंख्य घोडे, हत्ती व सैन्याची दले होती. ॥ १ ॥

सत सुरेस सम बिभव बिलासा । रूप तेज बल नीति निवासा ॥
बिस्वमोहनी तासु कुमारी । श्री बिमोह जिसु रूपु निहारी ॥

त्याचे वैभव आणि विलास शंभर इंद्रांसमान होते. तो स्वत: रूप, तेज, बल आणि नीतीचे घर होता. त्याला विश्वमोहिनी नावाची एक रूपवती कन्या होती, तिचे रूप पाहून लक्ष्मीनेसुद्धा मोहित व्हावे. ॥ २ ॥

सोइ हरिमाया सब गुन खानी । सोभा तासु कि जाइ बखानी ॥
करइ स्वयंबर सो नृपबाला । आए तहँ अगनित महिपाला ॥

ती सर्व गुणांची खाण भगवंतांची मायाच होती. तिच्या शोभेचे वर्णन कसे करता येईल? ती राजकुमारी स्वयंवर करू इच्छित होती. त्यासाठी तेथे अगणित राजे आले होते. ॥ ३ ॥

मुनि कौतुकी नगर तेहिं गयऊ । पुरबासिन्ह सब पूछत भयऊ ॥
सुनि सब चरित भूपगृहँ आए । करि पूजा नृप मुनि बैठाए ॥

नारद मुनी कुतूहलाने त्या नगरीत गेले आणि नगरवासींयाच्याकडे त्यांनी विचारपूस केली. सर्व वार्ता ऐकल्यावर ते राजाच्या महालात आले. राजाने त्यांची पूजा करून त्यांना आसनावर बसविले. ॥ ४ ॥

दो०—आनि देखाई नारदहि भूपति राजकुमारि।
कहहु नाथ गुन दोष सब एहि के हृदयँ बिचारि ॥ १३० ॥

नंतर राजाने राजकुमारीला आणून नारदांना दाखविले. (आणि विचारले) 'हे नाथ, तुम्ही विचार करून हिचे सर्व गुण-दोष सांगा.' ॥ १३० ॥

देखि रूप मुनि बिरति बिसारी । बड़ी बार लगि रहे निहारी ॥
लच्छन तासु बिलोकि भुलाने । हृदयँ हरष नहिं प्रगट बखाने ॥

तिचे रूप पाहून नारद मुनी वैराग्य विसरून गेले आणि बराच वेळ तिच्याकडे बघतच राहिले. तिची लक्षणे पाहून मुनी स्वत:ला विसरून गेले आणि मनात हर्षित झाले. परंतु प्रकटपणे त्यांनी लक्षणे सांगितली नाहीत. ॥ १ ॥

जो एहि बरइ अमर सोइ होई । समरभूमि तेहि जीत न कोई ॥
सेवहिं सकल चराचर ताही । बरइ सीलनिधि कन्या जाही ॥

(त्या लक्षणांचा विचार करून ते मनात म्हणाले-) जो हिच्याशी विवाह करील, तो अमर होईल

आणि रणभूमीमध्ये त्याला कोणी जिंकू शकणार नाही. ही शीलनिधीची कन्या ज्याला वरील, सर्व चराचर त्याची सेवा करील. ॥ २ ॥

लच्छन सब बिचारि उर राखे । कछुक बनाइ भूप सन भाषे।
सुता सुलच्छन कहि नृप पाहीं । नारद चले सोच मन माहीं।

ती सर्व लक्षणे मुनींनी मनात ठेवली आणि राजाला त्यांनी आपल्या मनाने काही लक्षणे सांगितली. राजाला मुलीची सुलक्षणे सांगून नारद निघून गेले. परंतु त्यांच्या मनात असे आले की, ॥ ३ ॥

करौं जाइ सोइ जतन बिचारी । जेहि प्रकार मोहि बरै कुमारी ॥
जप तप कछु न होइ तेहि काला । हे बिधि मिलइ कवन बिधि बाला ॥

आता जाऊन आपण असा उपाय करावा की, ही कन्या मलाच मिळेल. यावेळी जप तप करून काही होणार नाही. हे विधात्या, ही कन्या मला कशी बरे मिळेल? ॥ ४ ॥

दो०—एहि अवसर चाहिअ परम सोभा रूप बिसाल।
जो बिलोकि रीझै कुअँरि तब मेलै जयमाल॥ १३१ ॥

या वेळी मला खूप लावण्य आणि अत्यंत सुंदर रूप हवे. ते पाहून राजकुमारी माझ्यावर भाळून जाईल आणि वरमाला मला घालील. ॥ १३१ ॥

हरि सन मागौं सुंदरताई । होइहि जात गहरु अति भाई ॥
मोरें हित हरि सम नहिं कोऊ । एहि अवसर सहाय सोइ होऊ ॥

(आता असे करावे.) भगवंतांकडे सौंदर्य मागावे. परंतु त्यांच्याकडे जाण्यास फार वेळ होईल. परंतु श्रीहरींच्याशिवाय माझा हितचिंतक कोणी नाही, म्हणून या वेळी तेच मला साह्य करोत म्हणजे झाले. ॥ १ ॥

बहुबिधि बिनय कीन्हि तेहि काला । प्रगटेउ प्रभु कौतुकी कृपाला ॥
प्रभु बिलोकि मुनि नयन जुड़ाने । होइहि काजु हिएँ हरषाने ॥

त्यावेळी नारदांनी भगवंतांना पुष्कळ प्रार्थना केली, तेव्हा लीलामय कृपाळू प्रभू तेथे प्रगट झाले. स्वामींना पाहाताच नारदांचे नेत्र प्रफुल्लित झाले आणि ते मनात आनंदित होऊन म्हणाले की, आता काम झालेच. ॥ २ ॥

अति आरति कहि कथा सुनाई । करहु कृपा करि होहु सहाई ॥
आपन रूप देहु प्रभु मोही । आन भाँति नहिं पावौं ओही ॥

नारदांनी काकुळतीला येऊन सर्व कथा सांगितली (आणि प्रार्थना केली की,) कृपा करा आणि मला मदत करा. हे प्रभो, तुम्ही मला आपले रूप द्या. याखेरीज दुसऱ्या कशामुळेही मी त्या राजकन्येस मिळवू शकणार नाही. ॥ ३ ॥

जेहि बिधि नाथ होइ हित मोरा । करहु सो बेगि दास मैं तोरा ॥
निज माया बल देखि बिसाला । हियँ हँसि बोले दीनदयाला ॥

हे नाथ, माझे कल्याण होईल, असे लवकर करा. मी तुमचा दास आहे.' आपल्या मायेचे प्रचंड बळ पाहून दीनदयाळू भगवान मनात हसत म्हणाले, ॥ ४ ॥

दो०—जेहि बिधि होइहि परम हित नारद सुनहु तुम्हार।
सोइ हम करब न आन कछु बचन न मृषा हमार॥ १३२ ॥

'हे नारद, ज्यामुळे तुमचे परम हित होईल, तेच आम्ही करू. दुसरे काही नाही. आमचे वचन असत्य ठरत नसते. ॥ १३२ ॥

कुपथ माग रुज ब्याकुल रोगी । बैद न देइ सुनहु मुनि जोगी ॥
एहि बिधि हित तुम्हार मैं ठयऊ । कहि अस अंतरहित प्रभु भयऊ ॥

हे योगी मुनी, ऐका. रोगाने व्याकूळ झालेल्या रोग्याने कुपथ्य मागितले, तरी वैद्य ते देत नाही. तशा प्रकारे मीही तुमचे कल्याण करण्याचा निश्चय केलेला आहे.' असे म्हणून भगवंत अंतर्धान पावले. ॥ १ ॥

माया बिबस भए मुनि मूढ़ा । समुझी नहिं हरि गिरा निगूढ़ा ॥
गवने तुरत तहाँ रिषिराई । जहाँ स्वयंबर भूमि बनाई ॥

(भगवंतांच्या) मायेच्या अधीन झालेले मुनी इतके बुद्धिहीन झाले होते की, ते भगवंतांची रहस्यमय वाणी समजू शकले नाहीत. ऋषिराज नारद स्वयंवरासाठी बनविलेल्या मंडपाकडे गेले. ॥ २ ॥

निज निज आसन बैठे राजा । बहु बनाव करि सहित समाजा ॥
मुनि मन हरष रूप अति मोरें । मोहि तजि आनहि बरिहि न भोरें ॥

राजे मोठे नटून-थटून आपल्या परिवारासह आपापल्या आसनावर बसले होते. नारद मुनी मनातून आनंदित होते की, माझे रूप फार सुंदर आहे. राजकन्या मला सोडून दुसऱ्या कुणालाही वरणार नाही. ॥ ३ ॥

मुनि हित कारन कृपानिधाना । दीन्ह कुरूप न जाइ बखाना ॥
सो चरित्र लखि काहुँ न पावा । नारद जानि सबहिं सिर नावा ॥

कृपानिधान भगवंतांनी मुनींच्या कल्याणासाठी त्यांना इतके कुरूप बनविले होते की, सांगून सोय नाही. परंतु भगवंतांची ही लीला कुणाला कळू शकली नाही. त्यांना नारद समजूनच सर्वांनी प्रणाम केला. ॥ ४ ॥

दो०—रहे तहाँ दुइ रुद्र गन ते जानहिं सब भेउ।
बिप्रबेष देखत फिरहिं परम कौतुकी तेउ॥ १३३ ॥

तेथे शिवांचे दोन गण होते. त्यांना सर्व रहस्य समजले होते. ते ब्राह्मणांचा वेष धारण करून सर्व लीला पाहात फिरत होते. तेही मोठे थट्टेखोर होते. ॥ १३३ ॥

जेहिं समाज बैठे मुनि जाई । हृदयँ रूप अहमिति अधिकाई ॥
तहँ बैठे महेस गन दोऊ । बिप्रबेष गति लखइ न कोऊ ॥

नारद आपल्या मनात रूपाचा मोठा अभिमान बाळगून ज्या समुदायात बसले होते, तेथेच ते दोन्ही गणही बसले होते. ब्राह्मणवेषात असल्यामुळे त्यांचे हे कपट कुणाच्याही लक्षात आले नाही. ॥ १ ॥

करहिं कूटि नारदहि सुनाई । नीकि दीन्हि हरि सुंदरताई ॥
रीझिहि राजकुअँरि छबि देखी । इन्हहि बरिहि हरि जानि बिसेषी ॥

ते नारदांना ऐकू जाईल, अशा तऱ्हेने नारदांची टर उडवू लागले, "भगवंतांनी यांना काय सौंदर्य बहाल केले आहे. यांची शोभा पाहून राजकुमारी भाळून जाईल आणि 'हरी' (वानर) समजून यांनाच वरेल' ॥ २ ॥

मुनिहि मोह मन हाथ पराएँ । हँसहिं संभु गन अति सचु पाएँ ॥
जदपि सुनहिं मुनि अटपटि बानी । समुझि न परइ बुद्धि भ्रम सानी ॥

नारदांना मोह झाला होता, कारण त्यांचे मन मायेच्या अधीन झाले होते. शिवांचे गण ते पाहून मोठ्या आनंदाने हसत होते. त्यांची टवाळी मुनी ऐकत होते, परंतु बुद्धी भ्रमात पडल्यामुळे ती त्यांना समजत नव्हती. (त्या गोष्टी त्यांना स्वत:च्या प्रशंसेच्या वाटत होत्या.) ॥ ३ ॥

काहुँ न लखा सो चरित बिसेषा । सो सरूप नृपकन्याँ देखा ॥
मर्कट बदन भयंकर देही । देखत हृदयँ क्रोध भा तेही ॥

ही बाब इतर कुणालाही समजली नाही. फक्त राजकन्येने नारदांचे ते रूप पाहिले. त्यांचे तोंड माकडासारखे होते आणि ते भयंकर शरीर पाहताच राजकन्येला राग आला. ॥ ४ ॥

दो०—सखीं संग लै कुअँरि तब चलि जनु राजमराल ।
देखत फिरइ महीप सब कर सरोज जयमाल ॥ १३४ ॥

मग राजकुमारी सख्यांबरोबर जणू राजहंसीसारखी चालत निघाली. ती आपल्या कर-कमलांमध्ये जयमाला घेऊन सर्व राजे लोकांना पाहात फिरू लागली. ॥ १३४ ॥

जेहि दिसि बैठे नारद फूली । सो दिसि तेहिं न बिलोकी भूली ॥
पुनि पुनि मुनि उकसहिं अकुलाहीं । देखि दसा हर गन मुसुकाहीं ॥

जिकडे नारद (रूपाच्या घमेंडीमध्ये) फुगून बसले होते, तिकडे तिने चुकूनही बघितले नाही. नारदमुनी वारंवार मान उंचावून बघत होते आणि चरफडत होते. त्यांची ती दशा पाहून शिवगण हसत होते. ॥ १ ॥

धरि नृपतनु तहँ गयउ कृपाला । कुअँरि हरषि मेलेउ जयमाला ॥
दुलहिनि लै गे लच्छिनिवासा । नृपसमाज सब भयउ निरासा ॥

कृपाळू भगवंतही राजाचे शरीर धारण करून तेथे जाऊन पोहोचले. राजकुमारीने आनंदित होऊन त्यांच्या गळ्यात जयमाला घातली. लक्ष्मीनिवास भगवंत नवरीला घेऊन गेले. सर्व राजे मंडळी निराश झाली. ॥ २ ॥

मुनि अति बिकल मोहँ मति नाठी । मनि गिरि गई छूटि जनु गाँठी ॥
तब हर गन बोले मुसुकाई । निज मुख मुकुर बिलोकहु जाई ॥

मोहामुळे नारद मुनींची बुद्धी नष्ट झाली होती. त्यामुळे ते (राजकुमारी गेल्याचे पाहून) खट्टू झाले, जणू गाठीतील रत्न हरवले होते. तेव्हा शिवांचे गण हसून म्हणाले की, 'जाऊन आरशात आपले तोंड तर बघा.' ॥ ३ ॥

अस कहि दोउ भागे भयँ भारी । बदन दीख मुनि बारि निहारी ॥
बेषु बिलोकि क्रोध अति बाढ़ा । तिन्हहि सराप दीन्ह अति गाढ़ा ॥

असे म्हणून ते दोघे घाबरून पळून गेले. मुनींनी पाण्यामध्ये डोकावून आपले तोंड पाहिले. आपले रूप पाहून त्यांना फार राग आला. त्यांनी शिवांच्या त्या गणांना कठोर शाप दिला. ॥ ४ ॥

दो०—होहु निसाचर जाइ तुम्ह कपटी पापी दोउ।
हँसेहु हमहि सो लेहु फल बहुरि हँसेहु मुनि कोउ॥ १३५ ॥

'तुम्ही दोघे कपटी आणि पापी राक्षस व्हाल. तुम्ही माझे हसे केले, त्याचे फळ भोगा. यापुढे कोणा मुनीची फजिती कराल?' ॥ १३५ ॥

पुनि जल दीख रूप निज पावा । तदपि हृदयँ संतोष न आवा ॥
फरकत अधर कोप मन माहीं । सपदि चले कमलापति पाहीं ॥

मुनींनी पुन्हा पाण्यात पाहिले, तर त्यांना आपले (खरे) रूप प्राप्त झाले. तरीही त्यांचे समाधान झाले नाही. त्यांचे ओठ फडफडत होते, मनात राग भरला होता. त्वरित ते भगवान कमलापतींच्याकडे गेले. ॥ १ ॥

देहउँ श्राप कि मरिहउँ जाई । जगत मोरि उपहास कराई ॥
बीचहिं पंथ मिले दनुजारी । संग रमा सोइ राजकुमारी ॥

(मनात विचार चालला होता की,) 'जाऊन आता शाप तरी द्यावा किंवा प्राण तरी द्यावा. त्यांनी जगात माझे हसे केले.' त्यांना दैत्यांचे शत्रू भगवान श्रीहरी वाटेतच भेटले. त्यांच्या सोबत लक्ष्मी आणि तीच राजकुमारी होती. ॥ २ ॥

बोले मधुर बचन सुरसाईं । मुनि कहँ चले बिकल की नाईं ॥
सुनत बचन उपजा अति क्रोधा । माया बस न रहा मन बोधा ॥

देवांचे स्वामी भगवंतांनी गोड वाणीने विचारले, 'हे मुनी, व्याकूळ झाल्यासारखे कुठे निघालात?' हे शब्द ऐकताच नारदांना फार राग आला. मायेच्या अधीन झाल्यामुळे मनाला विवेकाचा विसर पडला. ॥ ३ ॥

पर संपदा सकहु नहिं देखी । तुम्हरें इरिषा कपट बिसेषी ॥
मथत सिंधु रुद्रहि बौरायहु । सुरन्ह प्रेरि बिष पान करायहु ॥

(मुनी म्हणाले,) 'तुम्हांला दुसऱ्याचे बरे झालेले पाहवत नाही. तुमच्यामध्ये ईर्ष्या आणि कपट आहे. समुद्रमंथन करताना तुम्ही शिवांना बावळट बनविले आणि देवांना प्रेरित करून त्यांना विष-प्राशन करायला लावले. ॥ ४ ॥

दो०—असुर सुरा बिष संकरहि आपु रमा मनि चारु ।
स्वारथ साधक कुटिल तुम्ह सदा कपट ब्यवहारु ॥ १३६ ॥

असुरांना मदिरा आणि शिवांना विष देऊन तुम्ही स्वत: मात्र लक्ष्मी आणि सुंदर कौस्तुभ मणी घेतलात. तुम्ही धोकेबाज आणि स्वार्थी आहात. नेहमी कपटी व्यवहार करता. ॥ १३६ ॥

परम स्वतंत्र न सिर पर कोई । भावइ मनहि करहु तुम्ह सोई ॥
भलेहि मंद मंदेहि भल करहू । बिसमय हरष न हियँ कछु धरहू ॥

तुम्ही पूर्ण स्वतंत्र आहात. तुमच्यावर अंकुश ठेवणारा कोणी नाही, म्हणून मनाला येईल तसे करता. चांगल्याला वाईट आणि वाईटाला चांगले करता. मनात हर्ष-विषाद काहीही आणत नाही. ॥ १ ॥

डहकि डहकि परिचेहु सब काहू । अति असंक मन सदा उछाहू ॥
करम सुभासुभ तुम्हहि न बाधा । अब लगि तुम्हहि न काहूँ साधा ॥

सर्वांना ठकवून ठकवून सोकावला आहात आणि फार बेफिकीर झाला आहात. म्हणून (ठकविण्याच्या बाबतीत) तुमच्या मनात नेहमी उत्साह असतो. शुभ-अशुभ कर्मांची तुम्हांला बाधा नसते. आजपर्यंत तुम्हांला कुणी सरळ केलेले नाही. ॥ २ ॥

भले भवन अब बायन दीन्हा । पावहुगे फल आपन कीन्हा ॥
बंचेहु मोहि जवनि धरि देहा । सोइ तनु धरहु श्राप मम एहा ॥

या वेळी तुम्ही चांगल्या घरी वाण दिले आहे. (माझ्यासारख्या भारी व्यक्तीला डिवचले आहे.) म्हणून स्वत:च्या कर्माचे फळ नक्की मिळेल. जे राजाचे शरीर धारण करून तुम्ही मला ठकविले आहे, तेच शरीर तुम्ही धारण कराल, हा माझा शाप आहे. ॥ ३ ॥

कपि आकृति तुम्ह कीन्हि हमारी । करिहहिं कीस सहाय तुम्हारी ॥
मम अपकार कीन्ह तुम्ह भारी । नारि बिरहँ तुम्ह होब दुखारी ॥

तुम्ही माझे रूप माकडासारखे बनविले होते, म्हणून माकडेच तुम्हांला मदत करतील. (मला

दो०— **जहँ लगि कहे पुरान श्रुति एक एक सब जाग।**
बार सहस्त्र सहस्त्र नृप किए सहित अनुराग॥ १५५॥

वेद आणि पुराणात जितक्या प्रकारचे यज्ञ सांगितले गेले आहेत, राजाने एक एक करून ते सर्व यज्ञ प्रेमाने हजार हजार वेळा पूर्ण केले. ॥ १५५ ॥

हृदयँ न कछु फल अनुसंधाना। भूप बिबेकी परम सुजाना॥
करइ जे धरम करम मन बानी। बासुदेव अर्पित नृप ग्यानी॥

(राजाच्या हृदयात) कोणत्याही फलाची कामना नव्हती. राजा फारच बुद्धिमान आणि ज्ञानी होता. तो ज्ञानी राजा कर्म, मन आणि वाणीने जो काही धर्म करीत होता सर्व वासुदेवार्पण बुद्धीने करीत होता. ॥ १ ॥

चढ़ि बर बाजि बार एक राजा। मृगया कर सब साजि समाजा॥
बिंध्याचल गभीर बन गयऊ। मृग पुनीत बहु मारत भयऊ॥

एकदा तो राजा चांगल्या घोड्यावर सवार होऊन शिकार करण्याचे सर्व साहित्य घेऊन विंध्याचलाच्या दाट जंगलात गेला आणि तेथे त्याने अनेक चांगली चांगली हरणे मारली. ॥ २ ॥

फिरत बिपिन नृप दीख बराहू। जनु बन दुरेउ ससिहि ग्रसि राहू॥
बड़ बिधु नहिं समात मुख माहीं। मनहुँ क्रोध बस उगिलत नाहीं॥

राजाने वनात फिरत असलेल्या एका डुक्कराला पाहिले. (दातामुळे तो असा दिसत होता.) जणू काय चंद्राला ग्रासून (मुखात पकडून) राहू वनात येऊन लपला आहे. चंद्र मोठा असल्यामुळे त्याच्या मुखात मावत नाही आणि जणू काय तो क्रोधवश त्याला ओकून टाकीत नाही. ॥ ३ ॥

कोल कराल दसन छबि गाई। तनु बिसाल पीवर अधिकाई॥
घुरुघुरात हय आरौ पाएँ। चकित बिलोकत कान उठाएँ॥

ही तर डुक्कराच्या भयानक दाताची शोभा सांगितली गेली. (इकडे) त्याचे शरीरसुद्धा फार विशाल आणि लठ्ठ होते. घोड्याची चाहूल लागताच तो गुर गुरत कान उंच करून चकित होऊन पाहत होता. ॥ ४ ॥

दो०— **नील महीधर सिखर सम देखि बिसाल बराहु।**
चपरि चलेउ हय सुटुकि नृप हाँकि न होइ निबाहु॥ १५६॥

नील पर्वताच्या शिखरासारखा विशाल (शरीराचा) अशा डुक्कराला पाहून राजा घोड्याला चाबूक मारून वेगाने निघाला आणि त्याने डुक्कराला ललकारले की, आता तू वाचू शकत नाहीस. ॥ १५६ ॥

आवत देखि अधिक रव बाजी। चलेउ बराह मरुत गति भाजी॥
तुरत कीन्ह नृप सर संधाना। महि मिलि गयउ बिलोकत बाना॥

मोठ्याने ओरडत घोडा (आपल्याकडे) येत असलेला पाहून डुक्कर वायुवेगाने पळाले. राजाने तात्काळ धनुष्यावर बाण चढविला. सुकर बाणाला पाहताच भूमीत दबून राहिले. ॥ १ ॥

तकि तकि तीर महीस चलावा। करि छल सुअर सरीर बचावा॥
प्रगटत दुरत जाइ मृग भागा। रिस बस भूप चलेउ सँग लागा॥

राजा बरोबर हेरून बाण सोडतो पण सुकर युक्ती करून आपल्या शरीराचा बचाव करतो. तो पशू कधी दिसत होता आणि कधी लपून पळत होता. राजासुद्धा क्रोधाने त्याचा पाठलाग करीत होता. ॥ २ ॥

गयउ दूरि घन गहन बराहू। जहँ नाहिन गज बाजि निबाहू॥
अति अकेल बन बिपुल कलेसू। तदपि न मृग मग तजइ नरेसू॥

डुक्कर फारच दूर असलेल्या अशा घनदाट जंगलात शिरले जेथे हत्ती, घोड्याचा निभाव लागत नाही. राजा अगदी एकटाच होता आणि वनात क्लेशही पुष्कळ होत होते. तरीही राजाने त्या डुक्कराचा पिच्छा सोडला नाही. ॥ ३ ॥

कोल बिलोकि भूप बड़ धीरा। भागि पैठ गिरिगुहाँ गभीरा॥
अगम देखि नृप अति पछिताई। फिरेउ महाबन परेउ भुलाई॥

राजाला फार धैर्यवान असल्याचे पाहून डुक्कर पळत जाऊन एका पर्वताच्या गुहेत घुसले. त्या गुहेत जाणे कठीण वाटल्याने राजाला पस्तावून परतावे लागले. परंतु त्या घोर वनात राजाचा रस्ता चुकला. ॥४॥

दो०— **खेद खिन्न छुद्धित तृषित राजा बाजि समेत।**
खोजत ब्याकुल सरित सर जल बिनु भयउ अचेत॥ १५७॥

फार परिश्रम झाल्याने थकलेला आणि घोड्यासह तहान-भुकेने व्याकूळ झालेला राजा नदी-तलाव शोधत-शोधत पाण्याविना व्याकूळ झाला. ॥ १५७ ॥

फिरत बिपिन आश्रम एक देखा। तहँ बस नृपति कपट मुनिबेषा॥
जासु देस नृप लीन्ह छड़ाई। समर सेन तजि गयउ पराई॥

वनात फिरत असताना त्याला एक आश्रम दिसला. तेथे कपटाने मुनिवेष धारण करून एक राजा राहत होता, ज्याचा देश राजा प्रतापभानूने हिसकावून घेतला होता आणि जो सेनेचा त्याग करून युद्धातून पळून गेला होता. ॥ १ ॥

समय प्रतापभानु कर जानी। आपन अति असमय अनुमानी॥
गयउ न गृह मन बहुत गलानी। मिला न राजहि नृप अभिमानी॥

प्रतापभानूचा उत्कर्ष (चांगले दिवस) जाणून आणि आपले वाईट दिवस विचारात घेऊन त्याच्या मनात फार मोठी ग्लानी झाली. म्हणून तो घरीही आला नाही आणि अभिमानी असल्यामुळे प्रतापभानूशी त्याने समेटही केला नाही. ॥ २ ॥

रिस उर मारि रंक जिमि राजा। बिपिन बसइ तापस कें साजा॥
तासु समीप गवन नृप कीन्हा। यह प्रतापरबि तेहिं तब चीन्हा॥

दरिद्र्याप्रमाणे मनातच क्रोधाला मारून तो राजा तपस्वीच्या वेषात वनात राहत होता. राजा (प्रतापभानू) त्याच्याच जवळ गेला. त्याने तात्काळ हा प्रतापभानू आहे असे ओळखले. ॥ ३ ॥

राउ तृषित नहिं सो पहिचाना। देखि सुबेष महामुनि जाना॥
उतरि तुरग तें कीन्ह प्रनामा। परम चतुर न कहेउ निज नामा॥

राजा तहानलेला असल्यामुळे (व्याकूळतेत) त्याने त्या तपस्व्याला ओळखले नाही. सुंदर वेष पाहून राजाने त्याला महामुनी समजले आणि घोड्यावरून उतरून त्याला प्रणाम केला. परंतु फार हुशार असल्याने राजाने त्याला आपले नाव सांगितले नाही. ॥ ४ ॥

दो०— **भूपति तृषित बिलोकि तेहिं सरबरु दीन्ह देखाइ।**
मज्जन पान समेत हय कीन्ह नृपति हरषाइ॥ १५८॥

राजाला तहानलेला पाहून त्याने सरोवर दाखविले. हर्षित होऊन राजाने घोड्यासह त्यात स्नान आणि जलपान केले. ॥ १५८ ॥

गै श्रम सकल सुखी नृप भयऊ। निज आश्रम तापस लै गयऊ॥
आसन दीन्ह अस्त रबि जानी। पुनि तापस बोलेउ मृदु बानी॥

सर्व थकावट समाप्त झाली, राजा सुखी झाला. तेव्हा तपस्वी त्याला आश्रमात घेऊन गेला आणि सूर्यास्ताचा समय जाणून त्याने (राजाला बसण्यासाठी) आसन दिले. मग तो तपस्वी कोमल वाणीने म्हणला— ॥ १ ॥

को तुम्ह कस बन फिरहु अकेलें। सुंदर जुबा जीव परहेलें॥
चक्रबर्ति के लच्छन तोरें। देखत दया लागि अति मोरें॥

तू कोण आहेस? सुंदर तरुण असून शरीराची पर्वा न करता वनात एकटा का फिरत आहेस? तुझे चक्रवर्तीसारखे लक्षण पाहून मला फार दया येत आहे. ॥ २ ॥

नाम प्रतापभानु अवनीसा। तासु सचिव मैं सुनहु मुनीसा॥
फिरत अहेरें परेउँ भुलाई। बड़ें भाग देखेउँ पद आई॥

(राजा म्हणाला) हे मुनीश्वर! ऐका, प्रतापभानू नावाचा एक राजा आहे. मी त्याचा मंत्री आहे. शिकारीसाठी फिरत असताना माझी वाट चुकली आहे. मोठ्या भाग्याने येथे येऊन मला आपल्या चरणांचे दर्शन मिळाले आहे. ॥ ३ ॥

हम कहँ दुर्लभ दरस तुम्हारा। जानत हौं कछु भल होनिहारा॥
कह मुनि तात भयउ अँधिआरा। जोजन सत्तरि नगरु तुम्हारा॥

आम्हाला आपले दर्शन दुर्लभ होते ते झाले, म्हणून असे वाटते की, काही तरी चांगले होणार आहे. मुनी म्हणाले—हे तात! अंधार पडला आहे. तुझे नगर येथून सत्तर योजन दूर आहे. ॥ ४ ॥

दो०— **निसा घोर गंभीर बन पंथ न सुनहु सुजान।**
बसहु आजु अस जानि तुम्ह जाएहु होत बिहान॥ १५९ (क)॥

हे सुजाण! ऐका, घोर अंधारी रात्र आहे, दाट जंगल आहे. चांगली वाट नाही, असे समजून तू आज येथेच मुक्काम कर. सकाळ होताच निघून जा. ॥ १५९ ॥ क

तुलसी जसि भवतब्यता तैसी मिलइ सहाइ।
आपुनु आवइ ताहि पहिं ताहि तहाँ लै जाइ॥ १५९ (ख)॥

तुलसीदासजी महाराज म्हणतात—जसे भवितव्य (होणारी गोष्ट असेल) असेल तशीच साहाय्यता मिळते. एक तर ती त्याच्याजवळ येते नाही तर त्याला तेथे घेऊन जाते. ॥ १५९ ॥ ख

भलेहिं नाथ आयसु धरि सीसा। बाँधि तुरग तरु बैठ महीसा॥
नृप बहु भाँति प्रसंसेउ ताही। चरन बंदि निज भाग्य सराही॥

''हे नाथ! ठीक आहे'' असे म्हणून आणि त्याची आज्ञा शिरोधार्य करून घोडा झाडाला बांधून राजा बसला. राजाने त्याची अनेक प्रकाराने प्रशंसा केली आणि त्याच्या चरणाची वंदना करून आपल्या भाग्याचे कौतुक केले. ॥ १ ॥

पुनि बोलेउ मृदु गिरा सुहाई। जानि पिता प्रभु करउँ ढिठाई॥
मोहि मुनीस सुत सेवक जानी। नाथ नाम निज कहहु बखानी॥

मग सुंदर कोमल वाणीने म्हणाला—हे प्रभो! तुम्हाला मी पिता समजून धाडस करीत आहे. हे मुनीश्वर! मला तुम्ही आपला पुत्र आणि सेवक जाणून तुम्ही आपले नाव (°ाम) विस्ताराने सांगावे. ॥ २ ॥

तेहि न जान नृप नृपहि सो जाना। भूप सुहृद सो कपट सयाना॥
बैरी पुनि छत्री पुनि राजा। छल बल कीन्ह चहइ निज काजा॥

राजाने त्याला ओळखले नाही परंतु त्याने राजाला ओळखले होते. राजा तर शुद्ध अंत:करणाचा होता आणि तो तपस्वी कपट करण्यात चतुर होता. एक तर वैरी, शिवाय जातीने क्षत्रिय आणि राजा. तो छल-कपटाने आपले काम साधू पाहत होता. ॥ ३ ॥

समुझि राजसुख दुखित अराती। अवाँ अनल इव सुलगइ छाती॥
सरल बचन नृप के सुनि काना। बयर सँभारि हृदयँ हरषाना॥

तो शत्रू आपल्या राज्यसुखाच्या स्मरणाने दु:खी होता. त्याचे अंत:करण आतल्या आत कुंभाराच्या आव्याच्या अग्नीसारखे जळत होते. राजाचे सरळ बोल ऐकून आणि आपल्या वैराला स्मरण करून तो हृदयात हर्षित झाला. ॥ ४ ॥

दो०— **कपट बोरि बानी मृदुल बोलेउ जुगुति समेत।**
नाम हमार भिखारि अब निर्धन रहित निकेत॥ १६०॥

तो कपटभरी युक्तीसहित कोमल वाणीने म्हणाला—आत्ता आमचे नाव भिकारी आहे कारण आम्ही निर्धन आणि अनिकेत (घरबारहीन) आहोत. ॥ १६० ॥

कह नृप जे बिग्यान निधाना। तुम्ह सारिखे गलित अभिमाना॥
सदा रहहिं अपनपौ दुराएँ। सब बिधि कुसल कुबेष बनाएँ॥

राजा म्हणाला—जे आपल्यासारखे विज्ञानाचे निधान आणि सर्वथा अभिमानरहित असतात, ते आपल्या स्वरूपाला सदा लपवित असतात. कारण कुवेष धारण करून राहण्यातच सर्व प्रकाराने कल्याण आहे. (प्रगट संतवेषात मान होण्याची संभावना आहे आणि मानाने पतन.) ॥ १ ॥

तेहि तें कहहिं संत श्रुति टेरें। परम अकिंचन प्रिय हरि केरें॥
तुम्ह सम अधन भिखारि अगेहा। होत बिरंचि सिवहि संदेहा॥

म्हणूनच तर संत आणि वेद ओरडून सांगतात की, परम अकिंचनच (सर्वथा अहंकार, ममता आणि मानरहित) भगवंताला आवडतात. तुमच्यासारखे निर्धन, भिकारी आणि गृहहीनांना पाहून ब्रह्मदेव आणि महादेवजी यांनासुद्धा संदेह होतो. (की, ते वास्तविक संत आहेत का भिकारी) ॥ २ ॥

जोसि सोसि तव चरन नमामी। मो पर कृपा करिअ अब स्वामी॥
सहज प्रीति भूपति कै देखी। आपु बिषय बिस्वास बिसेषी॥

तुम्ही जे असाल ते असा (अर्थात् जे कोणी असाल) मी आपल्या चरणी नमस्कार करतो. हे स्वामी! आता माझ्यावर कृपा करा. आपल्यावर राजाची स्वाभाविक प्रीती आणि आपल्याविषयी त्याचा अधिक विश्वास पाहून ॥ ३ ॥

सब प्रकार राजहि अपनाई। बोलेउ अधिक सनेह जनाई॥
सुनु सतिभाउ कहउँ महिपाला। इहाँ बसत बीते बहु काला॥

सर्व प्रकारे राजाला आपल्या वशमध्ये करून, अधिक स्नेह दाखवित तो (कपटी-तपस्वी) म्हणाला—हे राजन्! ऐक, मी तुला सत्य सांगतो, मला इथे येऊन फार काळ लोटला आहे. ॥ ४ ॥

दो०— **अब लगि मोहि न मिलेउ कोउ मैं न जनावउँ काहु।**
लोकमान्यता अनल सम कर तप कानन दाहु॥ १६१ (क)॥

आत्तापर्यंत मला इथे कोणी भेटले नाही आणि मी स्वत:ला कोणापुढे प्रकट करीत नाही कारण समाजात प्रतिष्ठा अग्नीसारखी आहे, जी तपरूपी वनाला भस्म करून टाकते. ॥ १६१ ॥ क

सो०— **तुलसी देखि सुबेषु भूलहिं मूढ़ न चतुर नर।**
सुंदर केकिहि पेखु बचन सुधा सम असन अहि॥ १६१ (ख)॥

तुलसीदासजी म्हणतात— सुंदर वेष पाहून मूढच नव्हे (मूढ तर मूढच आहे) तर चतुर माणूस सुद्धा धोका खातो. सुंदर मोराला पहा. त्याचे बोल तर अमृतासारखे असतात आणि आहार सापाचा असतो. ॥ १६१ ॥ ख

तातें गुपुत रहउँ जग माहीं। हरि तजि किमपि प्रयोजन नाहीं॥
प्रभु जानत सब बिनहिं जनाएँ। कहहु कवनि सिधि लोक रिझाएँ॥

(कपटी तपस्वी म्हणाला—) त्यामुळेच मी जगतात् लपून राहतो. श्रीहरिशिवाय मी कोणाशीही कोणते प्रयोजन ठेवत नाही. प्रभूंना तर न सांगताही सर्व कळते. मग सांगा, संसाराला प्रसन्न करून कोणती सिद्धी मिळणार आहे? ॥ १ ॥

तुम्ह सुचि सुमति परम प्रिय मोरें। प्रीति प्रतीति मोहि पर तोरें॥
अब जौं तात दुरावउँ तोही। दारुन दोष घटइ अति मोही॥

तुम्ही पवित्र सुबुद्धिवान आहात. त्यामुळे मला फारच प्रिय आहात आणि तुम्हालाही माझ्याविषयी प्रीती आणि विश्वास झाला आहे. हे तात! आता जर मी तुमच्यापासून काही लपविले तर मला फार मोठा भयानक दोष लागेल. ॥ २ ॥

जिमि जिमि तापसु कथइ उदासा। तिमि तिमि नृपहि उपज बिस्वासा॥
देखा स्वबस कर्म मन बानी। तब बोला तापस बगध्यानी॥

जसाजसा तपस्वी उदासीनतेच्या गोष्टी सांगत होता, तसा तसा राजाला त्याचा अधिक विश्वास वाटत होता. जेव्हा त्या बगळ्यासारखे ध्यान करणाऱ्या कपटी मुनीने राजाला कर्म, मन आणि वचनाने आपल्या वशीभूत पाहिले तेव्हा तो म्हणाला— ॥ ३ ॥

नाम हमार एकतनु भाई। सुनि नृप बोलेउ पुनि सिरु नाई॥
कहहु नाम कर अरथ बखानी। मोहि सेवक अति आपन जानी॥

हे मित्रा! आमचे नाव एकतनू आहे. हे ऐकून राजाने पुन्हा वंदन करून म्हटले— मला आपला अत्यंत (अनुरागी) सेवक जाणून आपल्या नावाचा अर्थ समजावून सांगा. ॥ ४ ॥

दो०— **आदिसृष्टि उपजी जबहिं तब उतपति भै मोरि।**
नाम एकतनु हेतु तेहि देह न धरी बहोरि॥ १६२॥

(कपटी मुनी म्हणाला—) जेव्हा सर्वात प्रथम सृष्टी उत्पन्न झाली होती, तेव्हाच मी जन्माला आलो. तेव्हापासून मी दुसरा देह धारण केला नाही. म्हणूनच माझे नाव एकतनू आहे. ॥ १६२ ॥

जनि आचरजु करहु मन माहीं। सुत तप तें दुर्लभ कछु नाहीं॥
तपबल तें जग सृजइ बिधाता। तपबल बिष्नु भए परित्राता॥

हे पुत्र! मनात आश्चर्य करू नको. तपाने काहीही दुर्लभ नाही. तपाच्या बलाने ब्रह्मदेव जगताची उत्पत्ती करतात. तपाच्याच बळावर विष्णु संसाराचे पालन करणारे बनले आहेत. ॥ १ ॥

तपबल संभु करहिं संघारा। तप तें अगम न कछु संसारा॥
भयउ नृपहि सुनि अति अनुरागा। कथा पुरातन कहै सो लागा॥

तपाच्या बळावरच रुद्र संहार करतात. संसारात अशी कोणतीही वस्तू नाही जी तपाने मिळू शकत नाही. हे ऐकून राजाला फार प्रेम निर्माण झाले. तेव्हा तो तपस्वी जुन्या कथा सांगू लागला. ॥ २ ॥

करम धरम इतिहास अनेका। करइ निरूपन बिरति बिबेका॥
उदभव पालन प्रलय कहानी। कहेसि अमित आचरज बखानी॥

कर्म, धर्म आणि अनेक प्रकारचे इतिहास सांगून तो वैराग्य आणि ज्ञानाचे निरूपण करू लागला. सृष्टीची उत्पत्ती, पालन (स्थिती) आणि संहाराच्या (प्रलय) आश्चर्ययुक्त कथा त्याने विस्ताराने सांगितल्या. ॥ ३ ॥

सुनि महीप तापस बस भयऊ। आपन नाम कहन तब लयऊ॥
कह तापस नृप जानउँ तोही। कीन्हेहु कपट लाग भल मोही॥

राजा त्या कथा ऐकून तपस्वीला वश झाला आणि तेव्हा तो आपले नाव सांगू लागला. तपस्वी म्हणाला राजन् मी तुला जाणतो आहे. तू कपट केले ते मला आवडले. ॥ ४ ॥

सो०— **सुनु महीस असि नीति जहँ तहँ नाम न कहहिं नृप।**
मोहि तोहि पर अति प्रीति सोइ चतुरता बिचारि तव॥ १६३॥

हे राजन्! ऐक, राजेलोक सहसा आपले नाव सांगत नाहीत. तुमची ती चतुराई मला कळल्याने तुझ्यावर माझे प्रेम झाले आहे. ॥ १६३ ॥

नाम तुम्हार प्रताप दिनेसा। सत्यकेतु तव पिता नरेसा॥
गुर प्रसाद सब जानिअ राजा। कहिअ न आपन जानि अकाजा॥

तुझे नाव प्रतापभानू आहे. सत्यकेतू महाराज तुझे पिता होते. हे राजन्! गुरूच्या कृपेने मी सर्व जाणतो. परंतु आपली हानी समजून सांगत नाही. ॥ १ ॥

देखि तात तव सहज सुधाई। प्रीति प्रतीति नीति निपुनाई॥
उपजि परी ममता मन मोरें। कहउँ कथा निज पूछे तोरें॥

हे तात! तुझा स्वाभाविक सरळपणा, प्रेम, विश्वास आणि नीती निपुणता पाहून माझ्या मनात तुझ्याविषयी फार ममता उत्पन्न झाली आहे. म्हणून मी तुझ्या विचारण्यावरून माझी कथा सांगतो. ॥ २ ॥

अब प्रसन्न मैं संसय नाहीं। मागु जो भूप भाव मन माहीं॥
सुनि सुबचन भूपति हरषाना। गहि पद बिनय कीन्हि बिधि नाना॥

आता मी प्रसन्न आहे. याविषयी संदेह करू नको. हे राजन्! जो मनाला भावेल तोच वर मागून घे. त्याचे सुंदर (प्रिय) वचन ऐकून राजा हर्षित झाला आणि (मुनीचे) चरण पकडून त्याने अनेक प्रकाराने विनंती केली. ॥ ३ ॥

कृपासिंधु मुनि दरसन तोरें। चारि पदारथ करतल मोरें॥
प्रभुहि तथापि प्रसन्न बिलोकी। मागि अगम बर होउँ असोकी॥

हे दयासागर मुनी! आपल्या दर्शनानेच चारी पदार्थ (धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष) माझ्या ताब्यात आले. तरीही स्वामीला प्रसन्न पाहून मी हा दुर्लभ वर मागून शोकरहित का होऊ नये? ॥४॥

दो०— **जरा मरन दुख रहित तनु समर जितै जनि कोउ।**
एकछत्र रिपुहीन महि राज कलप सत होउ॥ १६४॥

माझे शरीर हे वृद्धावस्था, मृत्यू आणि दुःखरहित व्हावे. मला युद्धात कोणीही जिंकू नये आणि पृथ्वीवर माझे राज्य शंभर कल्पापर्यंत एकछत्र अकंटक रहावे. ॥ १६४ ॥

कह तापस नृप ऐसेइ होऊ। कारन एक कठिन सुनु सोऊ॥
कालउ तुअ पद नाइहि सीसा। एक बिप्रकुल छाड़ि महीसा॥

तपस्वी म्हणाला—हे राजन्! असेच होवो. परंतु एक गोष्ट कठीण आहे ती ऐक. हे पृथ्वीचे स्वामी! केवळ ब्राह्मण कुल सोडून काल देखील तुझ्या चरणांवर मस्तक नमवील. ॥ १ ॥

तपबल बिप्र सदा बरिआरा। तिन्ह के कोप न कोउ रखवारा॥
जौं बिप्रन्ह बस करहु नरेसा। तौ तुअ बस बिधि बिष्नु महेसा॥

तपाच्या बलाने ब्राह्मण सदा बलवान राहतात. त्यांच्या क्रोधापासून रक्षण करणारा कोणीही नाही. हे नरपती! जर तू ब्राह्मणांना वश करून घेतले तर ब्रह्मा, विष्णु आणि महेश हे सुद्धा तुझ्या अधीन होतील. ॥ २ ॥

चल न ब्रह्मकुल सन बरिआई। सत्य कहउँ दोउ भुजा उठाई॥
बिप्र श्राप बिनु सुनु महिपाला। तोर नास नहिं कवनेहुँ काला॥

ब्राह्मणकुलावर जोर-जबरदस्ती चालू शकत नाही. मी दोन्ही हात उंच करून सत्य सांगतो. हे राजन्! ऐक, ब्राह्मणांच्या शापाशिवाय तुझा नाश कोणत्याही काळात होणार नाही. ॥ ३ ॥

हरषेउ राउ बचन सुनि तासू। नाथ न होइ मोर अब नासू॥
तव प्रसाद प्रभु कृपानिधाना। मो कहुँ सर्ब काल कल्याना॥

राजा त्याचे वचन ऐकून फार प्रसन्न झाला आणि म्हणू लागला—हे स्वामी! माझा नाश आता होणार नाही. हे कृपानिधान प्रभू! तुमच्या कृपेने माझे सर्वकाळ कल्याण होईल. ॥ ४ ॥

दो०— **एवमस्तु कहि कपट मुनि बोला कुटिल बहोरि।**
मिलब हमार भुलाब निज कहहु त हमहि न खोरि॥ १६५॥

''एवमस्तु'' (असेच होवो) म्हणून तो कुटिल, कपटी, मुनी पुन्हा म्हणाला—(परंतु) तू माझ्या भेटीची गोष्ट आणि तुझा रस्ता चुकल्याची गोष्ट कोणाला (सांगू नको. जर) सांगशील तर माझ्यावर दोष राहणार नाही. ॥ १६५ ॥

तातें मैं तोहि बरजउँ राजा। कहें कथा तव परम अकाजा॥
छठें श्रवन यह परत कहानी। नास तुम्हार सत्य मम बानी॥

हे राजन्! मी तुला यासाठी मना करत आहे की, हा प्रसंग सांगितल्याने तुझी फार मोठी हानी होईल. सहाव्या कानात ही गोष्ट जाताच तुझा नाश होईल. माझे हे वचन सत्य समज. ॥ १ ॥

यह प्रगटें अथवा द्विजश्रापा। नास तोर सुनु भानुप्रतापा॥
आन उपायँ निधन तव नाहीं। जौं हरि हर कोपहिं मन माहीं॥

हे प्रतापभानू! ऐक, ही गोष्ट प्रगट करण्याने अथवा ब्राह्मणांच्या शापाने तुझा नाश होईल. त्याशिवाय कोणत्याही उपायाने, मग ब्रह्मदेव आणि शंकरांनी जरी क्रोध केला तरी तुझा मृत्यू होणार नाही. ॥ २ ॥

सत्य नाथ पद गहि नृप भाषा। द्विज गुर कोप कहहु को राखा॥
राखइ गुर जौं कोप बिधाता। गुर बिरोध नहिं कोउ जग त्राता॥

राजाने मुनींचे चरण पकडून म्हटले—हे स्वामी! सत्यच आहे. ब्राह्मण आणि गुरूच्या क्रोधापासून सांगा कोण रक्षण करू शकतो? ब्रह्मदेवाने जरी क्रोध केला तर गुरू वाचवतील, परंतु गुरूंशी विरोध केल्यास जगतात कोणीही वाचविणारा नाही. ॥ ३ ॥

जौं न चलब हम कहे तुम्हारें। होउ नास नहिं सोच हमारें॥
एकहिं डर डरपत मन मोरा। प्रभु महिदेव श्राप अति घोरा॥

जर मी आपल्या कथनानुसार चाललो नाही, तर (भलेही) माझा नाश होवो, मला त्याची चिंता नाही. माझे मन तर हे प्रभो! (केवळ) एकाच गोष्टीला भीत आहे की, ब्राह्मणांचा शाप तर फारच भयानक असतो. ॥ ४ ॥

दो०— **होहिं बिप्र बस कवन बिधि कहहु कृपा करि सोउ।**
तुम्ह तजि दीनदयाल निज हितू न देखउँ कोउ॥ १६६॥

ते ब्राह्मण कोण्या प्रकाराने वश होऊ शकतील, कृपा करून तेही सांगा! हे दीन दयाळू! मला तुमच्याशिवाय कोणीही माझे हितकर दिसत नाही. ॥ १६६ ॥

सुनु नृप बिबिध जतन जग माहीं। कष्टसाध्य पुनि होहिं कि नाहीं॥
अहइ एक अति सुगम उपाई। तहाँ परंतु एक कठिनाई॥

(तपस्वी म्हणाला—) हे राजन्! ऐक, संसारात उपाय पुष्कळ आहेत. परंतु ते कष्ट साध्य आहेत. (फार परिश्रमाने ते पूर्ण होतात.) यावरही ते सिद्ध होतील अथवा न होतील त्याची सफलता निश्चित नाही. हां, एक उपाय मात्र सोपा आहे, परंतु त्यातही एक काठिण्य आहे. ॥ १ ॥

मम आधीन जुगुति नृप सोई। मोर जाब तव नगर न होई॥
आजु लगें अरु जब तें भयऊँ। काहू के गृह ग्राम न गयऊँ॥

हे राजन्! ती युक्ती तर माझ्या हातात आहे, परंतु माझे तुझ्या नगरात जाणे होऊ शकत नाही. मी जेव्हापासून जन्माला आलो तेव्हापासून आजपर्यंत कोणाच्याही गावात अथवा घरी गेलो नाही. ॥ २ ॥

जौं न जाउँ तव होइ अकाजू। बना आइ असमंजस आजू॥
सुनि महीस बोलेउ मृदु बानी। नाथ निगम असि नीति बखानी॥

परंतु जर नाही गेलो तर तुझे काम बिघडून जाईल. मी यावेळी भ्रमात पडलो आहे. हे ऐकून राजा कोमल भाषेत म्हणाला—हे नाथ! वेदांमध्ये अशी नीती सांगितली आहे की,— ॥ ३ ॥

बड़े सनेह लघुन्ह पर करहीं। गिरि निज सिरनि सदा तृन धरहीं॥
जलधि अगाध मौलि बह फेनू। संतत धरनि धरत सिर रेनू॥

मोठे लोक लहानावर स्नेह करीतच असतात्. पर्वत आपल्या मस्कतावर सदा तृणाला (गवताला) धारण करतात. अगाध समुद्र स्वत:च्या मस्तकावर फेसाला धारण करतो आणि पृथ्वी आपल्या मस्तकावर सदा धुळीला धारण करते. ॥ ४ ॥

दो०— **अस कहि गहे नरेस पद स्वामी होहु कृपाल।**
मोहि लागि दुख सहिअ प्रभु सज्जन दीनदयाल॥ १६७॥

असे म्हणून राजाने मुनीचे चरण पकडले आणि म्हटले—हे स्वामी! कृपा करा. तुम्ही संत आहात, दीनदयाळू आहात. म्हणून हे प्रभो! माझ्यासाठी एवढे कष्ट (अवश्य) सहन करा. ॥ १६७ ॥

जानि नृपहि आपन आधीना। बोला तापस कपट प्रबीना॥
सत्य कहउँ भूपति सुनु तोही। जग नाहिन दुर्लभ कछु मोही॥

राजाला आपल्या अधीन जाणून कपटात प्रवीण असलेला तपस्वी म्हणाला—हे राजन्! ऐक, मी तुला सत्य सांगतो, मला जगतात काहीच दुर्लभ नाही. ॥ १ ॥

अवसि काज मैं करिहउँ तोरा। मन तन बचन भगत तैं मोरा॥
जोग जुगुति तप मंत्र प्रभाऊ। फलइ तबहिं जब करिअ दुराऊ॥

मी तुझे काम अवश्य करीन. (कारण) तू मन,वाणी आणि शरीराने (तिन्हीनी) माझा भक्त आहेस. परंतु योग, युक्ती, तप आणि मंत्र यांचा प्रभाव तेव्हाच फलद्रूप होतो जेव्हा ते गुप्त रीतीने केले जातात. ॥ २ ॥

जौं नरेस मैं करौं रसोई। तुम्ह परुसहु मोहि जान न कोई॥
अन्न सो जोइ जोइ भोजन करई। सोइ सोइ तव आयसु अनुसरई॥

हे नरपती! जर मी स्वत: स्वयंपाक केला व तू वाढण्याचे काम केले आणि मला त्यावेळी कोणीही ओळखले नाही तर त्या अन्नाचे जो जो सेवन करेल, तो तो तुझा आज्ञाकारी बनेल. ॥ ३ ॥

पुनि तिन्ह के गृह जेवँइ जोऊ। तव बस होइ भूप सुनु सोऊ॥
जाइ उपाय रचहु नृप एहू। संबत भरि संकलप करेहू॥

एवढेच नव्हे तर त्याच्या (भोजन करणाऱ्याच्या) घरीही जो कोणी भोजन करेल, हे राजन्! ऐक, तो सुद्धा तुझ्या अधीन होईल. हे राजन्! तू घरी जाऊन हाच उपाय कर आणि वर्षभराचा (भोजन घालण्याचा) संकल्प कर. ॥ ४ ॥

दो०— **नित नूतन द्विज सहस सत बरेहु सहित परिवार।**
मैं तुम्हरे संकलप लगि दिनहिं करबि जेवनार॥ १६८॥

नित्य नवीन एक लक्ष ब्राह्मणांना कुटुंबासहित निमंत्रित कर. मी तुझा संकल्प पूर्ण होईपर्यंत (अर्थात् एक वर्ष) दररोज स्वयंपाक तयार करून देईन. ॥ १६८ ॥

एहि बिधि भूप कष्ट अति थोरें। होइहहिं सकल बिप्र बस तोरें॥
करिहहिं बिप्र होम मख सेवा। तेहिं प्रसंग सहजेहिं बस देवा॥

हे राजन्! अशा प्रकारे फारच थोड्या परिश्रमाने सर्व ब्राह्मण तुला वश होतील. ब्राह्मण हवन, यज्ञ आणि सेवा-पूजा करतील, तर त्या प्रसंगाने (संबंधाने) देवता सुद्धा सहजच वश होतील. ॥ १ ॥

और एक तोहि कहउँ लखाऊ। मैं एहिं बेष न आउब काऊ॥
तुम्हरे उपरोहित कहुँ राया। हरि आनब मैं करि निज माया॥

मी अजून एक खूण तुला सांगून ठेवतो की, मी या रूपात तुझ्याकडे कधीही येणार नाही. हे राजन्! मी स्वत:च्या मायेने तुझ्या स्वयंपाक्यास हरण करून माझ्याकडे आणीन. ॥ २ ॥

तपबल तेहि करि आपु समाना। रखिहउँ इहाँ बरष परवाना॥
मैं धरि तासु बेषु सुनु राजा। सब बिधि तोर सँवारब काजा॥

तपाच्या बलाने त्याला माझ्यासारखे बनवून एक वर्षपर्यंत येथेच ठेवून घेईन आणि हे राजन्! ऐक, मी त्याचे रूप घेऊन तुझे सर्व प्रकाराने काम सिद्ध करून देईन. ॥ ३ ॥

गै निसि बहुत सयन अब कीजे। मोहि तोहि भूप भेंट दिन तीजे॥
मैं तपबल तोहि तुरग समेता। पहुँचैहउँ सोवतहि निकेता॥

हे राजन्! रात्र फार झाली आहे आता झोप. आजपासून तिसऱ्या दिवशी तुझी माझी भेट होईल. तपाच्या बलाने मी तुला झोपेतच घोड्यासह तुझ्या घरी पोहोच करतो. ॥ ४ ॥

दो०— **मैं आउब सोइ बेषु धरि पहिचानेहु तब मोहि।**
जब एकांत बोलाइ सब कथा सुनावौं तोहि॥ १६९॥

मी तोच (पुरोहिताचा) वेष धारण करून येईन. जेव्हा एकांतात तुला बोलावून सर्व कथा सांगेन तेव्हा तू मला ओळख. ॥ १६९ ॥

सयन कीन्ह नृप आयसु मानी। आसन जाइ बैठ छलग्यानी॥
श्रमित भूप निद्रा अति आई। सो किमि सोव सोच अधिकाई॥

राजाने आज्ञा मानून शयन केले. त्यानंतर तो कपट-ज्ञानी आसनावर बसला. राजा थकलेला होता. त्याला खूप गाढ झोप लागली. परंतु जो कपटी कसा झोपेल? त्याला तर फार चिंता लागली होती. ॥ १ ॥

कालकेतु निसिचर तहँ आवा। जेहिं सूकर होइ नृपहि भुलावा॥
परम मित्र तापस नृप केरा। जानइ सो अति कपट घनेरा॥

त्याचवेळी तेथे कालकेतू राक्षस आला ज्याने डुक्कर बनून राजाला भटकविले होते. तो तपस्वीचा (राजाचा) फार मित्र होता आणि तो पुष्कळ प्रकारच्या माया विद्या जाणत होता. ॥ २ ॥

तेहि के सत सुत अरु दस भाई। खल अति अजय देव दुखदाई॥
प्रथमहिं भूप समर सब मारे। बिप्र संत सुर देखि दुखारे॥

त्याला शंभर पुत्र आणि दहा बंधू होते. जे फारच दुष्ट,कोणाकडूनही न जिंकले जाणारे आणि देवतांना दुःख देणारे होते. ब्राह्मण, संत आणि देवता यांना दुःखी पाहून राजाने (प्रतापभानूने) त्या सर्वांना पूर्वीच युद्धामध्ये ठार केले होते. ॥ ३ ॥

तेहिं खल पाछिल बयरु सँभारा। तापस नृप मिलि मंत्र बिचारा॥
जेहिं रिपु छय सोइ रचेन्हि उपाऊ। भावी बस न जान कछु राऊ॥

त्या दुष्टाने (कालकेतूने) पूर्वीच्या वैराची आठवण ठेवून तपस्वी कपटीशी (राजाशी) संधी करून विचारपूर्वक षड्यंत्र रचले. शत्रूचा जेणेकरून नाश होईल असा उपाय त्यांनी ठरविला. भावीवश राजा (प्रतापभानू) काहीही समजू शकला नाही. ॥ ४ ॥

दो०— **रिपु तेजसी अकेल अपि लघु करि गनिअ न ताहु।**
अजहुँ देत दुख रबि ससिहि सिर अवसेषित राहु॥ १७०॥

तेजस्वी शत्रू एकटा जरी असला तरीही त्याला लहान समजू नये. ज्याचे केवळ मस्तकच शिल्लक राहिले होते, तो राहू आजपर्यंत सूर्य-चंद्राला दुःख देत आहे. ॥ १७० ॥

तापस नृप निज सखहि निहारी। हरषि मिलेउ उठि भयउ सुखारी॥
मित्रहि कहि सब कथा सुनाई। जातुधान बोला सुख पाई॥

तपस्वी राजा आपल्या मित्राला पाहून प्रसन्न होऊन त्याला भेटला आणि सुखी झाला. त्याने मित्राला सर्व कथा सांगितली,तेव्हा राक्षस आनंदाने म्हणाला— ॥ १ ॥

अब साधेउँ रिपु सुनहु नरेसा। जौं तुम्ह कीन्ह मोर उपदेसा॥
परिहरि सोच रहहु तुम्ह सोई। बिनु औषध बिआधि बिधि खोई॥

हे राजन्! ऐक, ज्याअर्थी तू माझ्या म्हणण्यानुसार एवढे काम केले आहे, त्या अर्थी आता मी शत्रूला आपल्या ताब्यात केलेच असे समज. तू आता चिंता न करता झोप. विधात्याने औषधाशिवायच रोग नाहीसा केला. ॥ २ ॥

कुल समेत रिपु मूल बहाई। चौथें दिवस मिलब मैं आई॥
तापस नृपहि बहुत परितोषी। चला महाकपटी अतिरोषी॥

शत्रूला कुळासहित जड-मुळासकट उखडून फेकून देऊन आजपासून चौथ्या दिवशी तुला येऊन भेटेन. (अशा प्रकारे) तपस्वी राजाला खूप दिलासा देऊन तो महामायावी आणि अत्यंत क्रोधी राक्षस तेथून निघाला. ॥ ३ ॥

भानुप्रतापहि बाजि समेता। पहुँचाएसि छन माझ निकेता॥
नृपहि नारि पहिं सयन कराई। हय गृहँ बाँधेसि बाजि बनाई॥

त्याने प्रतापभानू राजाला घोड्यासह क्षणभरात घरी पोहोचविले. राजाला राणीजवळ झोपवून घोड्याला अश्वशाळेत चांगल्या रीतीने बांधले. ॥ ४ ॥

दो०— **राजा के उपरोहितहि हरि लै गयउ बहोरि।**
लै राखेसि गिरि खोह महुँ मायाँ करि मति भोरि॥ १७१॥

नंतर त्याने राजाच्या आचाऱ्यास उचलून नेले आणि मायेने त्याच्या बुद्धीला भ्रमित करून त्याला एका पर्वताच्या गुहेत आणून ठेवले. ॥ १७१ ॥

आपु बिरचि उपरोहित रूपा। परेउ जाइ तेहि सेज अनूपा॥
जागेउ नृप अनभएँ बिहाना। देखि भवन अति अचरजु माना॥

त्याने स्वत: स्वयंपाक्याचे रूप धारण करून त्याच्या सुंदर शय्येवर शयन केले. सकाळ होण्यापूर्वीच राजा जागा झाला तेव्हा आपल्याच घरी असलेले पाहून फारच आश्चर्य वाटले. ॥ १ ॥

मुनि महिमा मन महुँ अनुमानी। उठेउ गवँहिं जेहिं जान न रानी॥
कानन गयउ बाजि चढ़ि तेहीं। पुर नर नारि न जानेउ केहीं॥

तो आपल्या मनात मुनीच्या माहात्म्याचे अनुमान करून राणीला जाणीव न होऊ देता हळूच अंथरुणावरुन उठला. त्याच घोड्यावर बसून अरण्यात गेला. नगरातल्या कोण्याही स्त्री-पुरुषाला हे कळले नाही. ॥ २ ॥

गएँ जाम जुग भूपति आवा। घर घर उत्सव बाज बधावा॥
उपरोहितहि देख जब राजा। चकित बिलोक सुमिरि सोइ काजा॥

दोन प्रहर उलटल्यावर राजा घरी परतला. घरोघरी उत्सव होऊ लागले आणि वाद्ये वाजू लागली. जेव्हा राजाने स्वयंपाक्याला पाहिले तेव्हा तो त्याच (आपल्या) कार्याचे स्मरण करून आश्चर्याने पाहू लागला. ॥ ३ ॥

जुग सम नृपहि गए दिन तीनी। कपटी मुनि पद रह मति लीनी॥
समय जानि उपरोहित आवा। नृपहि मते सब कहि समुझावा॥

राजाला तीन दिवस युगासारखे वाटले. त्याची बुद्धी कपटी मुनीच्या चरणांकडे लागली. निश्चित समय ओळखून स्वयंपाकी (बनलेला राक्षस) राजाकडे आला आणि राजाशी केलेल्या गुप्त सल्ल्यानुसार त्याने (आपले) सर्व विचार राजाला समजावून सांगितले. ॥ ४ ॥

दो०— **नृप हरषेउ पहिचानि गुरु भ्रम बस रहा न चेत।**
बरे तुरत सत सहस बर बिप्र कुटुंब समेत॥ १७२॥

(संकेतानुसार) गुरूला (त्यारूपात) ओळखून राजा प्रसन्न झाला. भ्रमामुळे त्याला भान राहिले नाही (की, हा तापस मुनी आहे की कालकेतू राक्षस) त्याने तात्काळ एक लक्ष उत्तम ब्राह्मणांना कुटुंबासह भोजनाचे निमंत्रण दिले. ॥ १७२ ॥

उपरोहित जेवनार बनाई। छरस चारि बिधि जसि श्रुति गाई॥
मायामय तेहिं कीन्हि रसोई। बिंजन बहु गनि सकइ न कोई॥

आचाऱ्याने षड्रससंपन्न आणि चार प्रकारचे भोजन, जसे वेदामध्ये वर्णन केले आहे तयार केले. त्याने मायामय स्वयंपाक बनविला आणि इतक्या भाज्या बनविल्या की, ज्याची गणनाच करता येणे शक्य नाही. ॥ १ ॥

बिबिध मृगन्ह कर आमिष राँधा। तेहि महुँ बिप्र माँसु खल साँधा॥
भोजन कहुँ सब बिप्र बोलाए। पद पखारि सादर बैठाए॥

अनेक प्रकारच्या पशूंचे मांस शिजविले आणि त्यात त्या दुष्टाने ब्राह्मणाचे मांस मिसळले. सर्व ब्राह्मणांना भोजनासाठी बोलाविले गेले आणि त्यांचे पाय धुवून त्यांना आदराने आसनावर बसविले. ॥ २ ॥

परुसन जबहिं लाग महिपाला। भै अकासबानी तेहि काला॥
बिप्रबृंद उठि उठि गृह जाहू। है बड़ि हानि अन्न जनि खाहू॥

राजाने अन्न वाढण्यास सुरू करताच (कालकेतुकृत) आकाशवाणी झाली—हे ब्राह्मणांनो! हे अन्न खाऊ नका, उठून आपापल्या घरी जा. हे अन्न खाण्याने फार मोठी हानी आहे. ॥ ३ ॥

भयउ रसोईं भूसुर माँसू। सब द्विज उठे मानि बिस्वासू॥
भूप बिकल मति मोहँ भुलानी। भावी बस न आव मुख बानी॥

स्वयंपाकात ब्राह्मणांचे मांस घातलेले आहे. (आकाशवाणीवर) विश्वास ठेवून सर्व ब्राह्मण उठून उभे राहिले. राजा व्याकूळ झाला. (परंतु) त्याची बुद्धी मोहाने भ्रमित झाली होती. अवश्यंभावीमुळे त्याच्या तोंडातून एक शब्दही निघाला नाही. ॥ ४ ॥

दो०— **बोले बिप्र सकोप तब नहिं कछु कीन्ह बिचार।**
जाइ निसाचर होहु नृप मूढ़ सहित परिवार॥ १७३॥

तेव्हा ब्राह्मणांनी काहीही विचार न करता क्रोधाने राजाला शाप दिला— अरे मूर्ख राजा! तू तुझ्या परिवारासह राक्षस हो. ॥ १७३ ॥

छत्रबंधु तैं बिप्र बोलाई। घालै लिए सहित समुदाई॥
ईस्वर राखा धरम हमारा। जैहसि तैं समेत परिवारा॥

हे नीच क्षत्रिया! तू तर परिवारासह ब्राह्मणांना बोलावून नष्ट करू पाहत होतास. ईश्वराने आमच्या धर्माचे रक्षण केले. आता तू परिवारासह नष्ट होशील. ॥ १ ॥

संबत मध्य नास तव होऊ। जलदाता न रहिहि कुल कोऊ॥
नृप सुनि श्राप बिकल अति त्रासा। भै बहोरि बर गिरा अकासा॥

एक वर्षाच्या आत तुझा नाश होईल. तुझ्या कुळात कोणी पाणी पाजणारा सुद्धा राहणार नाही. शाप ऐकून राजा भीतीने व्याकूळ झाला. नंतर सुंदर आकाशवाणी झाली— ॥ २ ॥

बिप्रहु श्राप बिचारि न दीन्हा। नहिं अपराध भूप कछु कीन्हा॥
चकित बिप्र सब सुनि नभबानी। भूप गयउ जहँ भोजन खानी॥

हे ब्राह्मणांनो! तुम्ही विचार करून शाप दिला नाही. राजाने काहीही अपराध केलेला नाही. आकाशवाणी ऐकून सर्व ब्राह्मण चकित झाले. तेव्हा राजा स्वयंपाक घरात गेला. ॥ ३ ॥

तहँ न असन नहिं बिप्र सुआरा। फिरेउ राउ मन सोच अपारा॥
सब प्रसंग महिसुरन्ह सुनाई। त्रसित परेउ अवनीं अकुलाई॥

(पाहिले तर) तेथे स्वयंपाकही नव्हता आणि स्वयंपाकी ब्राह्मणही नव्हता. तेव्हा राजा मनात अपार चिंता करीत परतला. त्याने ब्राह्मणांना सर्व वृत्तांत सांगितला आणि (फारच) भयभीत आणि व्याकूळ होऊन तो भूमीवर पडला. ॥ ४ ॥

दो०— **भूपति भावी मिटइ नहिं जदपि न दूषन तोर।**
किएँ अन्यथा होइ नहिं बिप्रश्राप अति घोर॥ १७४॥

हे राजन्! जरी तुझा काहीही दोष नाही तरीही होणारी गोष्ट चुकत नाही. ब्राह्मणांचा शाप फारच भयानक असतो. तो कोण्याही प्रकारे टाळला जाऊ शकत नाही. ॥ १७४ ॥

अस कहि सब महिदेव सिधाए। समाचार पुरलोगन्ह पाए॥
सोचहिं दूषन दैवहि देहीं। बिरचत हंस काग किय जेहीं॥

असे म्हणून सर्व ब्राह्मण आपापल्या घरी परतले. नगरवासी लोकांनी हा समाचार जेव्हा ऐकला तेव्हा ते चिंता करून विधात्याला दोष देऊ लागले, ज्याने राजाला हंस बनविण्याऐवजी कावळा बनवले. (अशा पुण्यात्मा राजाला देवता बनवायला पाहिजे होते परंतु त्याला राक्षस बनविले.) ॥ १ ॥

उपरोहितहि भवन पहुँचाई। असुर तापसहि खबरि जनाई॥
तेहिं खल जहँ तहँ पत्र पठाए। सजि सजि सेन भूप सब धाए॥

असुराने (कालकेतू) आचाऱ्याला त्याच्या घरी पोहोच करून कपटी तपस्व्याला सर्व बातमी कळविली. त्या दुष्टाने चहूकडे समाचार कळविला. त्यामुळे सर्व (वैरी) राजे आपआपली सेना घेऊन युद्ध करण्यासाठी आले. ॥ २ ॥

घेरेन्हि नगर निसान बजाई। बिबिध भाँति नित होइ लराई॥
जूझे सकल सुभट करि करनी। बंधु समेत परेउ नृप धरनी॥

आणि त्यांनी डंका वाजवून नगराला वेढा घातला. रोज अनेक प्रकारच्या लढाया सुरू झाल्या. (प्रतापभानूचे) सर्व योद्धे (शूरवीरांसारखे) लढाई करून रणांगणात झुंझ देत मेले. राजासुद्धा बंधूसह रणात मारला गेला. ॥ ३ ॥

सत्यकेतु कुल कोउ नहिं बाँचा। बिप्रश्राप किमि होइ असाँचा॥
रिपु जिति सब नृप नगर बसाई। निज पुर गवने जय जसु पाई॥

सत्यकेतूच्या कुलात कोणीही वाचला नाही. ब्राह्मणांचा शाप खोटा कसा होईल? शत्रूला जिंकून नगराचे पुनर्वसन करून सर्व राजे विजय आणि यश मिळवून आपापल्या नगरात गेले. ॥ ४ ॥

दो०— **भरद्वाज सुनु जाहि जब होइ बिधाता बाम।**
धूरि मेरुसम जनक जम ताहि ब्यालसम दाम॥ १७५॥

(याज्ञवल्क्य म्हणतात-) हे भरद्वाज! ऐका, विधाता जेव्हा ज्याला प्रतिकूल होतो तेव्हा त्याला धूळ सुमेरू पर्वतासारखी (वजनदार आणि चिरडून टाकणारी), पिता यमासारखे (काळरूप) आणि दोरी सर्पासारखी (चावणारी) होते. ॥ १७५ ॥

काल पाइ मुनि सुनु सोइ राजा। भयउ निसाचर सहित समाजा॥
दस सिर ताहि बीस भुजदंडा। रावन नाम बीर बरिबंडा॥

हे मुनी! ऐका, काही काळ लोटल्यावर तोच राजा परिवारासह रावण नावाचा राक्षस झाला. त्याला दहा मस्तके आणि वीस बाहू होते आणि तो फारच शूरवीर होता. ॥ १ ॥

भूप अनुज अरिमर्दन नामा। भयउ सो कुंभकरन बलधामा॥
सचिव जो रहा धरमरुचि जासू। भयउ बिमात्र बंधु लघु तासू॥

अरिमर्दन जो राजाचा धाकटा भाऊ होता, तो बलवान कुंभकर्ण झाला. त्याचा जो मंत्री होता ज्याचे नाव धर्मरुची होते तो रावणाचा सावत्र लहान भाऊ झाला. ॥ २ ॥

नाम बिभीषन जेहि जग जाना। बिष्नुभगत बिग्यान निधाना॥
रहे जे सुत सेवक नृप केरे। भए निसाचर घोर घनेरे॥

त्याचे नाव बिभीषण होते, ज्याला सर्व जग जाणते. तो विष्णुभक्त आणि ज्ञान-विज्ञानाचे भांडार होता. जे राजाचे पुत्र आणि सेवक होते ते सर्व मोठे भयानक राक्षस झाले. ॥ ३ ॥

कामरूप खल जिनस अनेका। कुटिल भयंकर बिगत बिबेका॥
कृपा रहित हिंसक सब पापी। बरनि न जाहिं बिस्व परितापी॥

ते सर्व अनेक जातीचे मनोवांच्छित रूप धारण करणारे दुष्ट, कुटिल, भयंकर, विवेकरहित, निर्दयी, हिंसक, पापी आणि सर्व संसाराला दु:ख देणारे झाले. त्याचे वर्णन होऊ शकत नाही. ॥ ४ ॥

दो०— **उपजे जदपि पुलस्त्यकुल पावन अमल अनूप।**
तदपि महीसुर श्राप बस भए सकल अघरूप॥ १७६॥

जरी ते पुलस्त्य ऋषिंच्या पवित्र, निर्मळ आणि अनुपम कुलात जन्मले, तरी पण ब्राह्मणाच्या शापामुळे ते सर्व पापरूप झाले. ॥ १७६ ॥

कीन्ह बिबिध तप तीनिहुँ भाई। परम उग्र नहिं बरनि सो जाई॥
गयउ निकट तप देखि बिधाता। मागहु बर प्रसन्न मैं ताता॥

तिन्ही भावंडांनी अशी अनेक प्रकारची मोठी कठीण तपश्चर्या केली ज्याचे वर्णन होऊ शकत नाही. त्यांचे उग्र तप पाहून ब्रह्मदेव त्यांच्याजवळ गेले आणि म्हणाले—हे तात! मी प्रसन्न आहे, वर मागा. ॥ १ ॥

करि बिनती पद गहि दससीसा। बोलेउ बचन सुनहु जगदीसा॥
हम काहू के मरहिं न मारें। बानर मनुज जाति दुइ बारें॥

रावणाने अत्यंत विनम्रतेने त्यांचे चरण पकडून म्हटले—हे जगदीश्वर! ऐका, वानर आणि मानव या दोन जाती वगळून इतर कोणीही आम्हाला मारले तरी मरण येऊ नये. (हा वर द्यावा.) ॥ २ ॥

एवमस्तु तुम्ह बड़ तप कीन्हा। मैं ब्रह्माँ मिलि तेहि बर दीन्हा॥
पुनि प्रभु कुंभकरन पहिं गयऊ। तेहि बिलोकि मन बिसमय भयऊ॥

(शिवजी म्हणतात की,) तुम्ही फार तप केले आहे म्हणून मी आणि ब्रह्मदेवांनी मिळून "असेच होवो" असा वर दिला. नंतर ब्रह्मदेव कुंभकर्णाकडे गेले. त्याला पाहून त्यांच्या मनाला फार आश्चर्य वाटले. ॥ ३ ॥

जौं एहिं खल नित करब अहारू। होइहि सब उजारि संसारू॥
सारद प्रेरि तासु मति फेरी। मागेसि नीद मास षट केरी॥

ह्या दुष्टाने जर दररोज आहार केला तर सर्व संसार उजाड होऊन जाईल. (असा विचार करून) ब्रह्मदेवाने सरस्वतीला प्रेरणा करून त्याची बुद्धी फिरविली. त्यामुळे त्याने सहा महिन्याची झोप मागितली. ॥ ४ ॥

दो०— **गए बिभीषन पास पुनि कहेउ पुत्र बर मागु।**
तेहिं मागेउ भगवंत पद कमल अमल अनुरागु॥ १७७॥

नंतर ब्रह्मदेव बिभीषणाजवळ गेले आणि म्हणाले—हे पुत्र! वर माग. त्याने भगवंताच्या चरणकमली निर्मळ (निष्काम आणि अनन्य) प्रेम मागितले. ॥ १७७ ॥

तिन्हहि देइ बर ब्रह्म सिधाए। हरषित ते अपने गृह आए॥
मय तनुजा मंदोदरि नामा। परम सुंदरी नारि ललामा॥

त्यांना वर देऊन ब्रह्मदेव निघून गेले आणि ते (तिघे बंधू) हर्षित होऊन घरी परतले. मय दानवाची परम सुंदरी आणि स्त्रीयात शिरोमणी असलेली मंदोदरी नावाची कन्या होती. ॥ १ ॥

सोइ मयँ दीन्हि रावनहि आनी। होइहि जातुधानपति जानी॥
हरषित भयउ नारि भलि पाई। पुनि दोउ बंधु बिआहेसि जाई॥

मय दानवाने त्या कन्येचा रावणाशी विवाह करून दिला. त्याने जाणले की हा राक्षसांचा राजा होईल. उत्तम पत्नी मिळाल्याने रावण प्रसन्न झाला आणि त्याने आपल्या दोन्ही भावांचा विवाह केला. ॥ २ ॥

गिरि त्रिकूट एक सिंधु मझारी। बिधि निर्मित दुर्गम अति भारी॥
सोइ मय दानवँ बहुरि सँवारा। कनक रचित मनिभवन अपारा॥

समुद्राच्या मध्यभागी त्रिकूट नावाच्या पर्वतावर ब्रह्मदेवाने निर्माण केलेला एक फार मोठा किल्ला होता. (महान मायावी आणि निपुण कारागीर) मय दानवाने त्याला परत सजविले. त्यात रत्नांनी जडलेले अगणित महाल होते. ॥ ३ ॥

भोगावति जसि अहिकुल बासा। अमरावति जसि सक्रनिवासा॥
तिन्ह तें अधिक रम्य अति बंका। जग बिख्यात नाम तेहि लंका॥

जशी नागकुलाच्या राहण्याची (पाताळ लोकात) भोगावती पुरी आहे आणि इंद्राला राहण्यासाठी (स्वर्गलोकात) अमरावतीपुरी आहे. त्याहीपेक्षा अधिक सुंदर आणि चांगला हा किल्ला होता. जगतात त्याचे लंका नाव प्रसिद्ध झाले. ॥ ४ ॥

दो०— **खाईं सिंधु गभीर अति चारिहुँ दिसि फिरि आव।**
कनक कोट मनि खचित दृढ़ बरनि न जाइ बनाव॥ १७८ (क)॥

त्याच्या चारी बाजूला समुद्राच्या अत्यंत खोल अशा खंदकाने घेरलेले आहे. ज्याच्या कारागिरीचे वर्णन केले जाऊ शकत नाही असा सोन्याचा रत्नांनी मढविलेला मजबूत परकोटा आहे ॥ १७८ ॥ क

हरि प्रेरित जेहिं कलप जोइ जातुधानपति होइ।
सूर प्रतापी अतुलबल दल समेत बस सोइ॥१७८(ख)॥

भगवंताच्या प्रेरणेने ज्या कल्पात जो राक्षसांचा राजा (रावण) होतो तोच शूर, प्रतापी, अतुलित बलवान, स्वत:च्या सेनेसह त्या पुरीत वास्तव्य करतो. ॥ १७८ ॥ ख

रहे तहाँ निसिचर भट भारे। ते सब सुरन्ह समर संघारे॥
अब तहँ रहहिं सक्र के प्रेरे। रच्छक कोटि जच्छपति केरे॥

(पूर्वी) तेथे मोठ मोठे राक्षस योद्धे राहत होते. देवतांनी त्या सर्वांना युद्धात मारले. आता इंद्राच्या प्रेरणेने तेथे कुबेराचे एक कोटी रक्षक (यक्ष लोक) राहतात. ॥ १ ॥

दसमुख कतहुँ खबरि असि पाई। सेन साजि गढ़ घेरेसि जाई॥
देखि बिकट भट बड़ि कटकाई। जच्छ जीव लै गए पराई॥

अशी रावणाला कुठे तरी खबर लागली तेव्हा त्याने सेना सज्ज करून किल्ल्याला घेरले. त्या क्रूर योद्ध्याला आणि त्याच्या विशाल सैन्याला पाहून यक्ष जीव घेऊन पळाले. ॥ २ ॥

फिरि सब नगर दसानन देखा। गयउ सोच सुख भयउ बिसेषा॥
सुंदर सहज अगम अनुमानी। कीन्हि तहाँ रावन रजधानी॥

मग रावणाने चहूकडे फिरून संपूर्ण नगर पाहिले. त्याची (स्थानासंबंधी) चिंता समाप्त झाली आणि त्याला फारच सुख झाले. ती पुरी स्वाभाविकच सुंदर आणि (शत्रूसाठी) दुर्गम आहे असे अनुमान करून रावणाने तेथे आपली राजधानी निश्चित केली. ॥ ३ ॥

जेहि जस जोग बाँटि गृह दीन्हे। सुखी सकल रजनीचर कीन्हे॥
एक बार कुबेर पर धावा। पुष्पक जान जीति लै आवा॥

योग्यतेनुसार घरांची वाटणी करून रावणाने सर्व राक्षसांना सुखी केले. एकदा त्याने कुबेरावर चढाई केली आणि त्याने कुबेराचे पुष्पक विमान जिंकून आणले. ॥ ४ ॥

दो०— **कौतुकहीं कैलास पुनि लीन्हेसि जाइ उठाइ।**
मनहुँ तौलि निज बाहुबल चला बहुत सुख पाइ॥ १७९॥

त्याने नंतर एकदा खेळता खेळता कैलास पर्वताला उचलले आणि जणूकाय आपल्या बाहूंचे बळ तोलून, मोठ्या सुखाचा अनुभव करून तो तेथून निघून गेला. ॥ १७९ ॥

सुख संपति सुत सेन सहाई। जय प्रताप बल बुद्धि बड़ाई॥
नित नूतन सब बाढ़त जाई। जिमि प्रतिलाभ लोभ अधिकाई॥

जसे प्रत्येक लाभाने लोभ वाढत जातो तसेच त्याचे नित्य नवे सुख, संपत्ती,पुत्र, सेना, सहायक, जय, प्रताप, बल, बुद्धी आणि मोठेपणा हे सर्व नित्य वाढत होते. ॥ १ ॥

अतिबल कुंभकरन अस भ्राता। जेहि कहुँ नहिं प्रतिभट जग जाता॥
करइ पान सोवइ षट मासा। जागत होइ तिहूँ पुर त्रासा॥

अत्यंत बलवान कुंभकर्ण, ज्याच्या जोडीचा योद्धा जगतात पैदाच झाला नाही तो त्याचा बंधू होता. तो मदिरा पिऊन सहा महिने झोपत होता. तो जागा होताच तिन्ही लोकात खळबळ माजत होती. ॥ २ ॥

जौं दिन प्रति अहार कर सोई। बिस्व बेगि सब चौपट होई॥
समर धीर नहिं जाइ बखाना। तेहि सम अमित बीर बलवाना॥

जर त्याने दररोज भोजन केले असते, तर मग संपूर्ण विश्व लवकरच समाप्त झाले असते. तो रणधीर असा होता की, ज्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही. (लंकेत) त्याच्यासारखे असंख्य बलवान वीर होते. ॥ ३ ॥

बारिदनाद जेठ सुत तासू। भट महुँ प्रथम लीक जग जासू॥
जेहि न होइ रन सनमुख कोई। सुरपुर नितहिं परावन होई॥

मेघनाद रावणाचा वडील मुलगा होता, ज्याचा जगताच्या योद्ध्यांमध्ये पहिला नंबर होता. युद्धात त्याचा कोणीही सामना करू शकत नव्हते. स्वर्गात तर (त्याच्या भयाने) भीतीग्रस्त वातावरण राहत होते. ॥ ४ ॥

दो०— **कुमुख अकंपन कुलिसरद धूमकेतु अतिकाय।**
एक एक जग जीति सक ऐसे सुभट निकाय॥ १८०॥

(यांच्या व्यतिरिक्त) दुर्मुख, अकंपन, वज्रदन्त, धूमकेतू आणि अतिकाय इत्यादी असे अनेक योद्धे होते ते एकटेच संपूर्ण संसाराला जिंकू शकत होते. ॥ १८० ॥

कामरूप जानहिं सब माया। सपनेहुँ जिन्ह कें धरम न दाया॥
दसमुख बैठ सभाँ एक बारा। देखि अमित आपन परिवारा॥

सर्व राक्षस मनोवांच्छित रूप धारण करू शकत होते आणि (असुरी) माया जाणत होते. त्यांच्या ठिकाणी दया धर्म स्वप्नातही नव्हता. एकदा रावणाने सभेत बसले असताना आपल्या अगणित परिवाराला पाहिले. ॥ १ ॥

सुत समूह जन परिजन नाती। गनै को पार निसाचर जाती॥
सेन बिलोकि सहज अभिमानी। बोला बचन क्रोध मद सानी॥

पुत्र-पौत्र, कुटुंबी आणि सेवक भरपूर होते. (सर्व) राक्षसांच्या जातींना तर कोण मोजू शकत होते? आपल्या सेनेला पाहून स्वभावत:च अभिमानी असलेला रावण क्रोध आणि गर्वभरित वाणीने म्हणाला— ॥ २ ॥

सुनहु सकल रजनीचर जूथा। हमरे बैरी बिबुध बरूथा॥
ते सनमुख नहिं करहिं लराई। देखि सबल रिपु जाहिं पराई॥

हे समस्त राक्षसांच्या दलांनो! ऐका, देवतागण आपले शत्रू आहेत. ते समोरासमोर येऊन युद्ध करीत नाहीत. बलवान शत्रूला पाहून पळून जातात. ॥ ३ ॥

तेन्ह कर मरन एक बिधि होई। कहउँ बुझाइ सुनहु अब सोई॥
द्विजभोजन मख होम सराधा। सब कै जाइ करहु तुम्ह बाधा॥

त्यांचे मरण एकाच उपायाने होऊ शकते, मी तुम्हाला समजावून सांगतो. ते आता ऐका. (त्यांच्या बलाला वाढविणारे) ब्राह्मण भोजन, यज्ञ, हवन आणि श्राद्ध— या सर्वांमध्ये तुम्ही तेथे जाऊन बाधा आणावी. ॥ ४ ॥

दो०— **छुधा छीन बलहीन सुर सहजेहिं मिलिहहिं आइ।**
तब मारिहउँ कि छाड़िहउँ भली भाँति अपनाइ॥ १८१॥

मग भुकेने दुर्बल आणि बलहीन होऊन देवता सहजच आपल्याला येऊन मिळतील. तेव्हा मी त्यांना मारीन अथवा चांगल्या प्रकाराने आपल्या अधिन करून (सर्वथा पराधीन करून) सोडून देईन. ॥ १८१ ॥

मेघनाद कहुँ पुनि हँकरावा। दीन्हीं सिख बलु बयरु बढ़ावा॥
जे सुर समर धीर बलवाना। जिन्ह कें लरिबे कर अभिमाना॥

मग त्याने मेघनादाला बोलाविले आणि त्याला राजनीतीचा उपदेश करून त्याच्या बलाला आणि (देवतां विषयीच्या) वैरभावाला उत्तेजन दिले. (नंतर म्हणाला—) हे पुत्रा! ज्या देवता रणात धैर्य धारण करणाऱ्या आणि बलवान आहेत आणि ज्यांना युद्ध करण्याचा अभिमान आहे. ॥ १ ॥

तिन्हहि जीति रन आनेसु बाँधी। उठि सुत पितु अनुसासन काँधी॥
एहि बिधि सबही अग्या दीन्ही। आपुनु चलेउ गदा कर लीन्ही॥

त्यांना युद्धात जिंकून बांधून आण. पुत्राने पित्याची आज्ञा शिरोधार्य केली. अशाप्रकारे त्याने सर्वांना आज्ञा दिली आणि स्वत:ही हातामध्ये गदा घेऊन निघाला. ॥ २ ॥

चलत दसानन डोलति अवनी। गर्जत गर्भ स्रवहिं सुर रवनी॥
रावन आवत सुनेउ सकोहा। देवन्ह तके मेरु गिरि खोहा॥

रावण चालू लागला तर पृथ्वी डगमगू लागली आणि त्याच्या गर्जनेने देवातांच्या पत्नींचे गर्भ गळू लागले. रावणाला क्रोधाने येत असलेला ऐकून देवतांनी सुमेरू पर्वताच्या गुहा गाठल्या. (पळून जाऊन सुमेरूच्या गुहेचा आश्रय घेतला.) ॥ ३ ॥

दिगपालन्ह के लोक सुहाए। सूने सकल दसानन पाए॥
पुनि पुनि सिंघनाद करि भारी। देइ देवतन्ह गारि पचारी॥

दिक्पालांच्या सर्व सुंदर लोकांना रावणाने ओसाड पाहिले. तो वारंवार भयंकर सिंहगर्जना करून देवतांना ललकारून ललकारून शिव्या देत होता. ॥ ४ ॥

रन मद मत्त फिरइ जग धावा। प्रतिभट खोजत कतहुँ न पावा॥
रबि ससि पवन बरुन धनधारी। अगिनि काल जम सब अधिकारी॥

युद्धाच्या मस्तीत मतवाला होऊन तो आपल्या बरोबरीचा योद्धा शोधत जगतात धावत होता, परंतु असा योद्धा त्याला कुठेही मिळाला नाही. सूर्य, चंद्र, वायू, वरुण, कुबेर, अग्नि काळ आणि यम इत्यादी सर्व अधिकारी, ॥ ५ ॥

किंनर सिद्ध मनुज सुर नागा। हठि सबही के पंथहिं लागा॥
ब्रह्मसृष्टि जहँ लगि तनुधारी। दसमुख बसबर्ती नर नारी॥

किन्नर, सिद्ध, मनुष्य, देवता आणि नाग सर्वांच्या जबरदस्ती मागे लागला. (कोणालाही त्याने शांत बसू दिले नाही.) ब्रह्मदेवाच्या सृष्टीत जे काही शरीरधारी स्त्री-पुरुष होते, सर्वच रावणाच्या अधिन झाले. ॥ ६ ॥

आयसु करहिं सकल भयभीता। नवहिं आइ नित चरन बिनीता॥

भीतीने सर्वच त्याची आज्ञा पालन करीत होते आणि दररोज त्याचेकडे येऊन नम्रतेने त्याच्या चरणावर नतमस्तक होत होते. ॥ ७ ॥

दो०— **भुजबल बिस्व बस्य करि राखेसि कोउ न सुतंत्र।**
मंडलीक मनि रावन राज करइ निज मंत्र॥ १८२ (क)॥

त्याने बाहुबलाने संपूर्ण विश्वाला वश केले होते. कोणालाही स्वतंत्रतेने राहू दिले नाही. अशा प्रकारे मांडलिक राजांचा शिरोमणी (सार्वभौम सम्राट) रावण स्वत:च्या इच्छेनुसार राज्य करू लागला. ॥ १८२ ॥ क

देव जच्छ गंधर्ब नर किंनर नाग कुमारि।
जीति बरीं निज बाहु बल बहु सुंदर बर नारि॥ १८२ (ख)॥

देवता, गंधर्व, यक्ष, मानव,किन्नर आणि नागांच्या कन्यांशी तसेच अन्य पुष्कळशा सुंदर आणि उत्तम स्त्रीयांना त्याने आपल्या बाहुबलाने जिंकून त्यांच्याशी विवाह केला होता. ॥ १८२ ॥ ख

इंद्रजीत सन जो कछु कहेऊ। सो सब जनु पहिलेहिं करि रहेऊ॥
प्रथमहिं जिन्ह कहुँ आयसु दीन्हा। तिन्ह कर चरित सुनहु जो कीन्हा॥

मेघनादाशी त्याने जे काही म्हटले ते त्याने (मेघनादाने) जणू पूर्वीच अमलात आणले होते (अर्थात् रावणाने सांगायचाच उशीर की, तो तात्काळ आज्ञा पाळत असे. रावणाने त्याला (मेघनादाला) पूर्वीच ज्या आज्ञा दिल्या होत्या त्याप्रमाणे त्याने केलेली कर्तबगारी आता ऐका. ॥ १ ॥

देखत भीमरूप सब पापी। निसिचर निकर देव परितापी॥
करहिं उपद्रव असुर निकाया। नाना रूप धरहिं करि माया॥

सर्व राक्षसांचे समूह दिसायला फारच भयानक, पापी आणि देवतांना दुःख देणारे होते. ते असुरांचे समूह उपद्रव करीत होते आणि मायेने अनेक प्रकारची रूपे धारण करीत होते. ॥ २ ॥

जेहि बिधि होइ धर्म निर्मूला। सो सब करहिं बेद प्रतिकूला॥
जेहिं जेहिं देस धेनु द्विज पावहिं। नगर गाउँ पुर आगि लगावहिं॥

ज्या रीतिने धर्माचे मूळ उखडले जाईल असेच सर्व वेद विरुद्ध वर्तन ते करीत होते. ज्या ज्या ठिकाणी गाय आणि ब्राह्मण त्यांना दिसत होते, त्या त्या नगराला, गावाला, गल्लीला आग लावून देत होते. ॥ ३ ॥

सुभ आचरन कतहुँ नहिं होई। देव बिप्र गुरु मान न कोई॥
नहिं हरिभगति जग्य तप ग्याना। सपनेहुँ सुनिअ न बेद पुराना॥

(त्यांच्या भीतीने) कोठेही शुभ आचरण (ब्राह्मण भोजन, यज्ञ, श्राद्ध इत्यादी) होत नव्हते. देवता, ब्राह्मण आणि गुरू ह्यांना कोणीही मानत नव्हते. हरिभक्ती आणि यज्ञ, तप, ज्ञान हेही नव्हते. वेद आणि पुराण तर स्वप्नातही ऐकायला मिळत नव्हते. ॥ ४ ॥

छं०— **जप जोग बिरागा तप मख भागा श्रवन सुनइ दससीसा।**
आपुनु उठि धावइ रहै न पावइ धरि सब घालइ खीसा॥
अस भ्रष्ट अचारा भा संसारा धर्म सुनिअ नहिं काना।
तेहि बहुबिधि त्रासइ देस निकासइ जो कह बेद पुराना॥

जप, योग, वैराग्य, तप तसेच यज्ञात (देवतांचे) भाग प्राप्त करण्याचा समाचार मिळताच रावण तात्काळ स्वतःतिकडे धावत होता. तिथे काहीही राहू देत नव्हता. तो सर्वांना पकडून यज्ञाचा विध्वंस करीत होता. संसारात चहूकडे असे भ्रष्ट आचरण पसरले की, धर्म तर कानाने ऐकायलाही मिळत नव्हता. जो कोणी वेद आणि पुराण सांगत होता त्याला रावण अनेक प्रकाराने त्रास देत होता आणि देशातून हाकलून देत होता.

सो०— **बरनि न जाइ अनीति घोर निसाचर जो करहिं।**
हिंसा पर अति प्रीति तिन्ह के पापहि कवनि मिति॥ १८३॥

राक्षसलोक जे घोर अत्याचार करीत होते त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. हिंसेवरच ज्यांचे प्रेम आहे त्यांच्या पापाला काय मर्यादा? ॥ १८३ ॥

मासपारायण, सहावा विश्राम

बाढ़े खल बहु चोर जुआरा। जे लंपट परधन परदारा॥
मानहिं मातु पिता नहिं देवा। साधुन्ह सन करवावहिं सेवा॥

परस्त्री आणि परधन यातच रत असलेले दुष्ट, चोर आणि जुगारी त्यावेळी फारच वाढले. लोक माता-पिता आणि देवतांना मानत नव्हते. साधूं (ची सेवा करणे तर दूर राहिले उलट त्यांच्या) कडून सेवा घेत होते. ॥ १ ॥

जिन्ह के यह आचरन भवानी। ते जानेहु निसिचर सब प्रानी॥
अतिसय देखि धर्म कै ग्लानी। परम सभीत धरा अकुलानी॥

(श्री शंकरजी म्हणतात की,—) हे पार्वती! ज्यांचे असे आचरण आहेत, त्या सर्व प्राण्यांना राक्षसच समजावे. अशा प्रकारे धर्माविषयी (लोकांची) अत्यंत ग्लानी (अरुची-अनास्था) पाहून पृथ्वी अत्यंत भयभीत आणि व्याकूळ झाली. ॥ २ ॥

गिरि सरि सिंधु भार नहिं मोही। जस मोहि गरुअ एक परद्रोही॥
सकल धर्म देखइ बिपरीता। कहि न सकइ रावन भय भीता॥

(ती विचार करू लागली की—) पर्वत, नद्या आणि समुद्र ह्यांचा भार मला इतका जड वाटत नाही जेवढा भार एका परद्रोही (दुसऱ्याचे अनिष्ट करणाऱ्या) चा होतो. पृथ्वी सर्व धर्मविपरीत झालेले पाहत आहे. परंतु रावणाच्या भीतीने ती काही बोलू शकत नव्हती. ॥ ३ ॥

धेनु रूप धरि हृदयँ बिचारी। गई तहाँ जहँ सुर मुनि झारी॥
निज संताप सुनाएसि रोई। काहू तें कछु काज न होई॥

(अखेरीस) अंत:करणात विचार करून गायीचे रूप धारण करून पृथ्वी ज्याठिकाणी सर्व देवता आणि मुनी लपून बसले होते, तेथे गेली. तिने विलाप करून आपले दु:ख त्यांच्यासमोर मांडले, परंतु कोणाकडून काही काम होऊ शकले नाही. ॥ ४ ॥

छं०— **सुर मुनि गंधर्बा मिलि करि सर्बा गे बिरंचि के लोका।**
सँग गोतनुधारी भूमि बिचारी परम बिकल भय सोका॥
ब्रह्माँ सब जाना मन अनुमाना मोर कछू न बसाई।
जा करि तैं दासी सो अबिनासी हमरेउ तोर सहाई॥

तेव्हा देवता, मुनी आणि गंधर्व सर्व मिळून ब्रह्मलोकात (सत्य लोकात) गेले. भयाने आणि शोकाने अत्यंत व्याकूळ झालेली पृथ्वीसुद्धा गायीचे शरीर धारण करून त्यांच्या बरोबर गेली. ब्रह्मदेवांनी सर्व जाणले. त्यांनी मनात अनुमान केले की, माझेही येथे काही चालणार नाही. (तेव्हा ते पृथ्वीला म्हणाले की,) तू ज्याची दासी आहेस तो अविनाशी परमात्मा तुझा आणि आमचा दोघांचा सहायक आहे.

सो०— **धरनि धरहि मन धीर कह बिरंचि हरि पद सुमिरु।**
जानत जन की पीर प्रभु भंजिहि दारुन बिपति॥ १८४॥

ब्रह्मदेव म्हणाले—हे पृथ्वी! तू मनात धैर्य धारण करून श्रीहरिच्या चरण कमलांचे स्मरण कर. प्रभू आपल्या दासांचे दु:ख जाणतात. ते तुझ्या कठीण विपत्तीचा नाश करतील. ॥ १८४॥

बैठे सुर सब करहिं बिचारा। कहँ पाइअ प्रभु करिअ पुकारा॥
पुर बैकुंठ जान कह कोई। कोउ कह पयनिधि बस प्रभु सोई॥

सर्व देव एकत्र बसून विचार करू लागले की, प्रभू कुठे भेटतील म्हणजे त्यांच्यासमोर आपले गाऱ्हाणे मांडता येईल. कोणी वैकुंठाला जावे असे म्हणत होता आणि कोणी प्रभू क्षीरसागरात निवास करतात असे म्हणत होता. ॥ १ ॥

जाके हृदयँ भगति जसि प्रीती। प्रभु तहँ प्रगट सदा तेहिं रीती॥
तेहिं समाज गिरिजा मैं रहेऊँ। अवसर पाइ बचन एक कहेऊँ॥

ज्याच्या हृदयात जशी भक्ती आणि प्रीती असेल प्रभू (त्याच्यासाठी) तेथे नेहमी तशाच रीतीने प्रगट होतात. हे पार्वती! त्या समाजात मीसुद्धा होतो. अवसर मिळताच मी एक गोष्ट सांगितली— ॥ २ ॥

हरि ब्यापक सर्बत्र समाना। प्रेम तें प्रगट होहिं मैं जाना॥
देस काल दिसि बिदिसिहु माहीं। कहहु सो कहाँ जहाँ प्रभु नाहीं॥

माझा तर असा अनुभव आहे की, भगवान् सर्व ठिकाणी समानरूपाने व्यापक आहेत. प्रेमाने ते प्रगट होतात. देश, काल, दिशा, विदिशा यापैकी सांगा अशी जागा कुठे आहे ज्याठिकाणी प्रभू नाहीत. ॥ ३ ॥

अग जगमय सब रहित बिरागी। प्रेम तें प्रभु प्रगटइ जिमि आगी॥
मोर बचन सब के मन माना। साधु साधु करि ब्रह्म बखाना॥

ते चराचरमय (चराचरात व्याप्त) असूनही सर्वांपासून रहित आहेत आणि विरक्त आहेत. (त्यांची कुठेही आसक्ती नाही.) ते प्रेमाने प्रगट होतात जसा अग्नी. (अग्नी अव्यक्तरूपाने सर्वत्र व्याप्त आहे आणि जेथे त्याच्यासाठी अरणी मंथनादी साधानांचा वापर केला जातो, त्याठिकाणी तो प्रगट होतो. त्याप्रमाणे सर्वत्र व्याप्त असलेले भगवान्सुद्धा प्रेमाने प्रगट होतात.) माझे म्हणणे सर्वांना आवडले. ब्रह्मदेवाने "साधू" "साधू" म्हणून प्रशंसा केली. ॥ ४ ॥

दो०— **सुनि बिरंचि मन हरष तन पुलकि नयन बह नीर।**
अस्तुति करत जोरि कर सावधान मतिधीर॥ १८५॥

माझे वचन ऐकून ब्रह्मदेवाच्या मनाला फारच आनंद झाला. त्यांचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रातून (प्रेमामुळे) अश्रुपात आरंभ झाला. मग धीरबुद्धी ब्रह्मदेव सावधान होऊन हात जोडून भगवंताची स्तुती करू लागले. ॥ १८५ ॥

छं०— **जय जय सुरनायक जन सुखदायक प्रनतपाल भगवंता।**
गो द्विज हितकारी जय असुरारी सिंधुसुता प्रिय कंता॥
पालन सुर धरनी अद्भुत करनी मरम न जानइ कोई।
जो सहज कृपाला दीनदयाला करउ अनुग्रह सोई॥ १॥

हे देवतांचे, सेवकांना सुख देणारे, शरणागतांचे रक्षण करणारे भगवान्! आपला जयजयकार असो! जयजयकार असो! हे गो ब्राह्मण हितकारी, असुर विनाशक, समुद्र कन्येचे (लक्ष्मीचे) प्रिय स्वामी! आपला जयजयकार असो. हे देवता आणि पृथ्वीचे पालन करणारे तुमची लीला अद्भुत आहे. तिचे वर्म कोणीही जाणत नाही, असे जे स्वभावत:च कृपाळू आणि दीनदयाळू आहेत त्यांनीच आमच्यावर कृपा करावी. ॥ १ ॥

जय जय अबिनासी सब घट बासी ब्यापक परमानंदा।
अबिगत गोतीतं चरित पुनीतं मायारहित मुकुंदा॥
जेहि लागि बिरागी अति अनुरागी बिगत मोह मुनिबृंदा।
निसि बासर ध्यावहिं गुन गन गावहिं जयति सच्चिदानंदा॥ २॥

हे अविनाशी, सर्वांच्या हृदयात निवास करणारे (अंतर्यामी), सर्वव्यापक, परम आनन्दस्वरूप, अज्ञेय, इन्द्रियातीत, पवित्र चरित्र, माया रहित मुकुंद (मोक्षदाता)! आपला जयजयकार असो! जयजयकार असो! (इहलोक आणि परलोकातील सर्व भोगांपासून) विरक्त तसेच निर्मोह (ज्ञानी) मुनिवृन्द सुद्धा अत्यंत अनुरागी (प्रेमी) बनून ज्यांचे रात्रंदिवस ध्यान करतात आणि ज्यांच्या गुणांच्या समूहाचे गायन करतात, त्या सच्चिदानन्दाचा जयजयकार असो. ॥ २ ॥

जेहिं सृष्टि उपाई त्रिबिध बनाई संग सहाय न दूजा।
सो करउ अघारी चिंत हमारी जानिअ भगति न पूजा॥
जो भव भय भंजन मुनि मन रंजन गंजन बिपति बरूथा।
मन बच क्रम बानी छाड़ि सयानी सरन सकल सुरजूथा॥ ३॥

ज्यांनी दुसऱ्या कोणत्याही साथीशिवाय अगर सहायकाशिवाय एकट्यानेच (अथवा स्वत:च स्वत:ला त्रिगुणरूप—ब्रह्मा, विष्णु, शिवरूप बनवून अथवा उपादानकारणाविना अर्थात् स्वत:च सृष्टीचे अभिन्न निमित्तोपादान कारण बनून) तीन प्रकारची सृष्टी उत्पन्न केली. अशा पापांचा नाश करणाऱ्या भगवंतांनी आमचेकडे लक्ष द्यावे. आम्ही पूजाही जाणत नाही आणि भक्तीही जाणत नाही. जे संसाराच्या (जन्म-मृत्यूच्या) भयाचा नाश करणारे, मुनींच्या मनाला आनंद देणारे आणि संपूर्ण विपत्तींना नष्ट करणारे आहेत. आम्ही सर्व देवतांचे समूह मन, वचन आणि कर्माने चतुराई करण्याची सवय सोडून त्या भगवंताला आम्ही शरण आलो आहोत. ॥ ३ ॥

सारद श्रुति सेषा रिषय असेषा जा कहुँ कोउ नहिं जाना।
जेहि दीन पिआरे बेद पुकारे द्रवउ सो श्रीभगवाना॥
भव बारिधि मंदर सब बिधि सुंदर गुनमंदिर सुखपुंजा।
मुनि सिद्ध सकल सुर परम भयातुर नमत नाथ पद कंजा॥४॥

सरस्वती, वेद, शेष आणि संपूर्ण ऋषी, कोणीही त्यांना जाणत नाही, ज्यांना दीन प्रिय आहेत असे वेद आवर्जुन सांगतात. त्याच भगवंतांनी आमच्यावर दया करावी. हे संसाररूपी समुद्रासाठी (मंथनासाठी) मंदराचलरूप, सर्वप्रकारांनी सुंदर, गुणांचे धाम आणि सुखांची राशी असलेले नाथ! तुमच्या चरण कमली मुनी, सिद्ध आणि सर्व देवता भयाने अत्यंत व्याकूळ होऊन नमस्कार करीत आहेत. ॥ ४ ॥

दो०— **जानि सभय सुर भूमि सुनि बचन समेत सनेह।**
गगनगिरा गंभीर भइ हरनि सोक संदेह॥१८६॥

देवता आणि पृथ्वीला भयभीत झालेले पाहून आणि त्यांचे स्नेहयुक्त वचन ऐकून शोक आणि संदेह हरण करणारी गंभीर आकाशवाणी झाली— ॥ १८६ ॥

जनि डरपहु मुनि सिद्ध सुरेसा। तुम्हहि लागि धरिहउँ नर बेसा॥
अंसन्ह सहित मनुज अवतारा। लेहउँ दिनकर बंस उदारा॥

हे मुनी, सिद्ध आणि देवतांच्या स्वामींनो! घाबरू नका. तुमच्यासाठी मी मनुष्यरूप धारण करीन आणि उदार (पवित्र) सूर्यवंशामध्ये अंशासहित मनुष्यरूपी अवतार घेईन. ॥ १ ॥

कस्यप अदिति महातप कीन्हा। तिन्ह कहुँ मैं पूरब बर दीन्हा॥
ते दसरथ कौसल्या रूपा। कोसलपुरीं प्रगट नर भूपा॥

कश्यप आणि अदितीने फार मोठे तप केले होते. मी पूर्वीच त्यांना वर दिला आहे. तेच यावेळी अयोध्यापुरीत दशरथ आणि कौसल्याचे रूपात मानवांचे राजे होऊन प्रगट झाले आहेत. ॥ २ ॥

तिन्ह कें गृह अवतरिहउँ जाई। रघुकुल तिलक सो चारिउ भाई॥
नारद बचन सत्य सब करिहउँ। परम सक्ति समेत अवतरिहउँ॥

त्यांच्याच घरी मी रघुकुलात श्रेष्ठ अशा भावंडांच्या रूपात अवतार घेइन. नारदांची सर्व वचने मी सत्य करीन आणि स्वत:च्या पराशक्तीसह अवतार घेईन. ॥३ ॥

हरिहउँ सकल भूमि गरुआई। निर्भय होहु देव समुदाई॥
गगन ब्रह्मबानी सुनि काना। तुरत फिरे सुर हृदय जुड़ाना॥

मी पृथ्वीचा सर्व भार हरण करेल. हे देववृंदांनो! तुम्ही निर्भय व्हा. आकाशात झालेली ब्रह्मवाणी (भगवंताची) कानाने ऐकून सर्व देवता त्वरित परतल्या. त्यांचे हृदय शांत झाले. ॥ ४ ॥

तब ब्रह्माँ धरनिहि समुझावा। अभय भई भरोस जियँ आवा॥

तेव्हा ब्रह्मदेवाने पृथ्वीला समजावून सांगितले. मग ती देखील निर्भय झाली आणि त्यामुळे तिच्यात भरोसा (धाडस) निर्माण झाला. ॥ ५ ॥

दो०— **निज लोकहि बिरंचि गे देवन्ह इहइ सिखाइ।**
बानर तनु धरि धरि महि हरि पद सेवहु जाइ॥ १८७॥

सर्व देवतांना वानरांचे शरीर धारण करून पृथ्वीवर जाऊन भगवंतचरणाची सेवा करा असे शिकवून ब्रह्मदेव आपल्या लोकात गेले. ॥ १८७ ॥

गए देव सब निज निज धामा। भूमि सहित मन कहुँ बिश्रामा॥
जो कछु आयसु ब्रह्माँ दीन्हा। हरषे देव बिलंब न कीन्हा॥

सर्व देवता आपापल्या लोकात गेल्या. पृथ्वीसह सर्वांच्या मनाला शांती मिळाली. ब्रह्मदेवाने जी काही आज्ञा दिली, त्यामुळे देवता फार प्रसन्न झाल्या आणि त्यांनी तात्काळ तसे केले. ॥ १ ॥

बनचर देह धरी छिति माहीं। अतुलित बल प्रताप तिन्ह पाहीं॥
गिरि तरु नख आयुध सब बीरा। हरि मारग चितवहिं मतिधीरा॥

त्यांनी (देवतांनी) पृथ्वीवर येऊन वानर देह धारण केले. त्यांच्यात अपार बल आणि प्रताप होता. सर्वच शूरवीर होते. पर्वत, वृक्ष आणि नखे हीच त्यांची शस्त्रे होती. ते धैर्यवान (वानररूपी देवता) भगवंताच्या आगमनाची वाट पाहू लागले. ॥ २ ॥

गिरि कानन जहँ तहँ भरि पूरी। रहे निज निज अनीक रचि रूरी॥
यह सब रुचिर चरित मैं भाषा। अब सो सुनहु जो बीचहिं राखा॥

ते (वानर) पर्वतावर आणि अरण्यात जिकडे-तिकडे आपापली सुंदर सेना करून भरपूर विस्तारले. हे सर्व सुंदर चरित्र मी सांगितले. आता ते चरित्र ऐक ज्याला मी मधूनच सोडले होते. ॥ ३ ॥

अवधपुरीं रघुकुलमनि राऊ। बेद बिदित तेहि दसरथ नाऊँ॥
धरम धुरंधर गुननिधि ग्यानी। हृदयँ भगति मति सारँगपानी॥

ज्याचे नाव वेदात विख्यात आहे असे रघुकुल शिरोमणि दशरथ नावाचे राजे अयोध्यापुरीत जन्माला आले. ते धर्मधुरंधर, गुणांचे भांडार आणि ज्ञानी होते. त्यांच्या हृदयात शार्ङ्गधनुष्य धारण करणाऱ्या भगवंताची भक्ती होती आणि त्यांची बुद्धीसुद्धा त्यांच्यातच रत राहत होती. ॥ ४ ॥

दो०— **कौसल्यादि नारि प्रिय सब आचरन पुनीत।**
पति अनुकूल प्रेम दृढ़ हरि पद कमल बिनीत॥ १८८॥

त्यांच्या कौसल्यादी प्रिय राण्या सर्वच पवित्र आचरण करणाऱ्या होत्या. त्या (फार) विनीत आणि पतीच्या अनुकूल (वागणाऱ्या) होत्या. तसेच श्रीहरिच्या चरण कमलांवर त्यांचे दृढ प्रेम होते. ॥ १८८ ॥

एक बार भूपति मन माहीं। भै गलानि मोरें सुत नाहीं॥
गुर गृह गयउ तुरत महिपाला। चरन लागि करि बिनय बिसाला॥

एकदा राजाच्या मनात फार ग्लानी झाली की, आपल्याला पुत्र नाही. तो तात्काळ गुरूंकडे गेला आणि त्याने गुरूंना वंदन करून फार विनंती केली. ॥ १ ॥

निज दुख सुख सब गुरहि सुनायउ। कहि बसिष्ठ बहुबिधि समुझायउ॥
धरहु धीर होइहहिं सुत चारी। त्रिभुवन बिदित भगत भय हारी॥

राजाने आपले सर्व सुखदु:ख गुरूपुढे मांडले. वसिष्ठ गुरूजींनी त्याला पुष्कळ प्रकाराने समजावून सांगितले. (आणि म्हणाले—) धैर्य धारण कर, तुला चार पुत्र होतील, जे तिन्ही लोकांत प्रसिद्ध आणि भक्तांचे भय हरण करणारे असतील. ॥ २ ॥

सृंगी रिषिहि बसिष्ठ बोलावा। पुत्रकाम सुभ जग्य करावा॥
भगति सहित मुनि आहुति दीन्हें। प्रगटे अगिनि चरू कर लीन्हें॥

वसिष्ठजींनी शृंगी ऋषिंना बोलविले आणि त्यांच्याकडून शुभ पुत्रकामेष्टी यज्ञ करविला. मुनींनी भक्तीसह आहूत्या दिल्यावर अग्निदेव हातात चरू (हविष्यान्न खीर) घेऊन प्रगट झाले. ॥ ३ ॥

जो बसिष्ठ कछु हृदयँ बिचारा। सकल काजु भा सिद्ध तुम्हारा॥
यह हबि बाँटि देहु नृप जाई। जथा जोग जेहि भाग बनाई॥

(आणि दशरथाला म्हणाले—) वसिष्ठजींनी हृदयात जो विचार केला होता तुझे ते सर्व काम सिद्ध झाले आहे. हे राजन्! (आता) तू जाऊन ह्या हविष्यान्नाचे (पायसाचे) यथोचित भाग करून वाटून दे. ॥ ४ ॥

दो०— **तब अदृस्य भए पावक सकल सभहि समुझाइ।**
परमानंद मगन नृप हरष न हृदयँ समाइ॥ १८९॥

त्यानंतर अग्निदेव सर्व सभेला समजावून अंतर्धान झाले. राजा परमानंदात मग्न झाला. त्याच्या अंत:करणात आनंद मावत नव्हता. ॥ १८९ ॥

तबहिं रायँ प्रिय नारि बोलाईं। कौसल्यादि तहाँ चलि आईं॥
अर्ध भाग कौसल्यहि दीन्हा। उभय भाग आधे कर कीन्हा॥

त्याचवेळी राजाने आपल्या प्रिय पत्नींना बोलाविले. कौसल्या इत्यादी सर्व (राण्या) त्या ठिकाणी आल्या. राजाने (पायसाचा) अर्धा भाग कौसल्येला दिला, (आणि बाकीच्या) अर्ध्याचे दोन भाग केले. ॥ १ ॥

कैकेई कहँ नृप सो दयऊ। रह्यो सो उभय भाग पुनि भयऊ॥
कौसल्या कैकेई हाथ धरि। दीन्ह सुमित्रहि मन प्रसन्न करि॥

तो भाग (त्यापैकी एक भाग) राजाने कैकयीला दिला. बाकी राहिलेल्या भागाचे दोन हिस्से केले आणि राजाने त्यांना (भागांना) कौसल्या आणि कैकेयी यांच्या हातावर ठेवून (अर्थात् त्यांची अनुमती घेऊन) अशा प्रकारे त्यांचे मन प्रसन्न करून (ते भाग) सुमित्रेला दिले. ॥ २ ॥

एहि बिधि गर्भसहित सब नारी। भईं हृदयँ हरषित सुख भारी॥
जा दिन तें हरि गर्भहिं आए। सकल लोक सुख संपति छाए॥

अशा प्रकारे सर्व पत्नी गर्भवती झाल्या. त्यामुळे त्या फार हर्षित झाल्या व सुखी झाल्या. ज्या दिवसापासून श्रीहरि (लीलेनेच) गर्भात आले, सर्व लोकांमध्ये सुख-संपत्तीचा विस्तार झाला. ॥ ३ ॥

मंदिर महँ सब राजहिं रानीं। सोभा सील तेज की खानीं॥
सुख जुत कछुक काल चलि गयऊ। जेहिं प्रभु प्रगट सो अवसर भयऊ॥

शोभा, शील आणि तेजाची खाण (असलेल्या) सर्व राण्या महालात शोभून दिसू लागल्या. अशाप्रकारे काही काळ सुखपूर्वक गेला. पुढे ती वेळ आली ज्यावेळी प्रगट व्हायचे होते. ॥ ४ ॥

दो०— **जोग लगन ग्रह बार तिथि सकल भए अनुकूल।**
चर अरु अचर हर्षजुत राम जनम सुखमूल॥ १९०॥

योग, लग्न, ग्रह, वार आणि तिथी सर्वच अनुकूल झाले. जड आणि चेतन सर्व हर्षभरित झाले. कारण श्रीरामाचा जन्म सुखाचे मूळ आहे. ॥ १९० ॥

नौमी तिथि मधु मास पुनीता। सुकल पच्छ अभिजित हरिप्रीता॥
मध्यदिवस अति सीत न घामा। पावन काल लोक बिश्रामा॥

पवित्र चैत्र महिना होता, नवमी तिथी होती. शुक्लपक्ष आणि भगवंताचा प्रिय अभिजित मुहूर्त होता. दुपारची वेळ होती. फार थंडीही नव्हती आणि फार गरमी (ऊन) ही नव्हती. तो पवित्र समय सर्व लोकांना शांती देणारा होता. ॥ १ ॥

सीतल मंद सुरभि बह बाऊ। हरषित सुर संतन मन चाऊ॥
बन कुसुमित गिरिगन मनिआरा। स्रवहिं सकल सरिताऽमृतधारा॥

शीतल, मंद आणि सुंगधित वायू वाहत होता. देवता आनंदात मग्न होत्या. संतांच्या मनात खूप उत्सुकता होती. वनात फुले उमलली होती. पर्वतांचे समूह रत्नांनी झळकू लागले होते. सर्व नद्यांमध्ये अमृताच्या धारा वाहत होत्या. ॥ २ ॥

सो अवसर बिरंचि जब जाना। चले सकल सुर साजि बिमाना॥
गगन बिमल संकुल सुर जूथा। गावहिं गुन गंधर्ब बरूथा॥

जेव्हा ब्रह्मदेवाने तो अवसर (भगवंताच्या प्रकटीकरणाचा) जाणला तेव्हा (त्यांच्यासह) सर्व देवता आपापली विमाने सजवून निघाल्या. निर्मळ आकाश देवतांच्या समूहाने भरून गेले. गंधर्वांचा समाज गुणगान करू लागला. ॥ ३ ॥

बरषहिं सुमन सुअंजुलि साजी। गहगहि गगन दुंदुभी बाजी॥
अस्तुति करहिं नाग मुनि देवा। बहुबिधि लावहिं निज निज सेवा॥

आणि सुंदर ओंजळीने फुलांचा वर्षाव करू लागले. आकाशात मोठ मोठ्याने नगारे वाजू लागले. नाग, मुनी आणि देव स्तुती करू लागले आणि ते आपापली अनेक प्रकारची सेवा (उपहार) समर्पण करू लागले. ॥ ४ ॥

दो०— **सुर समूह बिनती करि पहुँचे निज निज धाम।**
जगनिवास प्रभु प्रगटे अखिल लोक बिश्राम॥ १९१॥

देवतांच्या समूहांनी विनंती केली आणि ते आपापल्या लोकात गेले. समस्त लोकांना शांती प्रदान करणारे जगदाधार प्रभू प्रगट झाले. ॥ १९१ ॥

छं०— **भए प्रगट कृपाला दीनदयाला कौसल्या हितकारी।**
हरषित महतारी मुनि मन हारी अद्भुत रूप बिचारी॥
लोचन अभिरामा तनु घनस्यामा निज आयुध भुज चारी।
भूषन बनमाला नयन बिसाला सोभासिंधु खरारी॥ १॥

दीनावर दया करणारे, कौसल्येचे हितकारी कृपाळू प्रभू प्रगट झाले. मुनींच्या मनाला हरण करणाऱ्या, त्यांच्या अद्भुत रूपाचा विचार करून माता हर्षभरित झाली. नेत्रांना आंनद देणारे मेघा-सारखे शाम शरीर होते. चारी भुजांमध्ये स्वत:ची (विशेष) आयुधे (धारण केलेली) होती. (दिव्य) अलंकार आणि वनमाला शरीरावर धारण केली होती. विशाल नेत्र होते. अशा प्रकारे शोभेचे समुद्र तसेच खर राक्षसाला मारणारे भगवान् प्रगट झाले. ॥१ ॥

कह दुइ कर जोरी अस्तुति तोरी केहि बिधि करौं अनंता।
माया गुन ग्यानातीत अमाना बेद पुरान भनंता॥
करुना सुख सागर सब गुन आगर जेहि गावहिं श्रुति संता।
सो मम हित लागी जन अनुरागी भयउ प्रगट श्रीकंता॥ २॥

दोन्ही हात जोडून माता म्हणाली—हे अनंत! मी तुमची कशा रीतीने स्तुती करू? वेद आणि पुराण तुम्हाला माया, गुण आणि ज्ञानाहून पर आणि परिमाणरहित म्हणतात. श्रुती आणि संतजन तुमचे दया आणि सुखाचे समुद्र, सर्व गुणांचे धाम म्हणून गायन करतात, तेच भक्तांवर प्रेम करणारे लक्ष्मीपती भगवान् माझ्या कल्याणासाठी प्रगट झाले आहेत. ॥ २ ॥

ब्रह्मांड निकाया निर्मित माया रोम रोम प्रति बेद कहै।
मम उर सो बासी यह उपहासी सुनत धीर मति थिर न रहै॥
उपजा जब ग्याना प्रभु मुसुकाना चरित बहुत बिधि कीन्ह चहै।
कहि कथा सुहाई मातु बुझाई जेहि प्रकार सुत प्रेम लहै॥३॥

वेद म्हणतात की, तुमच्या प्रत्येक रोमामध्ये मायेने रचलेले अनेक ब्रह्मांडाचे समूह (भरलेले) आहेत. तेच तुम्ही माझ्या गर्भात राहिलात. ही हास्यास्पद गोष्ट ऐकली तर धैर्यवान (विवेकी) पुरुषांची बुद्धीसुद्धा स्थिर राहत नाही. (विचलित होते) जेव्हा आईमध्ये ज्ञान प्रगट झाले तेव्हा प्रभूंनी मधुर हास्य केले. प्रभू अनेक प्रकारच्या लीला करू इच्छितात. म्हणून त्यांनी (पूर्वजन्माची) जेणे करून तिला पुत्राचे (वात्सल्य) प्रेम निर्माण होईल (भगवंताचे ठिकाणी पुत्रभाव होईल) सुंदर कथा सांगून मातेला समजावले. ॥ ३ ॥

माता पुनि बोली सो मति डोली तजहु तात यह रूपा।
कीजै सिसुलीला अति प्रियसीला यह सुख परम अनूपा॥
सुनि बचन सुजाना रोदन ठाना होइ बालक सुरभूपा।
यह चरित जे गावहिं हरिपद पावहिं ते न परहिं भवकूपा॥४॥

मातेची ती बुद्धी बदलली तेव्हा ती म्हणू लागली—"हे तात! तू हे रूप बदलून अत्यंत प्रिय अशा बाल लीला कर. (माझ्यासाठी) ते सुख परम अनुपम असेल. (मातेचे) हे वचन ऐकून देवतांचे स्वामी सुजाण भगवंत ह्यांनी बालक (रूप) होऊन रुदन सुरू केले. (तुलसीदासजी म्हणतात—) जे या चरित्राचे गायन करतात ते श्रीहरिच्या पदाला प्राप्त होतात आणि (मग) संसाररूपी विहीरीत पडत नाहीत. ॥ ४ ॥

दो०— **बिप्र धेनु सुर संत हित लीन्ह मनुज अवतार।**
निज इच्छा निर्मित तनु माया गुन गो पार॥१९२॥

ब्राह्मण, देवता, गाय आणि संतांसाठी भगवंतांनी मनुष्यावतार धारण केला. ते (अज्ञानमयी, मलिन) माया, तिचे गुण (सत, रज, तम) आणि (बाह्य तसेच अंतर) इंद्रिये याहून पर आहेत. त्यांचे (दिव्य) शरीर स्वत:च्या इच्छेनेच बनलेले आहे. (कोणत्याही कर्मबन्धाला परवश होऊन त्रिगुणात्मक भौतिक पदार्थांद्वारा नव्हे.) ॥ १९२ ॥

सुनि सिसु रुदन परम प्रिय बानी। संभ्रम चलि आईं सब रानी॥
हरषित जहँ तहँ धाईं दासी। आनँद मगन सकल पुरबासी॥

बालकाच्या रडण्याचा फारच गोड ध्वनी ऐकून सर्व राण्या उतावळ्या होऊन पळत आल्या. दासी आनंदाने जिकडे-तिकडे धावू लागल्या. सर्व नगरवासी आनंदात मग्न झाले. ॥ १ ॥

दसरथ पुत्रजन्म सुनि काना। मानहुँ ब्रह्मानंद समाना॥
परम प्रेम मन पुलक सरीरा। चाहत उठन करत मति धीरा॥

राजा दशरथजी पुत्राचा जन्म झालेला कानाने ऐकून जणूकाय ब्रह्मानन्दात मिळून गेले. मनात अतिशय प्रेम आहे आणि शरीर पुलकित झाले आहे. (आनंदात अधीर झालेल्या) बुद्धीला धैर्य देऊन (आणि प्रेमाने शिथिल झालेल्या शरीराला सांभाळून) ते उठू इच्छितात. ॥ २ ॥

जाकर नाम सुनत सुभ होई। मोरें गृह आवा प्रभु सोई॥
परमानंद पूरि मन राजा। कहा बोलाइ बजावहु बाजा॥

ज्यांच्या नामाच्या श्रवणानेच कल्याण होते, तेच प्रभू माझ्या घरी आले आहेत. (हा विचार करून) राजाचे मन परमानंदाने परिपूर्ण झाले. त्यांनी वाजंत्र्यांना बोलावून वाद्ये वाजविण्यास सांगितले. ॥ ३ ॥

गुर बसिष्ठ कहँ गयउ हँकारा। आए द्विजन सहित नृपद्वारा॥
अनुपम बालक देखेन्हि जाई। रूप रासि गुन कहि न सिराई॥

गुरू वसिष्ठजींकडे बोलावणे पाठवले. ते ब्राह्मणांना बरोबर घेऊन राजदरबारात आले. जे रूपाची राशी आहे आणि ज्याचे गुण वर्णन कितीही केले तरी संपत नाही अशा अनुपम बालकाला त्यांनी पाहिले. ॥ ४ ॥

दो०— **नंदीमुख सराध करि जातकरम सब कीन्ह।**
हाटक धेनु बसन मनि नृप बिप्रन्ह कहँ दीन्ह॥ १९३॥

नंतर राजाने नान्दीमुख श्राद्ध करून सर्व जातकर्म संस्कार इत्यादी केले आणि ब्राह्मणांना सुवर्ण, गाय, वस्त्र तसेच रत्नांचे दान केले. ॥ १९३ ॥

ध्वज पताक तोरन पुर छावा। कहि न जाइ जेहि भाँति बनावा॥
सुमनबृष्टि अकास तें होई। ब्रह्मानंद मगन सब लोई॥

ध्वजा, पताका आणि तोरणांनी नगर सजविले. ज्या रीतीने नगर सजविले त्याचे वर्णन होऊ शकत नाही. आकाशातून फुलांचा वर्षाव होत आहे. सर्व लोक ब्रह्मानंदात मग्न आहेत. ॥ १ ॥

बृंद बृंद मिलि चलीं लोगाईं। सहज सिंगार किएँ उठि धाईं॥
कनक कलस मंगल भरि थारा। गावत पैठहिं भूप दुआरा॥

स्त्रीयांच्या झुंडीच्या झुंडी निघाल्या. स्वाभाविक शृंगार करून त्या धावत निघाल्या. त्यांनी सोन्याचा कलश घेऊन आणि ताटात मंगल द्रव्य भरून गात गात राजद्वारात प्रवेश केला. ॥ २ ॥

करि आरति नेवछावरि करहीं। बार बार सिसु चरनन्हि परहीं॥
मागध सूत बंदिगन गायक। पावन गुन गावहिं रघुनायक॥

त्या आरती करून ओवाळणी टाकतात आणि वारंवार बालकाच्या चरणाला वंदन करतात. मागध, सूत, बंदीजन आणि गायक लोक रघुकुलस्वामींच्या पवित्र गुणांचे गायन करतात. ॥ ३ ॥

सर्बस दान दीन्ह सब काहू। जेहिं पावा राखा नहिं ताहू॥
मृगमद चंदन कुंकुम कीचा। मची सकल बीथिन्ह बिच बीचा॥

राजाने सर्वांना भरपूर दान दिले. ज्याने दान घेतले त्याने सुद्धा आपल्याजवळ ठेवले नाही (लुटून टाकले.) नगराच्या सर्व गल्लीमधून कस्तूरी, चंदन आणि केसराचा खच पडला. ॥ ४ ॥

दो०— **गृह गृह बाज बधाव सुभ प्रगटे सुषमा कंद।**
हरषवंत सब जहँ तहँ नगर नारि नर बृंद॥ १९४॥

घराघरातून मंगलमय वाद्ये वाजू लागली, कारण शोभेचे मूळ भगवान् प्रगट झाले आहेत. नगरातील स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी जिकडे-तिकडे आनंदात मग्न झाल्या आहेत. ॥ १९४ ॥

कैकयसुता सुमित्रा दोऊ। सुंदर सुत जनमत भैं ओऊ॥
वह सुख संपति समय समाजा। कहि न सकइ सारद अहिराजा॥

कैकेयी आणि सुमित्रा— या दोघींनी सुद्धा सुंदर पुत्रांना जन्म दिला. त्यावेळच्या सुख, संपत्ती, समय आणि समाजाचे वर्णन सरस्वती आणि सर्पाचे राजे शेषसुद्धा करू शकत नाहीत. ॥ १ ॥

अवधपुरी सोहइ एहि भाँती। प्रभुहि मिलन आई जनु राती॥
देखि भानु जनु मन सकुचानी। तदपि बनी संध्या अनुमानी॥

अयोध्यापुरी अशाप्रकारे सुशोभित होत आहे, जणू काय रात्र प्रभूंना भेटण्यासाठी आली आहे आणि सूर्याला पाहून संकोचित झाली आहे. परंतु तरीही मनात विचार करून जणू काय ती संध्या (बनून राहिली) आहे. ॥ २ ॥

अगर धूप बहु जनु अँधिआरी। उड़इ अबीर मनहुँ अरुनारी॥
मंदिर मनि समूह जनु तारा। नृप गृह कलस सो इंदु उदारा॥

अगर बत्तीचा खूप धूर हा जणू काही (संध्येचा) अंधकार आहे आणि जो गुलाल उडत आहे, ती तिची लालिमा आहे. महालांमध्ये जे मण्यांचे समूह आहेत, ते जणू तारांगण आहेत. राजमहालाचा जो कळस आहे तोच जणू श्रेष्ठ चंद्रमा आहे. ॥ ३ ॥

भवन बेदधुनि अति मृदु बानी। जनु खग मुखर समयँ जनु सानी॥
कौतुक देखि पतंग भुलाना। एक मास तेइँ जात न जाना॥

राजभवनात अती कोमल शब्दाने जो वेदध्वनी होत आहे तो जणू समयानुकूल होत असलेला पक्षांचा किलकिलाट आहे. हे कौतुक पाहून सूर्यालासुद्धा (आपल्या वेगाचे) विस्मरण झाले. एक महीना गेल्याचे त्यांना कळले नाही. (अर्थात् त्यांचा एक महिना तेथेच गेला.) ॥ ४ ॥

दो०— **मास दिवस कर दिवस भा मरम न जानइ कोइ।**
रथ समेत रबि थाकेउ निसा कवन बिधि होइ॥ १९५॥

महिन्याभराचा एक दिवस झाला. हे रहस्य कोणीही जाणले नाही. सूर्य आपल्या रथासह तेथेच थांबले, मग रात्र होईलच कशी?॥ १९५॥

यह रहस्य काहूँ नहिं जाना। दिनमनि चले करत गुनगाना॥
देखि महोत्सव सुर मुनि नागा। चले भवन बरनत निज भागा॥

हे रहस्य कोणी जाणले नाही. सूर्यदेव (भगवान् श्रीरामचे) गुणगान करीत निघाले. हा महोत्सव पाहून देवता, मुनी आणि नाग आपल्या भाग्याची प्रशंसा करीत आपापल्या घरी गेले.॥ १॥

औरउ एक कहउँ निज चोरी। सुनु गिरिजा अति दृढ़ मति तोरी॥
काकभुसुंडि संग हम दोऊ। मनुजरूप जानइ नहिं कोऊ॥

हे पार्वती! तुझी बुद्धी (श्रीरामाच्या चरणांमध्ये) फारच दृढ होत आहे, म्हणूनच मी माझी आणखी एक चोरीची (गुप्त) गोष्ट तुला सांगतो, ऐक. काकभुशुंडी आणि मी दोघेही बरोबरच त्या ठिकाणी गेलो होतो. परंतु आम्ही दोघेही मनुष्यरूपात होतो त्यामुळे आम्हा दोघांना कोणीही ओळखू शकले नाही.॥ २॥

परमानंद प्रेम सुख फूले। बीथिन्ह फिरहिं मगन मन भूले॥
यह सुभ चरित जान पै सोई। कृपा राम कै जापर होई॥

परमानंद आणि प्रेमसुखात बुडलेले असल्यामुळे आम्ही दोघेही तल्लीन मनाने आपल्याच मस्तीत गल्ली गल्लीत (तन-मनाची शुद्ध) विसरून फिरत होतो. परंतु हे शुभ चरित्र तोच जाणू शकतो ज्याच्यावर श्रीरामजींची कृपा आहे.॥ ३॥

तेहि अवसर जो जेहि बिधि आवा। दीन्ह भूप जो जेहि मन भावा॥
गज रथ तुरग हेम गो हीरा। दीन्हे नृप नानाबिधि चीरा॥

त्योवळी जो जसा आला आणि ज्याला जे आवडले, राजाने त्याला ते दिले. हत्ती, रथ, घोडे, सोने, गायी, रत्न आणि नाना प्रकारचे वस्त्र राजाने दिले.॥ ४॥

दो०— **मन संतोषे सबन्हि के जहँ तहँ देहिं असीस।**
सकल तनय चिर जीवहुँ तुलसिदास के ईस॥ १९६॥

राजाने सर्वांची मने संतुष्ट केली. (म्हणून) सर्व लोक जिकडे-तिकडे असा आशीर्वाद देत होते की, तुलसीदासाचे स्वामी—सर्वपुत्र (चारही राजकुमार) चिरंजीवी (दीर्घायू) होवोत.॥ १९६॥

कछुक दिवस बीते एहि भाँती। जात न जानिअ दिन अरु राती॥
नामकरन कर अवसरु जानी। भूप बोलि पठए मुनि ग्यानी॥

अशा प्रकारे काही दिवस गेले. दिवस केव्हा मावळला आणि रात्र केव्हा संपली हे कळतच नव्हते. नामकरण संस्काराचा समय आलेला जाणून राजाने ज्ञानी मुनी श्रीवसिष्ठजींना बोलावणे पाठवले. ॥ १ ॥

करि पूजा भूपति अस भाषा। धरिअ नाम जो मुनि गुनि राखा॥
इन्ह के नाम अनेक अनूपा। मैं नृप कहब स्वमति अनुरूपा॥

मुनींचे पूजन करून राजा म्हणले—हे मुनी! आपल्या मनात जी ठरविली असतील ती या मुलांची नावे ठेवा. मुनी म्हणाले—हे राजन्! यांची अनेक अनुपम नावे आहेत, तरीही मी माझ्या बुद्धीनुसार सांगतो. ॥ २ ॥

जो आनंद सिंधु सुखरासी। सीकर तें त्रैलोक सुपासी॥
सो सुखधाम राम अस नामा। अखिल लोक दायक बिश्रामा॥

हे जे आनंदाचे समुद्र आणि सुखाची राशी आहेत,ज्यांच्या (आनन्द सिन्धु) एका अंशाने तिन्ही लोक सुखी होतात, त्यांचे (तुमच्या सर्वात वडील पुत्राचे) नाव "राम" आहे. जे सुखाचे भवन आणि संपूर्ण लोकांना शांती देणारे आहेत. ॥ ३ ॥

बिस्व भरन पोषन कर जोई। ताकर नाम भरत अस होई॥
जाके सुमिरन तें रिपु नासा। नाम सत्रुहन बेद प्रकासा॥

जे संसाराचे भरण-पोषण करतात त्यांचे (तुमच्या दुसऱ्या पुत्राचे) नाव "भरत" असेल. ज्यांच्या केवळ स्मरणाने शत्रूचा नाश होतो, त्यांचे वेदांमध्ये प्रसिद्ध "शत्रुघ्न" नाव आहे. ॥ ४ ॥

दो०— **लच्छन धाम राम प्रिय सकल जगत आधार।**
गुरु बसिष्ट तेहि राखा लछिमन नाम उदार॥ १९७॥

जे शुभ लक्षणाचे धाम श्रीरामजींचे प्रिय आणि सर्व जगताचे आधार आहेत त्यांचे गुरू वसिष्ठजींनी "लक्ष्मण" असे श्रेष्ठ नाव ठेवले. ॥ १९७ ॥

धरे नाम गुर हृदयँ बिचारी। बेद तत्व नृप तव सुत चारी॥
मुनि धन जन सरबस सिव प्राना। बाल केलि रस तेहिं सुख माना॥

गुरूजींनी स्वत: विचार करून ही नावे ठेवली (आणि म्हटले) हे राजन्! तुझे चारही पुत्र वेदाचे तत्त्व (साक्षात परात्पर भगवान्) आहेत. जे मुनींचे धन, भक्तांचे सर्वस्व आणि शिवजींचे प्राण आहेत, त्यांनी (यावेळी तुमच्या प्रेमाखातर) बाललीलेच्या रसात यावेळी सुख मानले आहे. ॥ १ ॥

बारेहि ते निज हित पति जानी। लछिमन राम चरन रति मानी॥
भरत सत्रुहन दूनउ भाई। प्रभु सेवक जसि प्रीति बड़ाई॥

बालपणापासूनच श्रीरामचंद्रजींना आपले परम हितैषी स्वामी जाणून लक्ष्मणजीने त्यांच्या चरणी

प्रीती जोडली. भरत आणि शत्रुघ्न दोघा भावंडात स्वामी आणि सेवकामधील जशा प्रेमाची प्रशंसा केली जाते तशी प्रीती निर्माण झाली. ॥ २ ॥

स्याम गौर सुंदर दोउ जोरी। निरखहिं छबि जननीं तृन तोरी॥
चारिउ सील रूप गुन धामा। तदपि अधिक सुखसागर रामा॥

शाम आणि गौर शरीराच्या दोन्ही जोड्यांच्या शोभेला पाहून माता दृष्ट लागू नये म्हणून गवताची काडी तोडून टाकते. तसे पाहिले तर चारीही पुत्र शील, रूप आणि गुणांचे धाम आहेत, तरीही सुखाचे समुद्र श्रीरामचंद्रजी सर्वांपेक्षा विशेष आहेत. ॥ ३ ॥

हृदयँ अनुग्रह इंदु प्रकासा। सूचत किरन मनोहर हासा॥
कबहुँ उछंग कबहुँ बर पलना। मातु दुलारइ कहि प्रिय ललना॥

त्यांच्या हृदयात कृपारूपी चंद्रमा प्रकाशत आहे. त्यांचे मनोहर हास्य त्याच्या (कृपारूपी चंद्रमाच्या) किरणांना सूचित करते. कधी मांडीवर (घेऊन) आणि कधी सुंदर पाळण्यात झोपवून माता 'माझ्या बाळा' म्हणून प्रेमाने कुरवाळते. ॥ ४ ॥

दो०— **ब्यापक ब्रह्म निरंजन निर्गुन बिगत बिनोद।**
सो अज प्रेम भगति बस कौसल्या कें गोद॥ १९८॥

जे सर्वव्यापक, निरंजन (मायारहित) निर्गुण, विनोदरहित आणि अजन्मा ब्रह्म आहे, तेच प्रेम आणि भक्तीला वश होऊन कौसल्येच्या मांडीवर खेळत आहे. ॥ १९८ ॥

काम कोटि छबि स्याम सरीरा। नील कंज बारिद गंभीरा॥
अरुन चरन पंकज नख जोती। कमल दलन्हि बैठे जनु मोती॥

त्यांच्या नीळकमळ आणि गंभीर (जलयुक्त) मेघासारख्या सावळ्या शरीरामध्ये कोट्यवधी कामदेवांची शोभा शोभत आहे. लाल-लाल चरणकमलांच्या नखांची (शुभ्र) ज्योती अशी दिसते की, जणू काय (लाल) कमळाच्या पानावर मोती स्थिर झाले आहेत. ॥ १ ॥

रेख कुलिस ध्वज अंकुस सोहे। नूपुर धुनि सुनि मुनि मन मोहे॥
कटि किंकिनी उदर त्रय रेखा। नाभि गभीर जान जेहिं देखा॥

(चरणतलांवर) वज्रध्वजा आणि अंकुशाचे चिन्ह शोभत आहे. नूपुरांची (पैंजणांची) ध्वनी ऐकून मुनींचे मनसुद्धा मोहित होत आहे. कमरेला साखळी आणि पोटावर तीन रेखा (त्रिवली) आहेत. नाभीच्या गंभीरतेला तर तेच जाणतात ज्यांनी तिला पाहिले आहे. ॥ २ ॥

भुज बिसाल भूषन जुत भूरी। हियँ हरि नख अति सोभा रूरी॥
उर मनिहार पदिक की सोभा। बिप्र चरन देखत मन लोभा॥

अनेक अलंकारांनी विशाल बाहू सुशोभित आहेत. छातीवर वाघाच्या नखाची फारच उत्तम छटा दिसत आहे. तसेच छातीवर रत्नयुक्त मण्यांच्या माळेची शोभा आणि ब्राह्मणाच्या (भृगुच्या) चरण चिन्हाला पाहताच मन आकर्षित होते. ॥ ३ ॥

कंबु कंठ अति चिबुक सुहाई। आनन अमित मदन छबि छाई॥
दुइ दुइ दसन अधर अरुनारे। नासा तिलक को बरनै पारे॥

कंठ शंखासारखा (उतार-चढ असणारा तीन रेघांनी सुशोभित) आहे आणि हनुवटी अत्यंत सुंदर आहे. मुखावर असंख्य कामदेवांची छटा विलसत आहे. दोन-दोन सुंदर दात दिसत आहेत, लाल-लाल ओठ आहेत. नासिका आणि तिलक ह्यांच्या सौंदर्याचे तर कोण वर्णन करू शकते? ॥४॥

सुंदर श्रवन सुचारु कपोला। अति प्रिय मधुर तोतरे बोला॥
चिक्कन कच कुंचित गभुआरे। बहु प्रकार रचि मातु सँवारे॥

सुंदर कान आहेत आणि गाल तर फारच सुंदर आहेत. त्यांचे बोबडे शब्द फारच प्रिय वाटतात. जन्मापासूनच त्यांचे चमकदार आणि कुरळे केस आहेत, ज्यांना मातेने विंचरून सुंदर प्रकारे बांधले आहेत. ॥ ५ ॥

पीत झगुलिआ तनु पहिराई। जानु पानि बिचरनि मोहि भाई॥
रूप सकहिं नहिं कहि श्रुति सेषा। सो जानइ सपनेहुँ जेहिं देखा॥

अंगात पिवळे झबले घातलेले आहे. त्यांचे रांगत चालणे मला फारच आवडत आहे. त्यांच्या रूपाचे वर्णन वेद आणि शेषसुद्धा करू शकत नाहीत. त्याला तोच जाणतो, ज्याने कधी तरी त्याला स्वप्नात का होईना पाहिले आहे. ॥ ६ ॥

दो०— **सुख संदोह मोहपर ग्यान गिरा गोतीत।**
दंपति परम प्रेम बस कर सिसुचरित पुनीत॥ १९९॥

जे सुखराशी मोहाहून पर, ज्ञान, वाणी आणि इन्द्रियांहून अतीत आहेत, असे ते भगवान् दशरथ-कौसल्या यांच्या अत्यंत प्रेमाला वश होऊन पवित्र बाललीला करीत आहेत. ॥ १९९ ॥

एहि बिधि राम जगत पितु माता। कोसलपुर बासिन्ह सुखदाता॥
जिन्ह रघुनाथ चरन रति मानी। तिन्ह की यह गति प्रगट भवानी॥

अशा प्रकारे (संपूर्ण) जगताचे माता-पिता श्रीरामजी अयोध्यापुरीच्या नगरवासियांना सुख देत आहेत. हे भवानी! ज्यांचे श्रीरामचंद्रजींच्या चरणी प्रेम जडले आहे त्यांची ही प्रत्यक्ष गती आहे. (की, भगवान् त्यांच्या प्रेमाला वश होऊन बाललीला करून त्यांना आनंद देत आहेत.) ॥ १ ॥

रघुपति बिमुख जतन कर कोरी। कवन सकइ भव बंधन छोरी॥
जीव चराचर बस कै राखे। सो माया प्रभु सों भय भाखे॥

श्रीरघुनाथजींशी विमुख होऊन माणसाने कोट्यवधी उपाय केले तरी त्याचे संसारबंधन कोण तोडू शकतो? जिने सर्व चराचर जीवांना आपल्या वश करून ठेवले आहे ती मायासुद्धा प्रभूला भिते. ॥ २ ॥

भृकुटि बिलास नचावइ ताही। अस प्रभु छाड़ि भजिअ कहु काही॥
मन क्रम बचन छाड़ि चतुराई। भजत कृपा करिहहिं रघुराई॥

भगवान् त्या मायेला भ्रकुटीच्या इशाऱ्यावर नाचवितात. अशा प्रभूंशिवाय सांगा, (इतर) कोणाचे भजन करावे? मन, वचन आणि कर्माने चतुराई सोडून भजन करताच श्रीरघुनाथजी कृपा करतील. ॥ ३ ॥

एहि बिधि सिसु बिनोद प्रभु कीन्हा। सकल नगरबासिन्ह सुख दीन्हा॥
लै उछंग कबहुँक हलरावै। कबहुँ पालने घालि झुलावै॥

अशा प्रकारे प्रभू रामचंद्रजींनी बालक्रीडा केली आणि समस्त नगरवासियांना सुख दिले. कौसल्या केव्हा केव्हा मांडीवर घेऊन त्यांना हालवीत-डुलवीत होती तर केव्हा पाळण्यात झोपवून झोके देत होती. ॥ ४ ॥

दो०— **प्रेम मगन कौसल्या निसि दिन जात न जान।**
सुत सनेह बस माता बालचरित कर गान॥ २००॥

प्रेममग्न झालेल्या कौसल्येला रात्र आणि दिवस केव्हा जात आहे हे कळत नव्हते. पुत्र स्नेहवश माता त्यांच्या बालचरित्राचे गायन करीत होती. ॥ २०० ॥

एक बार जननीं अन्हवाए। करि सिंगार पलनाँ पौढ़ाए॥
निज कुल इष्टदेव भगवाना। पूजा हेतु कीन्ह अस्नाना॥

एकदा मातेने श्रीरामजीला स्नान घातले आणि शृंगार करून पाळण्यात झोपविले. मग तिने इष्टदेवतेच्या पूजेसाठी स्नान केले. ॥ १ ॥

करि पूजा नैबेद्य चढ़ावा। आपु गई जहँ पाक बनावा॥
बहुरि मातु तहवाँ चलि आई। भोजन करत देख सुत जाई॥

पूजा करून इष्टदेवाला नैवेद्य दाखविला आणि स्वत: जिथे स्वयंपाक केला होता (स्वयंपाक घरात) तिथे गेली. नंतर ती पुन्हा इष्टदेवाजवळ (देवघरात) आली आणि तिने जेथे आल्यावर पाहिले तर आपल्या पुत्राला (इष्टदेव भगवंताला दाखविलेल्या नैवेद्याचे) भोजन करत असलेले पाहिले. ॥ २ ॥

गै जननी सिसु पहिं भयभीता। देखा बाल तहाँ पुनि सूता॥
बहुरि आइ देखा सुत सोई। हृदयँ कंप मन धीर न होई॥

माता भयभीत होऊन (पाळण्यात झोपविलेले होते, याला येथे कोणी आणून बसविले या विचाराने भिऊन) पुत्राजवळ गेली तर तेथे बालकाला पाळण्यात झोपलेले पाहिले. पुन्हा (पूजास्थानाकडे परतून) पाहिले की, तोच पुत्र तेथे (भोजन करीत) आहे. तिचे हृदय कंपायमान झाले आणि मनात धैर्य राहिले नाही. ॥ ३ ॥

इहाँ उहाँ दुइ बालक देखा। मतिभ्रम मोर कि आन बिसेषा॥
देखि राम जननी अकुलानी। प्रभु हँसि दीन्ह मधुर मुसुकानी॥

(ती विचार करू लागली की,) येथे आणि तेथे मी दोन बालक पाहिले. हा माझ्या बुद्धीचा भ्रम आहे की, दुसरे कोणते विशेष कारण आहे? प्रभू श्रीरामचंद्रजींनी मातेला घाबरलेली पाहून मधुर स्मित हास्य केले. ॥ ४ ॥

दो०— **देखरावा मातहि निज अद्भुत रूप अखंड।**
रोम रोम प्रति लागे कोटि कोटि ब्रह्मंड॥ २०१॥

नंतर त्यांनी मातेला आपले स्वत:चे अखंड अद्भुत रूप दाखविले ज्याच्या रोमारोमामध्ये कोट्यवधी ब्रह्मांड स्थित आहेत. ॥ २०१ ॥

अगनित रबि ससि सिव चतुरानन। बहु गिरि सरित सिंधु महि कानन॥
काल कर्म गुन ग्यान सुभाऊ। सोउ देखा जो सुना न काऊ॥

अगणित सूर्य, चंद्रमा, शिव, ब्रह्मदेव, अनेक पर्वत, नद्या, समुद्र, पृथ्वी, वन, काल, कर्म, गुण, ज्ञान आणि स्वभाव तिने पाहिले. त्याशिवाय असेही पदार्थ पाहिले जे पूर्वी कधी पाहिले किंवा ऐकिलेही नव्हते. ॥ १ ॥

देखी माया सब बिधि गाढ़ी। अति सभीत जोरें कर ठाढ़ी॥
देखा जीव नचावइ जाही। देखी भगति जो छोरइ ताही॥

सर्व प्रकाराने बलवान असलेल्या मायेला पाहिले की, ती (भगवंतासमोर) अत्यंत भयभीत होऊन हात जोडून उभी आहे. ज्याला ती माया नाचविते त्या जीवाला पाहिले आणि (नंतर) जी त्या जीवाला (मायेपासून) सोडविते अशा भक्तीला पाहिले. ॥ २ ॥

तन पुलकित मुख बचन न आवा। नयन मूदि चरननि सिरु नावा॥
बिसमयवंत देखि महतारी। भए बहुरि सिसुरूप खरारी॥

(मातेचे) शरीर पुलकित झाले. तोंडातून शब्द निघत नाही. तेव्हा तिने आपले डोळे मिटवून श्रीरामजींच्या चरणांवर मस्तक नमविले. मातेला आश्चर्यचकित झालेले पाहून खर शत्रू श्रीरामजी पुन्हा बालरूप झाले. ॥ ३ ॥

अस्तुति करि न जाइ भय माना। जगत पिता मैं सुत करि जाना॥
हरि जननी बहुबिधि समुझाई। यह जनि कतहुँ कहसि सुनु माई॥

(मातेला) स्तुतीही करता येत नाही. ती घाबरली की, जगत्पिता परमात्म्याला मी पुत्ररूपाने मानले. श्रीहरिने मातेला अनेक प्रकाराने समजावून सांगितले. (आणि म्हटले—) हे माते! ऐक, ही गोष्ट कुणाला सांगू नको. ॥ ४ ॥

दो०— **बार बार कौसल्या बिनय करइ कर जोरि।**
अब जनि कबहूँ ब्यापै प्रभु मोहि माया तोरि॥ २०२॥

कौसल्या वारंवार हात जोडून विनंती करते की, हे प्रभो! मला तुमच्या मायेने आता कधीही व्यापू नये. ॥ २०२ ॥

बालचरित हरि बहुबिधि कीन्हा। अति अनंद दासन्ह कहँ दीन्हा॥
कछुक काल बीतें सब भाई। बड़े भए परिजन सुखदाई॥

भगवंतांनी पुष्कळ प्रकारच्या बाललीला केल्या आणि आपल्या सेवकांना अत्यंत आनंद दिला. काही काळ लोटल्यावर चारही बंधू मोठे होऊन कुटुंबियांना सुख देऊ लागले. ॥ १ ॥

चूड़ाकरन कीन्ह गुरु जाई। बिप्रन्ह पुनि दछिना बहु पाई॥
परम मनोहर चरित अपारा। करत फिरत चारिउ सुकुमारा॥

तेव्हा गुरूजींनी चूडाकर्म (जावळ काढणे) संस्कार केला. ब्राह्मणांनी त्यावेळी पुष्कळ दक्षिणा मिळविली. चारीही सुंदर राजकुमार फारच मनोहर अपार लीला करीत फिरत होते. ॥ २ ॥

मन क्रम बचन अगोचर जोई। दसरथ अजिर बिचर प्रभु सोई॥
भोजन करत बोल जब राजा। नहिं आवत तजि बाल समाजा॥

जे मन, वचन आणि कर्माने अगोचर आहेत तेच प्रभू दशरथजीच्या अंगणात खेळत आहेत. भोजन करतेवेळी जेव्हा राजा बोलावितात, तेव्हा ते आपल्या बालसख्यांच्या समाजाला सोडून येत नाहीत. ॥ ३ ॥

कौसल्या जब बोलन जाई। ठुमुकु ठुमुकु प्रभु चलहिं पराई॥
निगम नेति सिव अंत न पावा। ताहि धरै जननी हठि धावा॥

कौसल्याजी जेव्हा बोलावू लागते, तेव्हा प्रभू लुटुलुटु पळत येतात. वेद ज्याचे "नेति नेति" (एवढेच नव्हे) म्हणून वर्णन करतात आणि शिवजीनेसुद्धा ज्यांचा अंतपार जाणला नाही, त्याला जबरदस्तीने पकडण्यासाठी माता पळते. ॥ ४ ॥

धूसर धूरि भरें तनु आए। भूपति बिहसि गोद बैठाए॥

शरीर धुळीने माखलेले आहे अशा अवस्थेत प्रभू आले आणि राजाने हसून त्यांना आपल्या मांडीवर बसविले. ॥ ५ ॥

दो०— **भोजन करत चपल चित इत उत अवसरु पाइ।**
भाजि चले किलकत मुख दधि ओदन लपटाइ॥ २०३॥

प्रभू भोजन करीत आहेत परंतु चित्त चंचल आहे. संधी मिळताच तोंडाला दहीभात लागलेल्या अवस्थेत प्रभू आवाज करीत इकडे तिकडे पळू लागले. ॥ २०३ ॥

बालचरित अति सरल सुहाए। सारद सेष संभु श्रुति गाए॥
जिन्ह कर मन इन्ह सन नहिं राता। ते जन बंचित किए बिधाता॥

श्रीरामचंद्रजींच्या फारच सरळ (भोळ्या) आणि सुंदर (मनाला आकर्षण करणाऱ्या) बाल लीलांना सरस्वती, शेष, शिवजी आणि वेदांनी गायले आहे. ज्यांचे मन या लीलांमध्ये अनुरक्त झाले नाही त्या माणसांना विधात्याने (लीलेपासून) वंचित केले. (नितान्त भाग्यहीन बनविले.) ॥ १ ॥

भए कुमार जबहिं सब भ्राता। दीन्ह जनेऊ गुरु पितु माता॥
गुरगृहँ गए पढ़न रघुराई। अलप काल बिद्या सब आई॥

सर्व भावंडे कुमारावस्थेत पोहचल्यावरोबर गुरू, माता, पिता यांनी त्यांचा यज्ञोपवीत संस्कार केला. श्रीरघुनाथजी (सर्व बंधूसह) गुरूंच्या आश्रमात विद्यार्जन करण्यासाठी गेले आणि थोड्याच काळात त्यांना सर्वविद्या आल्या. ॥ २ ॥

जाकी सहज स्वास श्रुति चारी। सो हरि पढ़ यह कौतुक भारी॥
बिद्या बिनय निपुन गुन सीला। खेलहिं खेल सकल नृप लीला॥

चारीही वेद ज्यांचा स्वाभाविक श्वास आहे, असे भगवान् शिकतात हे फार मोठे कौतुकच (आश्चर्य) आहे. चारीही बंधू विद्या, विनय, गुण आणि शील यामध्ये फार निपुण आहेत आणि नृपलीला खेळत आहेत. ॥ ३ ॥

करतल बान धनुष अति सोहा। देखत रूप चराचर मोहा॥
जिन्ह बीथिन्ह बिहरहिं सब भाई। थकित होहिं सब लोग लुगाई॥

त्यांच्या हातात धनुष्य आणि बाण फारच शोभा देतात. त्यांचे रूप पाहताच चराचर (जड-चेतन) मोहित होतात. ते सर्व बंधू ज्या गल्लीत खेळ खेळतात, त्या गल्लीतील सर्व स्त्री-पुरुष त्यांना पाहून प्रेमाने स्तब्ध होतात व थक्क होतात. ॥ ४ ॥

दो०— **कोसलपुर बासी नर नारि बृद्ध अरु बाल।**
प्रानहु ते प्रिय लागत सब कहुँ राम कृपाल॥ २०४॥

कोसलपुरचे रहिवाशी स्त्री-पुरूष, वृद्ध आणि बालक सर्वांना कृपाळू श्रीरामचंद्रजी प्राणापेक्षाही अधिक प्रिय लागतात. ॥ २०४ ॥

बंधु सखा सँग लेहिं बोलाई। बन मृगया नित खेलहिं जाई॥
पावन मृग मारहिं जियँ जानी। दिन प्रति नृपहि देखावहिं आनी॥

श्रीरामचंद्रजी सर्व बंधू आणि इष्ट-मित्रांना बोलावून बरोबर घेतात आणि नित्य वनात जाऊन शिकार खेळतात. मनात पवित्र समजून मृगया करतात आणि दररोज राजाला (दशरथजींना) केलेली शिकार आणून दाखवितात. ॥ १ ॥

जे मृग राम बान के मारे। ते तनु तजि सुरलोक सिधारे॥
अनुज सखा सँग भोजन करहीं। मातु पिता अग्या अनुसरहीं॥

जे मृग श्रीरामजीच्या बाणाने मारले जात होते ते शरीराचा त्याग करून देवलोकाला जात होते. श्रीरामजी आपल्या धाकट्या भावांसह आणि सख्यांसह भोजन करतात आणि माता-पित्याची आज्ञा पालन करतात. ॥ २ ॥

जेहि बिधि सुखी होहिं पुर लोगा। करहिं कृपानिधि सोइ संजोगा॥
बेद पुरान सुनहिं मन लाई। आपु कहहिं अनुजन्ह समुझाई॥

ज्या प्रकाराने नगरनिवासी सुखी होतील, कृपानिधान श्रीरामजी तीच लीला करतात. ते मन लावून वेद पुराण श्रवण करतात आणि नंतर लहान भावंडांना समजावून सांगतात. ॥ ३ ॥

प्रातकाल उठि कै रघुनाथा। मातु पिता गुरु नावहिं माथा॥
आयसु मागि करहिं पुर काजा। देखि चरित हरषइ मन राजा॥

श्रीरघुनाथजी नित्य प्रात:काळी उठून माता-पिता आणि गुरूंना वंदन करतात. त्यांची आज्ञा घेऊन नगराची सेवा करतात. त्यांच्या लीला पाहून राजा मनात फार हर्षित होत होते. ॥ ४ ॥

दो०— **ब्यापक अकल अनीह अज निर्गुन नाम न रूप।**
भगत हेतु नाना बिधि करत चरित्र अनूप॥ २०५॥

जे व्यापक,अनाकलनीय, इच्छारहित, अजन्मा आणि निर्गुण आहेत. तसेच ज्यांना नाम आणि रूप हेही नाही, तेच भगवान् भक्तांसाठी नाना प्रकारच्या अनुपम (अलौकिक) लीला करतात. ॥ २०५ ॥

यह सब चरित कहा मैं गाई। आगिलि कथा सुनहु मन लाई॥
बिस्वामित्र महामुनि ग्यानी। बसहिं बिपिन सुभ आश्रम जानी॥

हे सर्व चरित्र मी गायले. (वर्णन केले) आता पुढची कथा मन लावून ऐका. ज्ञानी महामुनी विश्वामित्रजी वनात शुभ आश्रम (पवित्र स्थान) पाहून निवास करीत होते. ॥ १ ॥

जहँ जप जग्य जोग मुनि करहीं। अति मारीच सुबाहुहि डरहीं॥
देखत जग्य निसाचर धावहिं। करहिं उपद्रव मुनि दुख पावहिं॥

तेथे ते जप, यज्ञ आणि योग ही साधने करीत होते,परंतु मारीच आणि सुबाहू राक्षसांना फार भीत होते. यज्ञ पाहताच राक्षस धावतच यायचे आणि उपद्रव करायचे. त्यामुळे मुनींना फार दु:ख होत होते. ॥ २ ॥

गाधितनय मन चिंता ब्यापी। हरि बिनु मरहिं न निसिचर पापी॥
तब मुनिबर मन कीन्ह बिचारा। प्रभु अवतरेउ हरन महि भारा॥

गाधीपुत्र विश्वामित्रजींच्या मनात चिंता वाटू लागली की, हे पापी राक्षस भगवंताकडून

मारल्यागेल्याशिवाय मरणार नाहीत. मग त्यांना समजले की, प्रभूंनी पृथ्वीचा भार हरण करण्यासाठी अवतार घेतला आहे. ॥ ३ ॥

एहूँ मिस देखौं पद जाई। करि बिनती आनौं दोउ भाई॥
ग्यान बिराग सकल गुन अयना। सो प्रभु मैं देखब भरि नयना॥

हेच निमित्त करून तिथे जाऊन मी त्यांच्या चरणांचे दर्शन करीन आणि विनंती करून दोन्ही भावांना घेऊन येईन. (अहा! जे ज्ञान, वैराग्य आणि सर्व गुणांचे धाम आहेत, त्या प्रभूला मी डोळे भरून पाहीन. ॥ ४ ॥

दो०— **बहुबिधि करत मनोरथ जात लागि नहिं बार।**
करि मज्जन सरऊ जल गए भूप दरबार॥ २०६॥

अनेक प्रकारचे मनोरथ करीत करीत ते त्वरेने निघाले. शरयू नदीत त्यांनी स्नान केले आणि ते राज-दरवाज्याजवळ पोहचले. ॥ २०६ ॥

मुनि आगमन सुना जब राजा। मिलन गयउ लै बिप्र समाजा॥
करि दंडवत मुनिहि सनमानी। निज आसन बैठारेन्हि आनी॥

राजाला जेव्हा मुनी आल्याचे कळले तेव्हा ते ब्राह्मण समाजाला बरोबर घेऊन त्यांच्या भेटीसाठी आले आणि त्यांनी दंडवत प्रणाम करून त्यांना सन्मानाने आणून आसनावर बसविले. ॥ १ ॥

चरन पखारि कीन्हि अति पूजा। मो सम आजु धन्य नहिं दूजा॥
बिबिध भाँति भोजन करवावा। मुनिबर हृदयँ हरष अति पावा॥

त्यांचे चरण प्रक्षालन करून यथायोग्य पूजा केली आणि म्हणाले—माझ्यासारखा भाग्यवान आज दुसरा कोणी नाही. नंतर मुनींना अनेक प्रकारचे भोजन करविले त्यामुळे श्रेष्ठ विश्वामित्रजी फारच संतुष्ट झाले. ॥ २ ॥

पुनि चरननि मेले सुत चारी। राम देखि मुनि देह बिसारी॥
भए मगन देखत मुख सोभा। जनु चकोर पूरन ससि लोभा॥

त्यानंतर राजाने आपल्या चारीही पुत्रांना बोलावून घेतले आणि त्यांना मुनींच्या चरणांवर घातले. (त्यांच्याकडून वंदन करविले.) श्रीरामजीला पाहून मुनी आपले देहभान विसरले. ते श्रीरामचंद्रजीच्या मुखाची शोभा पाहताच असे मग्न झाले जाणू काय चकोर पूर्ण चंद्राला पाहून लुब्ध झाला आहे. ॥ ३ ॥

तब मन हरषि बचन कह राऊ। मुनि अस कृपा न कीन्हिहु काऊ॥
केहि कारन आगमन तुम्हारा। कहहु सो करत न लावउँ बारा॥

तेव्हा मनात हर्षित होऊन राजा म्हणाले—हे मुनी! अशी कृपा तर यापूर्वी आपण कधीच केली नव्हती. आपले आज कोणत्या कारणाने शुभागमन झाले? सांगा, मी तुमची इच्छा पूर्ण करण्यास मुळीच वेळ लावणार नाही. ॥ ४ ॥